वर्ष १ ले

# स्नेहांजली

ई - दिवाळी विशेषांक - २०१९





# स्नेहांजली

## ई - दिवाळी विशेषांक


| | | |
|---|---|---|
| संपादक | : | स्नेहांजली कट्टा |
| आवृत्ती | : | ई - दिवाळी विशेषांक २०१९, वर्ष १ ले |
| संपादन सहाय्य | : | नंदिनी देशमुख |
| अक्षर जुळणी | : | स्नेहांजली व्हॉटस्अप सभासद |
| मुद्रीत शोधन | : | नंदिनी देशमुख |
| मुखपृष्ठ | : | आंतरजाल सहाय्यक |
| विशेष आभार | : | पुर्णिमा नार्वेकर |
| अंक सजावट व  मांडणी | : | शेखर |
| अंक सजावट सहाय्यक | : | संपदा गणवे |

वितरण खाजगी वितरणासाठी



संपर्क : स्नेहांजली कट्टा

९००४० ९४६१७, ९८२०० ०८३८४, ९०४९७ ४५९९९, ९८२२० ९१५३७

ई-मेल : snehanjalikatta@gmail.com



या अंकातील मतांशी संपादक / प्रकाशक सहमत असतीलच असे नाही. तसेच या अंकात प्रसिध्द केलेल्या लेखांशी अगर विचारांशी स्नेहांजली कट्टा, कोणतीही कंपनी अथवा व्यक्तीचा कोणत्याही प्रकारे संबंध नाही.


**सर्वांना ही दिपावली आणि नवीन वर्ष सुख, समृध्दी व आनंदाचे व भरभराटीचे जावो ही सदिच्छा!**
**- स्नेहांजली कट्टा**

# स्नेहांजली

दिवाळी २०१९

## लेख


न्यू दीपावली
छाया महाजन ५

ससा, कासव आणि व्यक्तिमत्त्व विकास
मानसी चिटणीस १३

जगावेगळ्या बायका - म्हणजे कशा ?
स्वाती बेडेकर २०

मदनबाण
निशा वर्तक ३०

कोनाडे... भिंतीतले मनातले !
शुभांगी मांडे ३८

महाश्वेतादेवी परिचय
प्रिया धारुरकर ४४

वृक्ष आपुले सांगाती
रेखा राव ५२

रम्य ते वार्धक्य
राही लिमये ५४

मंदोदरी
मोहना टिपणीस ५८

ऋणानुबंधाच्या कुठून पडल्या गाठी
सुनिता बापट ६०

हेमंताचं प्रवेशद्वार -मार्गशीर्ष
स्मिता पाटील ६९

त्याचं अस्तित्व...
मेधा तेलंग ७८


## कथा


बारा मुलांची आई
सुजाता कानेटकर ८

भय वितळतांना
माधवी कुंटे १५

सुळावरची पोळी
सुलभा गुप्ते २३

प्रीतीची रीत ही न्यारी
उषा कुळकर्णी ३२

मी कथा लिहीते...!
निर्मला देशमुख ४२

वृक्षवल्ली आम्हा सोयरे
आशा पाटील ४७

निरुत्तर
कादंबरी देशमुख ५०

बदलते भावविश्व
सुनेत्रा जोशी ६४

धार्जिणे
मानसी बोरकर ७१

गोलू
संगीता फुके ७३

संस्काराचे विद्यापीठ माझी आजी
डॉ. विनिता आपटे ७६

लाल लुगडेवाली आजी
नंदिनी देशमुख ८४


## कविता


बांधावरील झाड अन् बाप
योगिता पाखले १२

पाऊस ........................ १८
बाईची जात .................. ४२
ऋचा कर्वे

श्रावण माझा ................. २८
तो आणि ती .................. २९
तनुजा इनामदार

द्रौपदी
गौरी गाडेकर ३६

मन बावरे
आसावरी कुलकर्णी ४१

स्वर्गसुख .................... ५६
आई कशी असते ? .......... ५७
सुनिता बेलोसे

आईचे बोल आता आठवले..... ६७
शिबीर ....................... ६८
पूर्णिमा नार्वेकर

प्रिय पावसा.....
सीमा गांधी ८१


## पाककृती


आसावरी कुलकर्णी
सुनिता बेलोसे ३५

# स्नेहांजली

दिवाळी २०१९

# संपादकीय



अशोक साळवी


बँक ऑफ महाराष्ट्र मध्ये नोकरी करत असतांना मी ऐच्छिक सेवानिवृत्ती घेतली. मला वाचनाची खूप आवड आहे. तसेच भटकंती करायला आवडते. माझे आत्तापर्यंत जगातील ३५ देश बघून झाले. मला सामाजिक कार्याची आवड आहे.

मला आनंद वाटतोय आपला "स्नेहांजली कट्टा" 'स्नेहांजली' या दिवाळी अंकाच्या स्वरूपात प्रथम पदार्पण करीत आहे. मला वाचन आणि लेखनाची आवड आहे. मला कुणाची कथा कविता किंवा लेख आवडला तर मी आवर्जून त्यांना फोन करून सांगतो. माझ्या या छंदातूनच हा कट्टा उदयास आला. मला आठवतंय २०१६ साली टूर वर असताना महानंदा लगडे भेटल्या. त्याना मी प्रथम सामील करून घेतले. असे करीत असताना "स्नेहाजली कट्टा " नामकरण करून टाकले. त्यानंतर सुलभा गुप्ते , नंदिनी देशमुख सामील झाल्या. ग्रुप तयार करताना सामाजिक बांधिलकी, मेसेज,कविता, काव्य,विनोदी चुटुकले हाच एक उद्देश होता. त्यामुळे बऱ्याच महिला सामील झाल्या.

महिला भगिनींनी अंका बाबत खुपच उत्साह दाखवला आहे. मी तुमच्या सर्वांच्या आनंदात सहभागी आहे.

आपल्या पहिल्या वाहिल्या अंकाला मनःपूर्वक शुभेच्छा. तसेच पुर्णिमा नार्वेकर व नंदिनी देशमुख यांच्या कार्याला मदत करणाऱ्या महिलाना सलाम. त्यामानाने प्रतिसाद खुप मिळाला. बऱ्याच जणींच्या लांबत चाललेल्या संभाषणा बद्दल फोन वर तक्रारी सुध्दा आल्या पण मी दुर्लक्ष केले. त्यामुळे काही जणीं सोडून गेल्या. अशा गोष्टी कुठेही होतच असतात. असो. हा कट्टा असाच हसता, खेळता रहावा हीच परमेश्वराजवळ प्रार्थना.

**अशोक साळवी**
**अ-१०२, श्रीराम सरोवर फाटक रोड,**
**ठाकूर मार्ग, भाईंदर - पश्चिम**
**मुंबई - १०१**
**८७७९८ २६१४२**



छाया महाजन

छाया महाजन.

शैक्षणिक आणि साहित्यिक क्षेत्रात कार्यरत. एकूण ३८ पुस्तके प्रकाशित. ५ मराठी २ हिंदी २ इंग्रजी कादंबऱ्या, ७ कथासंग्रह, ५ ललित गद्यसंग्रह, ४ बाल वांग्मय, १ चरित्र लेखन आणि १२ भाषांतरे. लघुत्तम कथालेखनात एकमात्र लेखिका. निरनिराळ्या पुरस्कारांनी सन्मानीत. जाने. २०१५ मध्ये जालना येथील मराठवाडा लेखिका संमेलनाच्या अध्यक्षा.



# न्यू दीपावली

आपल्या मनाची गंमत असते. भविष्यकाळाबद्दल खात्रीपूर्वक निश्चितपणे काही सांगू शकत नसतानाही, वर्तमानात जगत असताना आपले डोळे भविष्याकडे लागलेले असतात, कारण उद्या काय हा प्रश्न वेड्यासारखा वाटावा अशी स्थिती दुसऱ्या क्षणी काय असेल, याबद्दलची अनभिज्ञता आहे.

त्यामुळे वर्तमानात लक्ष आणि लक्ष्य भविष्यावर आणि मन मात्र भूतकाळाकडे ओढ घेणारं आणि भूतकाळात रमणारं. खात्रीशीर भूतकाळच आहे. कारण तो आपण अनुभवलेला असतो.

घटना घडताना, अनुभवताना त्या कधी कधी अत्यंत कटू, मनाविरुध्द आणि तिरस्करणीय असतील पण त्यातलेच काही अनुभव एकदम 'मेमोरेबल' होऊन जातात. विशेषत: आयुष्यात पुढे यश किंवा ऐश्वर्य संपन्नता आली तर आधीचे संघर्ष, परिश्रम हे परिकथेसारखे बदलून आवर्जून कथित करण्यासारखे वाटू लागतात. सिंड्रेलाला बूट मिळेपर्यंतच्या छळासारखे, रुपेरी कडेचे ढग, मग यशाची रुपेरी कडा अशा काळ्या ढगांनी जास्त झळाळते.

अर्थात, भूतकाळात रमण्याची वृत्ती सगळ्यांची नसते. काहींमध्ये ती असते. काही लोक नादावल्यासारखे आपल्या काळाबद्दल बोलतात. त्यांना आठवणी जपाव्याशा वाटतात किंवा जपण्याचा छंद असतो. बव्हंशी लोक भविष्यकाळाची स्वप्नं पाहतात. आपल्या आकांक्षांना मूर्त रुप देण्यासाठी वर्तमानात प्रयत्नशील होतात. पाहिजे ते मिळवण्यासाठी धडपडतात. कष्ट करतात. त्यात त्यांना वर्तमानकाळही पूर्णपणे समरसून जगता येत नाही. त्यांना जागं करून 'आयुष्य एकदाच येतं आणि त्यातलं तारुण्य ही एकदाच उपभोगता येतं. एकदा गेलं की पुन्हा मागूनही मिळत नाही' अशा प्रकारच्या कविता आणि गाणी 'आजचा क्षण आजच जगून घ्या' किंवा दु:खं आजपुरतंच आहे असेही सांगणारी गाणी गातात.

पण 'गोईंग डाऊन द मेमरी लेन' आठवणींच्या रस्त्यावर रमलेल्या माणसांना अशा सल्ल्याची गरज नाही.

असं जरी असलं तरी असं दिसतं की बहुतेकांना आपलं लहानपण आठवत राहतं. ते रम्य असल्याचं त्यांना ठामपणे वाटतं. तेव्हाची आजूबाजूची माणसं, नाती फार मोलाची वाटतात. म्हणून जगजितसिंगची 'मगर मुझसे लौटा दो बचपन का सावन, वो कागज की कश्ती वो बारीश का पानी' सारखी गजल इतकी मनाला भिडते.

तसंच आपल्या सणावाराचं आहे. अनेक सण, उत्सव, जत्रा, उरुस हे सामूहिकपणे साजरे करायचे असतात. नवरात्र, गणपती उत्सव हे लोकाभिमुख सामाजिक सण झालेत. दिवाळी मात्र अजून आपलं खाजगीपण टिकून आहे. हे सण ऋतूंसारखे नियमित येतात. आनंदाचं उत्साहाचं मोठं फुललेलं झाड घेऊन येतात.

दिवाळी येताना आनंदाचं पक्कं निमंत्रण घेऊन येते. अनेक सुखद आल्हाददायक आठवणी ठेवून जाते. ही साजरी होताना वयाचा, आर्थिक क्षमतेच्या किंवा जातीच्या उतरंडीचा भाग बाजूला पडतो. कारण ती एकटी येत नाही तर ती बरोबर लक्ष्मी आणते. आणि प्रत्यक्ष आणली नाही तर समृध्दीची कल्पना व आशा तर आणतेच आणते. तशी कौटुंबिक नातीही आणते. प्रत्यक्ष भेटी होतात. तशा भेटकार्ड आणि एसएमएसद्वारे अप्रत्यक्ष भेटीची इच्छाही सूचित होते. कविता आणि संदेशाची एवढी प्रचंड उलाढाल ही व्यापाराइतकीच मोठी होते.

तिच्या सोबत येतात आधीच्या दिवाळीच्या आठवणी, विशेषत: लहाणपणीच्या हातात फटाका किंवा बॉम्ब फुटल्याची आठवण, फुलझडीच्या विझलेल्या तारेच्या चटक्याची, कपड्यात घुसलेल्या मामाची किंवा

दिवाळी येताना आनंदाचं पक्कं निमंत्रण घेऊन येते. अनेक सुखद आल्हाददायक आठवणी ठेवून जाते. ही साजरी होताना वयाचा, आर्थिक क्षमतेच्या किंवा जातीच्या उतरंडीचा भाग बाजूला पडतो. कारण ती एकटी येत नाही तर ती बरोबर लक्ष्मी आणते. आणि प्रत्यक्ष आणली नाही तर समृध्दीची कल्पना व आशा तर आणतेच आणते.

सोडलेले रॉकेट नेमके शेजाऱ्यांच्या घरात घुसल्याच्या अनेक आठवणी.

आठवतात ती पिवळ्या धमक किंवा नारंगी झेंडुच्या फुलांची तोरणं, अंगणभर पसरलेल्या रंगानं मढवलेल्या रांगोळ्या. शेणानं सारवलेलं ओलं अंगण आणि उंबरठ्याशी रंगीत रांगोळीनं केलेलं इंद्रधनुषी स्वागत. रांगोळीवर तेवणारी पणती पाडव्याच्या सकाळी ओसरीला येऊन वाजणारा चौघडा किंवा वाजणारी शहनाई आणि दारं, खिडक्या, कोनाडे आणि अंगणात तेलाने चिकट करणाऱ्या असंख्य तेवत्या पणत्या.

घरावर, गॅलरीत प्रकाशित आकाशदिवा हे तर खास आकर्षण कारण स्वहस्ते बनवला जाणारा आकाशकंदील ही केवढी तरी अभिमानाची गोष्ट आणि ती तयार करणं म्हणजे एखादा प्रकल्प हाती घेतल्याचा उत्साह. जिलेटिनचे रंगीत कागद, कामट्या, दोर्‍या, डिंक, कात्र्यांसह त्यात बसलेलला तज्ञ त्याच्याभोवती उत्सुक मुलांचा ताफा म्हणजे तत्पर स्वयंसेवकच. त्यामुळे आकाशदिवा करणाऱ्याला आपण नासातले शास्त्रज्ञ असल्यासारखं वाटल्यास नवल नाही. अशा वेळी मुलगा, मुलगी हा भेद नसे. मदत आणि उत्सुकता हाच क्रायटेरिया.

घर अक्षरश: गजबजलेले. काका-काकू, आत्या, मावश्या, आजी-आजोबा आणि भावंडांचा तांडा. चुलत मामे, मावस, चुलत दूरचे-जवळचे इ.इ.इ असायचे. आणि विविध वयोगटाची मुलं. त्यांची वयानुसार वर्गवारी आपोआप व्हायची. त्यातही आवडती नावडती भावंडं यांचे तट पडायचे. खेळणाऱ्यांचे आणि लिंबू टिंबू ठरवलेल्यात भांवडही ठरलेली, खेळू न दिल्यामुळे त्यांची रडली पडली आणि मोठ्यांकडून बोलणी खाणंही नेहमीचा भाग होता. पण काम करवून घ्यायला लिंबू टिंबू हा उत्तम गट. यांची उपयुक्तता काम करवून घेणारेच जाणतात. आकाशदिवा नसेल तर दिव्यांच्या माळा सोडण्यातही आनंद पण तरी आकाश दिव्यांची शोभा वेगळीच.

यावेळी समस्त स्त्रीवर्ग दिवाळीची घराची सफाई या कार्यक्रमापूर्वी 'कर्टन रेजर' असतो. तशा कामात व्यस्त. काम वाढल्यामुळे खेकसणं रागवणंही सुरु. मग सामानाची यादी नंतर पाकसिध्दी आणि फराळ!

आठवणींच्या या पार्श्वभूमीवर आजची दिवाळी म्हणजे फुललेला बाजार. गजबजलेले मॉल. भारतीय आणि विदेशी वस्तूंनी भरलेल्या शोरुम्स. तेव्हाचा 'कापडं' शिवणारा, गळयात टेप स्टेस्थोस्कोपसारखा ठेवणारा शिंपी गायब झालाय. पणत्या, बोळकी, दीपावलीच्या पणत्याधारी मातीच्या बाहुल्या अंग चोरुन कोपऱ्यात गेल्यात

एरवी कामासाठी आपण स्वार्थापोटी 'प्रोफेशनल' नाती जपतो ते थोडं बाजूला ठेवून मित्रांना, नात्यांना जोडून घेण्याची, कनेक्ट होण्याची हीच वेळ. कारण नाती नुसती नाती नसतात. ती अडगळीला टाकायची नसतात. त्यांना कुठल्याही कसोट्यांवर सिध्द करायचं नसतं. तर तुम्ही मला प्रिय आहात ही मनाजवळची भावना जाणवून द्यायची असते ती याच काळात.

किंवा दोन दिवस आधी रस्त्याच्या कडेला एखाद्या दिवशी संसार थाटून बसताहेत आणि सकाळच्याला गायब होताहेत. कुंभार दिसत नाहीयेत. उलट असंख्य 'महासेल' लागतायेत किंवा एक्झिबिशन लागताहेत. त्यात पूर्वीसारख्या मातीच्या साध्या पणत्या आणि घरी रंगवलेल्या साध्याभोळ्या दीपलक्ष्म्या नाहीत तर विविध आकाराच्या रंगीत पणत्यासह अनेक वस्तू आहेत.

आज्यांनी वाती करण्याची गरज संपलीये. त्यामुळे कापसाच्या दोऱ्याला किती आणि कसा पिळ देत वात करण्याचे कसब लयाला गेलयं. लाडू, चिवडा, शेव, चकली, लवंगलतिका, खजुऱ्या, अनारसे असे अनेक पदार्थ पूर्ण वर्षभर उपलब्ध आहेत. त्यामुळे दिवाळीला वेगळे काय करायचं किंवा खायचं? कारण तशी रोजच दिवाळी होऊ शकते.

तेचं कपड्यांचं. सणवारी नवा कपडा ही संकल्पना एकत्र कुटुंबाबरोबरच संपली. शिवाय कपड्यांच्या नित्य नव्या फॅशन्स हा आणखी वेगळा भाग आहे.

पाहुणे येणं ही सुध्दा एक चौकटीतली कल्पना झालीये. अचानक पाहुणा येणं, होणारी धावपळ किंवा त्रास, आवरावा लागणारा घरातला पसारा किंवा बाजारात पळावं लागणं संपलयं. आते, मामे, मावस, चुलत, नातेवाईक दिवाळीच्या सुट्टीच्या निमित्ताने महिना महिना राहणं संपलयं.

चार दिवसांची दिवाळी ही कल्पना. त्यातही दिवाळीत एकत्र येऊन बाहेर जाऊन, मजा करुन, कुणालाच ताण आणि जास्तीचं काम नको म्हणून सख्खे नातेवाईक घराबाहेर भेटताहेत. तर काही पर्यटनाचा पर्याय घेताहेत.

आकाशदिवे चीन, कोरिया, तैवानहून येताहेत. कामट्या जिलेटीन जाऊन आकाशदिवे तयार करणारे आणि प्रौढी मिरवणारे कलाकार कलाहीन झालेत.

फ्लॅटच्या दारात आठ बाय आठ इंची चौकोनी फरशीवर रांगोळी आकसून सजतेय. तिचा रंग डोळयावर चढत नाहीये. चार दिवस धडाकून फुटणारे फटाके आणि दारु आता गल्लोगल्ली फक्त लक्ष्मीपूजनाला वाजताहेत. उरले दिवस फुटकळ दारु वाजते. फटाक्यांच्या वाढत्या भावानं फटाक्यांच्या लडीची लांबी कमी होतेय. काही काळात लक्ष्मी जेमतेम ऐकू शकेल एवढी ती लहान होईल. बाजारात व्यापारी गल्ल्यात पाडव्याला फटाके फुटतात. पण आता बाजारपेठही एखाद्या गल्लीपुरती मर्यादित नाही. जिथे पहाल तिथे दुकाने आहेत. व्यापाऱ्याची खतावणीची वही पाडव्याला बदलणं हे मॉल संस्कृतीत पुजाऱ्याद्वारे करतात की नाही माहीत नाही. आजकाल पुजारी लागत नाही सीडीज् लावून पूजा होते. पौरोहित्यही पूर्वीसारखं नाही. पुरोहितांना फक्त सीडीज् स्पर्धक नाहीत तर स्त्रियाही स्पर्धक आहेत.

मिठाईची जागा कॅडबरी चॉकलेट घेऊ पाहते आहे. फराळाचे डबे घरातून न जाता परस्पर मिठायाच्या दुकानातून जातायेत.

दिवाळी तीच आहे तरी पूर्वीच्या हॉटेलच्या नावाला किंवा दुकानाच्या नावाला न्यू लावून नाव देतात. उदाहरणार्थ न्यू साई हॉटेल, तसंही नवी आधुनिक दिवाळी. आता तर दिवाळीत गुलाबी थंडीही येणं बंद झालंय. पाऊस पुढं सरकून पणत्या लावणं अशक्य करतोय. सण साजरे करण्याची पद्धत बदलतेय. साजरं करणं हा रिवाजच आहे. लहानपणी आईनं भांग पाडणं हा रिवाज वय वाढायला लागलं की मुलगा नाकारतो म्हणजे स्वत: क्रियाशील होऊन रिवाज बदलतो. तसं उत्सवी सणांचं होतयं. पण ते नुसतं पोकळ अवडंबर नसावं हे भान ठेवणं गरजेचं आहे.

एरवी कामासाठी आपण स्वार्थापोटी 'प्रोफेशनल' नाती जपतो ते थोडं बाजूला ठेवून मित्रांना, नात्यांना जोडून घेण्याची, कनेक्ट होण्याची हीच वेळ. कारण नाती नुसती नाती नसतात. ती अडगळीला टाकायची नसतात. त्यांना कुठल्याही कसोट्यांवर सिध्द करायचं नसतं. तर तुम्ही मला प्रिय आहात ही मनाजवळची भावना जाणवून द्यायची असते ती याच काळात.

बदलत्या काळात पहाट पाडवा सारख्या गाण्यांच्या मैफली एकत्र येऊन ऐकल्या जातात. तसं दिवाळीची भाऊबीज ही मोठ्या स्वयंसेवी संस्थांनी एकत्र येऊन साजरी करायला हरकत नसावी. वृध्द, अपंग, अनाथांसाठी काम करणाऱ्या संस्थांनी असं आवाहन केलं तर त्याला निश्चित प्रतिसाद मिळेल.

आपल्या घरी दिव्यांचा लखलखाट असताना एखाद्या झोपडीत एखादी पणती तरी अंधार बाजूला सारतेय ना हेही महत्त्वाचं.

नातचं जपायचं तर ते सहभावनेचं असावं इतकचं.

■

छाया महाजन,
'चेतन' कल्याणी नर्सिंग होम,
न्यू समर्थनगर, औरंगाबाद 431001
फोन : 09823255902



सुजाता कानेटकर

सौ कानेटकर सुजाता अशोक

३८ वर्षे शिक्षिका म्हणून सेवा. केंद्रप्रमुख पदावरून निवृत्ती. १९७२ पासून कथा - कविता लेखन. विविध मासिके व वर्तमनपत्रा मध्ये लेखन प्रसिद्ध.

सातारा ते शिकागो प्रवासवर्णन लेखन. उत्कृष्ट प्रवासवर्णनाचा राज्यस्तरीय पुरस्कार व इतर अनेक स्थानिक पुरस्कार. आठवणींची साठवण पुस्तकाचे शब्दांकन.



# बारा मुलांची आई

अमेरिकेत वास्तव्याला असलेले अर्जुनराव शेलार कायमस्वरूपी भारतात आले. तेथे असलेला व्यवसाय, घर मुलाच्या ताब्यात देऊन उत्तरायुष्य मायदेशी, घालविण्याचा निर्णय त्यांनी घेतला होता. पत्नी उषाताईंची त्यांना साथ होतीच. नुकतीच साठ वर्षे पूर्ण झाल्यामुळे आपला एकसष्टीचा कार्यक्रम भारतात मित्रांसोबत साजरा करायचा आणि गावात नव्याने सुरू झालेल्या 'सावली' वृद्धाश्रमाला सामाजिक बांधिलकी म्हणून दहा लाख रूपये देणगी द्यायची असा निर्णय कौटुंबिक एकमताने घेतला होता.

त्यांच्या मुलाला, सुनेला अर्जुनरावांचा सार्थ अभिमान होता. वडिलांच्या या निर्णयाने त्यांचा उर अभिमानाने अधिकच भरून आला. मात्र यावेळी मुले भारतात येणार नव्हती. बाबांच्या मागे सारं सांभाळण्याची जबाबदारी अरूण-अनितावर होती. दोघंही कर्तबगार, विचारी आणि संस्कारी होती. त्यामुळे अर्जुनराव खूप समाधानी होते. स्वत:ला भाग्यवान समजत होते. ईश्वराचं नाव घेत नव्हे तर ईश्वराचं काम करत भारतात रहायचं त्यांनी ठरवलं होतं. अमेरिकेतील जीवन कितीही सुखदायी असलं तरी भारतातील मोकळेपणाचा अभाव जाणवतच राहतो.

ठरल्याप्रमाणे अर्जुनराव भारतात आपल्या छोट्याशा गावी येऊन पोहोचले. घराची व्यवस्था पाहणाऱ्या तात्या आणि काशिबाईंनी सारं घर स्वच्छ केलं होतं. अॅक्वागार्ड, फ्रीज, वॉशिंग मशिन सारं स्वच्छ करून ट्रायल घेतली होती. दारात गाडी थांबताच तात्या अदबीने पुढे गेले. अर्जुनरावांना राम-राम करून त्यांची जाड-जुड बॅग ओढत दारापर्यंत घेऊन आले. पाठोपाठ उषाताई आपली भली मोठी सॅकवजा पर्स सावरत गाडीबाहेर आल्या. एक छोटीशी बॅग ओढत दारात आल्या. उंबरठ्याला हाताने स्पर्श करून घरात शिरल्या. एक वेगळेच समाधान त्यांच्या हालचालीतून जाणवत होते. आता अगदी मोकळेपणाने बाथरूममध्ये जाऊन स्वच्छ हातपाय धुवायचे होते. अमेरिकेतील बाथटबमध्ये याचं वावडं होतं. तोवर काशिबाईंनी गूळ-पाणी आणून ठेवलं आणि गॅसवर चहाचं आधण चढवलं. अर्जुनरावही गाडीतील सारे सामान आले का पाहून सोफ्यावर ऐसपैस विसावले.

लगेचच दोन दिवसांनी बुधवारी अर्जुनराव 'सावली' वृद्धाश्रमाला भेट देण्यासाठी गेले. व्यवस्थापक अण्णासाहेब देसाईंना त्यांनी आपला निर्णय सांगितला. अण्णासाहेबांना खूप आनंद झाला. एवढी मोठी देणगी देणारी व्यक्ती या गावचा सुपुत्र आहे याचा त्यांना अभिमान वाटला. येणाऱ्या रविवारी छोटेखानी कार्यक्रम आयोजित करण्याचा त्यांचा विचार त्यांनी अर्जुनरावांना सांगितला. सहज म्हणून अर्जुनरावांनी आश्रमाचे रजिस्टर पाहिले. आश्रमात सध्या बारा लाभार्थी वृद्ध रहात होते.

आश्रमाचे सभागृहातच कार्यक्रम आयोजित केला होता. अर्जुनरावांच्या विनंतीप्रमाणे बारा खुर्च्या एका बाजुला राखीव ठेवल्या होत्या. अर्जुनरावांचे काही खास पाहुणे असावेत असा अण्णासाहेबांनी विचार केला. हळुहळु सभागृह भरले. अर्जुनरावही त्यांच्या पाहुण्यांसह आणि पत्नीसह सभागृहात आले. अर्जुनरावांची बैठक अर्थात् व्यासपिठावर सपत्नीक होती. 'त्या' खास बारा खुर्च्याही भरल्या. श्रोत्यांचे लक्ष त्या खुर्च्यांकडे अधिक होते. कोण असतील हे लोक? याचं साऱ्यांना कुतुहल होतं. यांची व्यवस्था वेगळी का केली असेल ?

नाना प्रश्न, नाना शंका!

आश्रमाचे व्यवस्थापक अण्णासाहेब, त्यांची कार्यकारिणी,, आश्रमातील लाभार्थी वृद्ध सारे उपस्थित झाले. "कार्यक्रमाची सुरूवात अर्जुनराव आणि मान्यवरांच्या हस्ते दीपप्रज्वलनाने होईल." संयोजक सांगत होते. अर्जुनराव आणि व्यासपीठावरील मान्यवरांनी दीपप्रज्वलन केले. वृद्धांच्या वतीने नवीन मेंबर असलेल्या मालतीबाईंना दीपप्रज्वलनाचा मान दिला गेला. मालतीबाई काही महिन्यांपूर्वी आश्रमात दाखल झाल्या होत्या. सत्तरीच्या मालतीबाई फ्रेश

हळुहळु सभागृह भरले. अर्जुनरावही त्यांच्या पाहुण्यांसह आणि पत्नीसह सभागृहात आले. अर्जुनरावांची बैठक अर्थात् व्यासपिठावर सपत्नीक होती. 'त्या' खास बारा खुर्च्याही भरल्या. श्रोत्यांचे लक्ष त्या खुर्च्यांकडे अधिक होते. कोण असतील हे लोक? याचं साऱ्यांना कुतुहल होतं. यांची व्यवस्था वेगळी का केली असेल ? नाना प्रश्न,

दिसत होत्या. श्रोत्यांची उत्कंठा जास्त ताणू न देता अण्णासाहेब बोलायला उठले. त्यांनी दानशूर अर्जुनरावांबद्दल गौरवोद्गार काढले. सुरूवातीलाच त्यांनी स्पष्ट केले की, आपल्या या छोट्याशा गावात नव्याने सुरू झालेल्या या वृद्धाश्रमाला मा. अर्जुनरावांनी दहा लाख रूपये देणगी दिली आहे. टाळयांच्या कडकडाटात आपण त्यांचे अभिनंदन करूया. सभागृहात टाळयांचा प्रचंड कडकडाट झाला. मात्र अर्जुनरावांचे लक्ष शांतपणे बसलेल्या मालतीबाईंकडे होते. काहीतरी आठवण्याचा ते प्रयत्न करीत होते. नेमकी लिंक लागत नव्हती. तेवढ्यात संयोजकांनी "आता आजचे प्रमुख पाहुणे अर्जुनराव बोलतील असे जाहीर केले."

अर्जुनराव बोलायला उठले, डायसपाशी जाण्यापूर्वी ते मालतीबाईंच्या आसनापाशी गेले. त्यांच्या पायाशी वाकून "नमस्ते बाई" म्हणत नमस्कार केला. मालतीबाई गोंधळल्या. त्यांच्या काही लक्षात येईना, तशा गोंधळलेल्या मनस्थितीत त्या थोड्या मागे सरल्या. अर्जुनराव डायसवर गेले. "नमस्ते उपस्थित श्रोतेहो!" असे म्हणत बोलायला सुरुवात केली. गेली पंधरा वर्षे मी अमेरिकेत होतो. अमेरिकेत ज्येष्ठ नागरिकांसाठी अनेक सरकारी सुविधा आहेत. भारतात कुटुंब व्यवस्था असुनही ज्येष्ठांचे प्रश्न गंभीर होत चाललेत. कित्येकदा वृद्धाश्रम ही गरजही ठरते. आपल्या गावात नव्याने सुरू झालेल्या या आश्रमाची बातमी माझ्या मित्रांनी मला कळवली होती. त्याच वेळी या वृद्धाश्रमाला आर्थिक सहाय्य करण्याचा निर्णय आम्ही कुटुंबियांनी अमेरिकतच घेतला होता."

"इथं आल्यावर मी आश्रमाला भेट दिली. माझी ईच्छा अण्णासाहेबांना सांगितली; आणि त्यांच्याच परवानगीने मी आश्रमाचं रजिस्टर बघितले.. नव्याने दाखल झालेल्या मालतीबाई साने हे नाव वाचल्यावर मी भूतकाळात गेलो. व्यवस्थापक अण्णासाहेबांना त्यांची केस हिस्ट्री विचारली. जे कळलं ते माझ्यासाठी धक्कादायक होतं. या एक शिक्षिका, नव्हे विद्यार्थ्यांची आईच! खूप अध्यापन कुशल, स्वाभिमानी, शिस्तप्रिय! त्यांचे मिस्टर उत्तम डॉक्टर होते. एकुलता एक मुलगा एम एस होऊन परदेशात स्थायिक झाला. दुर्दैव पुढंच. एका अपघातात त्याचं निधन झालं. पण बाई न खचता उभ्या राहिल्या. त्यांचं घर आहे. पेन्शन भरपूर आहे, पण घरात एकटीनं संसार करण्यापेक्षा,

जिथं नोकरी केली त्याच गावात नव्या वद्धाश्रमातील वृद्धांची सेवा करावी या विचाराने त्यांनी सावलीतील वृद्धांची सावली बनण्याचं ठरवलं. हे सारं समजल्यावर माझी खात्रीच पटली, या आमच्या साने बाई।"

"मग या दोन तीन दिवसांत मी माझ्या मित्रांना याविषयी बोललो आणि आम्ही सर्वांनी एक निर्णय घेतलाय. मात्र तो मी एवढ्यात सांगत नाही. हे माझे मित्र, पर्यायाने बाईंची मुलंच, सारं सांगतील. त्यांनी ते करावं यासाठी संयोजकांना मी विनंती करतो." एवढं बोलून अर्जुनराव आपल्या आसनावर बसले. अर्थातच संयोजकांनी त्या खुर्चीवरील मंडळींना बोलण्यासाठी सूचित केले. त्यांच्यात दोन महिलाही होत्या.

एकजण पुढे आले, त्यांनी सांगितले, "मी दिनेश मोरे! मला इतिहास खूप आवडायचा. बाई जेव्हा इतिहास शिकवत तेव्हा तो प्रसंग जणू जिवंत व्हायचा. माझ्या इतिहास आवडीने बाई मला दिलेरखान म्हणायच्या!" आणि त्यांनी बाईकडे पाहिले. बाई लहानग्या दिलेरखानाच्या आठवणीत रमल्यासारख्या वाटल्या. ते पुढे म्हणाले, "मी सरकारी अभियंता आहे. माझी दोन्ही मुलं सुखानं संसार करीत आहेत. फक्त आता आई नाही. वडिल तर लहानपणीच गेलेत." आणि ते आसनस्थ झाले.

दुसरे पुढे आले, "मी मिल्ट्रीतून मेजर पदावरून निवृत्त झालोय. माझा मुलगा नेव्हीत आहे. त्याचंही कुटुंब सोबत असतं. आम्ही पती-पत्नी इथं असतो. बाईंना मी कदाचित आठवत नसेन, पण आता त्या मला नक्कीच ओळखतील" असं म्हणत, त्यांनी आपल्या हाताची मधली दोन बोटं तोंडात घातली आणि बाईंच्याकडे पाहिलं. खरंच बाईंना त्यांचा छोटा 'चोख्या' आठवला. सारखी बोटं चोखणारा तो 'चोख्या'! बाई मनापासून हसल्या.

आता एक बाई पुढे आल्या. त्या म्हणाल्या, "मी भक्ती नाईक! मला बाई मांजरी म्हणायच्या." प्रतिसादासाठी त्यांनी बाईंच्याकडे पाहिले. बाई आठवत होत्या, सारखी माना वेळावत आणि डोळे मिचकावत बोलणारी 'माऊ' त्यांना आठवतेय असं वाटलं. माऊ पुढे म्हणाली, "माझे पती इंजिनिअर आहेत. मुलीचे लग्न होऊन सुखात आहे. मी वरंवार बाईंच्याबद्दल पतींना सांगायची! त्यांनाही आईची उणीव जाणवतेय."

आता एक उंचेपुरे धिप्पाड गृहस्थ पुढे आले. ते म्हणाले, "मी पोलिस निरीक्षक आहे. लहानपणीचा मी नाठाळ विद्यार्थी! बाई नसतील तर दुसऱ्या तुकडीच्या बाई मला सुट्टी द्यायच्या. शाळेत येऊ नको असं सांगायच्या. मला सुट्टी मिळाल्याचा आनंद व्हायचा. पण त्यामागचं कारण तेव्हा मला कळतच नव्हतं. जसा मी मोठा होऊ लागलो तसे कळू लागले की मी अन्य शिक्षकांना त्यांच्या वर्गात नको होतो. पण बाईंनी एका शब्दाने कधी माझ्याबद्दल तक्रार केली नाही. आज मी जो आहे तो त्यांच्यामुळेच! बाईंच्यासाठी काही करता आलं तर मला आनंदच वाटेल. पूर्वी गुरुदक्षिणा दिली जायची. आता पगारामुळे ही संकल्पना बदलली. पण या निमित्ताने आम्हा मुलांना गुरुदक्षिणा द्यायची संधी मिळतेय हे आमचे भाग्यच म्हणायचे."

एकदम शेवटच्या खुर्चीवरून एकजण पुढे आले. त्यांच्या हातात एक पेन होते. ते सांगू लागले, "माझं ध्यान शेतीवर आणि बैलांवर! शिक्षणाची गरज फक्त लिहीणे आणि वाचणे एवढीच माझी समजूत! माझी आक्का बाईपेक्षा मोठी होती. त्यामुळे बाई मला खूप लहान वाटायच्या. मी मुद्दामच शाळेत पेन आणायचा नाही. काही लिहायला सांगितलं की मी पेनाचं कारण सांगायचो. मग बाई आपलं पेन देऊन माझ्याकडून लिहून घ्यायच्या. माझ्या लग्नात त्यांनी मला हे पेन मुद्दाम भेट दिलंय. आजवर जपून ठेवलं हेच ते पेन! आमची शेती भरपूर आहे. मला वठणीवर आणणाऱ्या बाई आम्हाला जड नाही वाटत."

बाईंनी पेन पाहिला, त्यांना ओळख पटली. हा सुरेश शिंदे. सरपंचाचा मुलगा. आळशी, गप्पा ठोकत दुसऱ्याला गुंतवून ठेवणारा. "बाई तुम्ही अक्कापेक्षा लहान आहात." म्हणून जवळीक साधणारा निरागस सुरेश त्यांना चांगलाच आठवला.

आता पुन्हा एक बाई पुढे आल्या. "मी सोनम दाते. आज मी कॉलेजवर लेक्चरर आहे. जेव्हा मी पाचवीत होते तेव्हा खूप अशक्त होते. बाईंनी स्वत: लिहून एक नाटिका बसविली होती. त्यात घेतले नाही म्हणून मी खूप रडले. घरी गेले आणि आईला घेऊन आले. तर आई बाईंचीच विद्यार्थीनी निघाली. तरीही मी रडत आईला सांगत होते. "त्या मुली बाईंच्या लाडक्या" त्यांना नाटक, आणि आम्ही फक्त अभ्यास करायचा! यावर बाई आणि आई फक्त हसत होत्या. मी रडतेय याचं त्यांना काहीच नव्हतं. मला बाईंचा खूप राग आला होता तेव्हा. पण आज कॉलेजमध्ये गॅदरिंग वगैरे बसवताना मला तो प्रसंग अजून आठवतो. आता बाईसाठी काही करायची संधी दिल्याबद्दल मी

> बाई सांगतील तो शब्द मला प्रमाण. माझी आई म्हणायची, मी तुला जन्म दिला पण तू खरा बाईंचा मुलगा आहेस. आता माझी जन्मदाती आई माझ्याजवळ आहेच पण आता या दुसऱ्या आईला पण मीच सांभाळणार!" असं म्हणून त्यानं बाईंना भरल्या कंठानं विचारलं, "बाई याल ना तुम्ही तुमच्या या मुलाच्याघरी ?" उपस्थितांचे डोळे आपोआप पाझरत होते. सारे सभागृह नि:स्तब्ध झाले.

अर्जुनदादांचे आभार मानते."

एक एक करून साऱ्यांनी आपला आणि बाईंचा संपर्क किती जवळचा आहे हे सांगण्याचा प्रयत्न केला. बाईंच्यामुळे आज आपण सुखवस्तू आहोत हे ही सांगितले. श्रोत्यांना आणि खुद्द आश्रम व्यवस्थापनाला काहीच अंदाज येत नव्हता. ही कोंडी फोडण्यासाठी संयोजकांनी पुन्हा एकदा अर्जुनरावांना बोलण्याची विनंती केली. अर्जुनराव आनंदाने बोलू लागले, “आम्ही सारे शालेय मित्र आहोत, साने बाई आमच्या बाई आहेत, त्यांनी विद्यार्थ्यांना कायम स्वत:ची मुलं मानलं. म्हणजे त्या आमच्या आईच! आम्ही सारे सुखात आहोत. एवढी मुलं असताना आमच्या आईने वृद्धाश्रमात रहाणं आम्हाला शोभा देत नाही. त्यामुळे आम्ही साऱ्यांनी निर्णय घेतलाय की आम्ही बाईंना आमच्या घरी नेणार आहोत. अनेकांनी यात सभाग नोंदविला आहे. पण आम्ही बारा जणांनी सुरूवात करायचं ठरवलंय. प्रत्येकाच्या घरी बाईंनी किमान एक महिना रहायचय. साऱ्यांकडे बाई राहतील. मनोभावे आम्ही बाईंची काळजी घेऊ. खरंतर आम्ही प्रत्येकजण कायमस्वरूपी बाईंना सांभाळण्याइतके सक्षम आहोत. पण सर्वांना संधी मिळावी, बाईंना कंटाळवाणं वाटू नये हाच विचार आम्ही साऱ्यांनी केलाय.”




या अनपेक्षित वक्तव्यामुळे बाईंच्या डोळयातून आनंदाश्रू वाहू लागले. श्रोत्यांनी टाळयांचा कडकडाट केला. अर्जुनरावांचे डोळेही भरून आले. ते निस्तब्ध उभे होते. सभागृह पूर्ण शांत होते. एवढ्यात श्रोत्यांमधून चाळीसेक वर्षाचा युवक पुढे आला. त्याचे डोळे डबडबलेले होते. अनपेक्षितपणे त्याने माईक हातात घेतला. तो बोलू लागला, “मी एकटा समर्थ आहे बाईंना सांभाळायला. मी दोन वर्षांचा असताना माझे वडिल गेले. काकांनी माझं संगोपन केलं. मला वडिल नाहीत हे कोणी मला जाणवू दिलं नाही. पण एकवेळ बाईंनीच हळूवारपणे नातेसंबंध सांगताना वडिल आणि काका यांच्याबद्दल वास्तव मला सांगितलं. तेव्हा मी आठ वर्षांचा होतो. चंदनाचा हार घातलेले माझे वडिल मला समजले. बाई सांगतील तो शब्द मला प्रमाण. माझी आई म्हणायची, मी तुला जन्म दिला पण तू खरा बाईंचा मुलगा आहेस. आता माझी जन्मदाती आई माझ्याजवळ आहेच पण आता या दुसऱ्या आईला पण मीच सांभाळणार!" असं म्हणून त्यानं बाईंना भरल्या कंठानं विचारलं, “बाई याल ना तुम्ही तुमच्या या मुलाच्याघरी ?” उपस्थितांचे डोळे आपोआप पाझरत होते. सारे सभागृह नि:स्तब्ध झाले.

अर्जुनराव पुढे आले. त्याला जवळ घेऊन समजावत म्हणाले, "अरे त्या आपल्या सर्वांच्याच आई आहेत. त्या सर्वांकडे राहतील. तुला पाहिजे तेव्हा तर त्यांना घेऊन जा. साऱ्यांच्याच भावनांचा आदर आपण नको का राखायला?" या हृद्य आणि भावपूर्ण संभाषणाने सभागृह अतिशय भावुक झाले. कोणाला काय बोलावे कळत नव्हते. साने बाईंना स्वत:च्या भाग्याचा हेवा वाटला. यावर काय बोलावे सुचत नव्हते. मोठ्या अभिमानाने त्या आपल्या मुलांकडे अतीव प्रेमाने पहात होत्या. आपली सहा ते सोळाव्या वर्षीची भेटलेली ही बाळे त्यांना भूतकाळात घेऊन गेली होती. किती भाग्यवान साने बाई आणि त्यांची असंख्य बाळं!

■

सौ. सुजाता अशोक कानेटकर
अस्तित्व, १५५, केसरकरपेठ, सातारा
मोबा. ८४४६१०६४१६
फोन ०२१६२-२३०१७२



सौ. योगिता पाखले

सौ. योगिता किरण पाखले,पुणे

कवयित्री, लेखिका, हायकुकार, व्यावसायिक सूत्रसंचालिका. काव्यसंग्रह प्रकाशित.

काव्यसंवादिनी ह्या स्त्री जीवनावरील कार्यक्रमाचे व्यावसायिक सादरीकरण, वृत्तनिवेदीका, स्क्रिप्ट writer म्हणून mkn न्युज चॅनल मध्ये काम केले. सूत्र संचालन, संहिता लेखन. वेगवेगळया दिवाळी अंकात कविता, लेख, हायकू, चारोळ्या प्रकाशित. अनेक पुरस्कारांनी सन्मानीत.

# बांधावरील झाड अन बाप

होय,तूच एकमेव आहेस रे
सर्व सुख दुःखाचा साक्षीदार

बांधावर एटीत उभा.... ऊन वादळ वारे झेलत अगदी बा सारखा....

वार्धक्यातही वाकला पण अजूनही तग धरून आहेस पण यावेळी बा मात्र तुझ्या सारखा नाही रे....

फार माया केलीस बा वर

हसत खेळत लहानपण गेलं तुला बांधलेल्या झोळीतचं....

तुझ्याशीच खेळला अन मन देखील मोकळं करायचा तुझ्याकडे....

शेतात घाम गाळल्यावर तुझ्या छायेतच कोरडी भाकरी खायचा रे....

समृद्धी आज ना उद्या येईल म्हणून बियाणे पेरण्याचा जुगार दरवर्षी खेळला

कित्येक वेळा हार पदरी पडायची पण नव्याने जुगार खेळण्यासाठी तूच उभारी दिलीस....

यामुळे सावकाराच्या कर्जाचा डोंगर वाढला

बा मात्र खचू लागला

तुझा आधार कदाचित कमी पडला अन फासाची दोरी तुला अडकवून मिठी मारली ती कायमची....

तरी तू मात्र मख्ख उभा....

विटेवरील पांडुरंगासारखा !!!

पुन्हा इतिहास गिरवण्यासाठी नाही तर

उज्वल भविष्याची वाट दाखविण्यास!


सौ योगिता किरण पाखले 1111
मोबाईल ९२२५७९४६५८
डी- ९०२, कोहिनूर शांग्रीला
डेक्कन होंडाच्या मागे
शेवाळे सेंटर जवळ, पिंपरी
पुणे – ४११०१८



मानसी चिटणीस

मानसी विजय चिटणीस

अनेक वर्तमानपत्रे, मासिके यातून लेखन प्रसिध्द. सृजनभान हा काव्यसंग्रह प्रकाशित.



# ससा, कासव आणि व्यक्तिमत्व विकास...

आपले बालपण अनेक गोष्टी ऐकण्यात मोठं होतं. पंचतंत्र, ईसापनिती, बिरबलाच्या गोष्टी किंवा सिंदबाद, हातिमताई,गुलबकावली,गलिव्हर ह्या परदेशी पाहुण्यांनी आपल्याला बालपणात सोबत केली होती. पण खरं सांगू का त्यातली ससा कासवाची गोष्ट मला का कुणास ठाऊक नाहीच आवडली कधी. गोष्टीचे सार जरी कोणाला कमी लेखू नये किंवा slow and steady wins the race.. असे काही असले तरी टेक्निकली मला ती गोष्ट लहान असतानाही आवडली नव्हती आणि पटलीही नव्हती. त्यावर मी मनानेच माझी एक गोष्ट तयार केली होती. ती अशी की काही

दिवसांनी पुन्हा ससा कासवाने शर्यत करायची ठरवली पण यावेळी मागच्या अनुभवाने ससा शहाणा झाला होता. वाटेत कुठेही थांबायचे नाही असे त्याने ठरवले. ठरवल्याप्रमाणे शर्यत ठरलेल्या ठिकाणाहून सुरू झाली. शर्यत सुरू होताच मागच्याप्रमाणेच ससा धुम्म पळत सुटला. याही वेळेस गाजरांचे शेत, मऊ लुसलुशीत गवत, झुळझुळ पाणी आणि पाखरांची गाणी अशी सगळी प्रलोभनं आलीच वाटेत पण काही झालं तरी जिंकायचंच असं ठरवलेला ससा, कुठेच रेंगाळला नाही की क्षणभर थांबला नाही. सतत धावत राहिला. शर्यत डोंगराच्या माथ्यावर संपणार होती. सशाने धावता धावता मागे वळून पाहिले तर कासव कुठेच दिसत नव्हते. शर्यत जिंकायचीच या इराद्याने तो जोमाने धावू लागला आणि डोंगर माथ्यावर पोचला. पाहतो तर काय..! कासव तिथे आधीच पोचले होते. सशाचा स्वतःच्या डोळ्यांवर विश्वास बसेना. तो मनाशी विचार करू लागला, "की मागच्यावेळची एकही चूक मी केली नसतानाही कासव जिंकले कसे?"

उदास आणि निराश मनाने तो डोंगर उतरत असताना त्याला मागून कुणीतरी हाक मारली. ते होते झाडावरून पूर्ण शर्यत बघणारे माकड. ते सशाजवळ आले आणि म्हणाले "तुला कासवाने फसवले मित्रा ! शर्यत सुरू होताच तू धावू लागलास पण कासव मात्र थांबून राहिले. तू दिसेनासा झाल्यावर कासवाने त्याचे मित्र करकोचे बोलवले आणि त्यांच्या पाठीवर बसून कासव तुझ्याआधी डोंगरमाथ्यावर पोचले. तू मात्र प्रामाणिकपणे शर्यत पूर्ण करत राहिलास. कासवाला डोंगरमाथ्यावर बघून कोणताही विचार न करता हार मान्य केलीस. हे तुझे चुकलेच मित्रा." सशाचे डोळे उघडले पण बऱ्याच उशीराने. त्यानंतर कोणत्याही गोष्टीची शहानिशा केल्याशिवाय ती गोष्ट मान्य करू नये हा धडा तो शिकला.

इथे ही गोष्ट सांगण्याचे तात्पर्य हेच की बऱ्याचदा आपण केलेल्या कष्टाचे फळ दुसराच घेऊन जाताना आपण पाहतो किंवा आपले श्रेय ऐनवेळी येणारा दुसराच कुणीतरी येवून वसूल करून जातो. आपण मात्र आपण स्वतः कुठे कमी पडलो याचा विचार करत बसतो. या समस्येचं उत्तर मला वाटतं 'वेळ' हेच आहे. जी ती दुसरी व्यक्ती साधते आणि आपण गाठू शकत नाही. यात आपल्या व्यक्तीमत्वाचा बऱ्यापैकी हात असतो. आपण काय विचार करतो, कोणत्या वातावरणात वावरतो, कसे जगतो या सगळ्या गोष्टींचा आपल्या व्यक्तीमत्वावर प्रचंड प्रभाव असतो. अनेक वैयक्तीक, सामाजिक संस्कार आपल्यात नकळत रूजवले जातात. त्यांनीही आपल्या वर्तनाची दिशा ठरते. व्यवहारकौशल्य मात्र ज्याचे त्याने विकसीत करायचे असते. (आपण घेतलेल्या शालेय शिक्षणाचा आणि व्यवहारकौशल्य किंवा मूल्य शिक्षणाचा काही संबंध आहे किंवा नाही हा संशोधनाचा वेगळा विषय होवू शकतो.) मुद्दा हा की बोलणाऱ्याची गाजरंही विकली जातात. फरक असतो तो प्रेझेंटेशनचा.

व्यक्तीमत्व विकासाच्या काही पायऱ्या असतात म्हणे. ज्यामधे सेल्फ कॉन्फिडन्स,सेल्फ प्रेझेंटेशन अशा काही गोष्टी असतात. तशा त्या महत्वाच्याही आहेत. स्वतःवर जर विश्वास नसेल तर आपल्याकडे कितीही चांगल्या गोष्टी, चांगले कौशल्य असले तरी आपण ते प्रेझेंट करू शकत नाही. इथेच मग इतर व्यक्ती आपल्यापेक्षा उजव्या ठरतात. भलेही त्यांच्याकडे आपल्याईतके ज्ञान कौशल्य नसेल पण त्यांच्याकडचा आत्मविश्वास आणि वेळ साधण्याची कला त्यांना आपल्यापेक्षा पुढे घेऊन जाते. याला वेगळ्या शब्दांत व्यवहारीपणाही म्हणता येईल. तो ज्यांच्याकडे असतो ते आपल्याला हवं ते हव्या त्या क्षणी मिळवतातच आणि ज्यांच्याकडे नसतो ते कितीही टॅलेंटेड असले तरी फारसं काही मिळवू शकत नाहीत.

व्यक्तीमत्व विकास हा व्यक्तीसापेक्ष असला तरी तो करणे गरजेचं आहे. आयुष्यात यशस्वी ठरलेल्या अनेक लोकांनी स्वतःला टिश्यूपेपर प्रमाणे बनवले. टिश्यूपेपर कसा सांडलेला द्रव तेवढाच टिपून घेतो. तसेच हे लोक देखील जे जे चांगले आहे ते अंगिकारण्याचा व आपल्या वागण्यात आणण्याचा प्रयत्न करतात व यशस्वी होतात. बिरबल आणि बादशहाच्या गोष्टींत दरबारात एकदा एक प्रश्न विचारला गेला की भाकरी का करपली? विड्याचे पान का सडले? आणि घोडा का अडला? अट ही की या तिन्ही प्रश्नांची उत्तर मात्र एकच असावे. कोणालाच उत्तर सुचेना. शेवटी बादशहा बिरबलाला म्हणाला की तू सांग उत्तर. यावर बिरबल म्हणाला,"न फिरवल्यामुळे." सांगण्याचे तात्पर्य काय तर आपण जर स्वतःमध्ये बदल केला नाही. स्वतःला अपडेट ठेवले नाही. स्वतःमधल्या आत्मविश्वासाला जागे ठेवले नाही किंवा बदलणाऱ्या परिस्थितीचा विचार केला नाही तर आपलीही गत त्या सशासारखी होते जो कॅलिबर असूनही शर्यत जिंकू शकला नाही. ते केवळ स्वतःमध्ये हवा ती बदल न केल्यामुळे, व्यवहारी वागणे न शिकल्यामुळे. तेच कासवाने स्वतःला जगरहाटीप्रमाणे अपटेड केलं आणि ते पुन्हा शर्यत जिंकलं. आता आपण ठरवायचं ससा व्हायचं की कासव? Choice is ours..


@ मानसी चिटणीस
चिंचवडगाव
फोन : 9881132407



माधवी कुंटे

माधवी कुंटे

२२ वर्षे अध्यापन क्षेत्रात. कथा, कादंबऱ्या, कवितासंग्रह, ललितलेख, वैचारिक लेख,तत्वज्ञान, भाकीपर लेख, बाल साहित्य अशा विविध प्रकारातील ७८ पुस्तके प्रसिध्द आणि ६ पुस्तके प्रसिद्धीच्या मार्गावर. आकाशवाणी, दूरदर्शन,चित्रपट साठी लेखन. विविध पुरस्कार आणि पारितोषिके प्राप्त. २०१८ मध्ये गोवा साहित्य संमेलन अध्यक्ष.



# भय वितळतांना

पद्माताईंनी पिंपळेश्वराच्या मंदिरात जाऊन महादेवाचं दर्शन घेतलं . गुरुजींना अभिषेकासाठी पैसे दिले आणि शर्वरीला खूण केली. तिनं देवाचं दर्शन घेतलं होतंच. आता गुरुजींसमोर आशीर्वादासाठी झुकली. त्यांनी मनापासून आशीर्वाद देत म्हटलं , " खूप छान यश कमावलंस पोरी. अशीच यशस्वी होत राहा. आईवडिलांचं नाव मोठं कर. " तिनं पद्माताईंकडे पाहिलं त्यांचे डोळे पाण्याने डबडबले होते. बारावीच्या परीक्षेत तिनं जे यश मिळवावं अशी तिच्या आईची, शाळेतल्या / कॉलेजच्या शिक्षकांची, नातेवाइकाईंची जी अपेक्षा होती ती तिनं पूर्ण केली होती. हल्ली मेरिट लिस्ट जाहीर करत नव्हते. पण सत्याण्णव टक्के मार्क म्हणजे गुणवत्ता यादीत क्रमांक पटकावल्या सारखाच होतं. मायलेकी देवळातून बाहेर पडल्या. पद्माताईंनी शर्वरीला महागातला मोबाईल घेतला... तिचा स्वतःचा पहिला मोबाईल फोन! इतके दिवस कडक शिस्त वाढलेल्या शर्वरीला स्वतःचा मोबाईल फोन नव्हता. तिनं आनंदाने पद्माताईंकडे पाहिलं. दोघींमधली भिंत विरघळून जातेय असं पद्माताईंना वाटलं.

शर्वरीचे वडील कमलाकर लवकरच गेले. पद्माताईंची शाळेत भक्कम नोकरी होती. स्वतःचा फ्लॅट होता. थोडीफार बचत होती. त्यामुळे दोघींचं नीट निभत होतं . पण पद्माताईंनी शर्वरीला फार शिस्तीत वाढवलं होत. दोघींमध्ये जणू एक अदृश्य भिंत होती. आई म्हणेल

त्याला मुकाट्याने मान तुकवावी एवढंच शर्वरीच्या हातात होतं. आता पद्माताईंच्या इच्छेप्रमाणे मेडिकलला ऍडमिशन मिळण्याचा मार्ग खुला झाला होता. आणखी काही परीक्षा होत्या. त्या शर्वरी सहज पार करेल याची पद्माताईंना खात्री होती. पद्माताईंनी पेढे घेतले. घरी जाऊन स्वयंपाक उरकून घेतल्यावर त्या म्हणाल्या, " आता पुढल्या ऍडमिशनसाठी जी सर्टिफिकेट्स लागतील त्यांची तू जुळवाजुळव करायला लाग. तू जेवून घे. मी डबा घेऊन लवकरच शाळेत जाणार आहे. संध्याकाळी बाहेर जेवू! तुला आवडेल ते !" शर्वरीने आज्ञाधारकपणे मान हलवली. खरं तर तिला मेडिकलला अजिबात जायचं नव्हतं. पण आता आई म्हणेल तेच करायचं असं तिने ठरवलं होतं. आईला आपण किती मनस्ताप दिला... आणि स्वतःचं काय करून घेणार होतो... या विचारांनी तिच्या डोळ्यात पाणी आलं. या क्षणी तरी तिला मोबाईल सुरु करायचा होता. त्या खास बक्षिसाचा भरपूर आनंद लुटायचा होता.

पद्माताई शाळेत पोहोचल्या. बऱ्याच लवकर आल्या होत्या. स्टाफ रूम मध्ये कुणी नव्हतं. त्यांनी पुन्हा एकदा पर्समधून ' ते ' पत्र काढलं. त्या वेळचं भय त्यांच्या मनात जागं झालं. अंगावर सर्रकन काटा उभा राहिला. डोळ्यातून पाणी ओघळलं. शर्वरीचं ते पत्र त्यांनी मुद्दाम ठेवलं होतं. ते वाचलं की आपण आपल्या मोठ्या चुकीची शिक्षा भोगतो आहोत. ही वेदना जिवंत राहायला हवी असं त्यांना वाटत असे. दोन आठवडे झाले असतील त्या प्रसंगाला ! शाळेला सुट्टी होती, पण काही विशेष मुलांसाठी पद्माताई इंग्रजीचे जादा वर्ग घेत. नववीतून दहावीत जाणाऱ्या हुशार मुलांसाठी शाळेने हे वर्ग सुरु केले होते. शर्वरी घरीच होती. पण त्यांना तिचा चेहरा ओढल्यासारखा दिसत होता. परीक्षा संपल्यापासून ती थकल्यासारखी वाटत होती. परीक्षेचा ताण आता ओसरला होता. त्यामुळे खर तर ती मोकळी व्हायला हवी होती. पण कोमेजल्यासारखी वाटत होती. तुला काय होतोय शरयू ? मला सांग. असं पोटाशी धरून तिला म्हणावं असं त्यांना वाटत होतं. पण आपल्या भावना मोकळ्या कराव्या असा त्यांचा स्वभाव नव्हता. भावुक, हळवेपणा कामाचा नाही हे त्या स्वभावातून शिकल्या होत्या. विचारू शरूला एकदा असं म्हणता म्हणता ते राहून गेलं होतं.

पण त्या दिवशी त्यांना ती जास्तच अस्वस्थ वाटत होती. डोळे ही सुजल्यासारखे वाटत होते. पोर रडली बिडली की काय ? काही तरी विपरीत घडलं की काय अशा भयाचा एक -------- त्यांच्या मनात विस्तारात चालला होता. तिच्याशी तातडीने बोलायला हवं हा विचार मनात प्रबळ होत चालला. अजून दोन तुकड्यांचे वर्ग घ्यायचे होते. पण मनात भीतीचा विचित्र विळखा घट्ट होत होता. काही तरी अशुभाची चाहूल लागल्यासारखं मन कातर झालं होतं.

पण त्या दिवशी त्यांना ती जास्तच अस्वस्थ वाटत होती. डोळे ही सुजल्यासारखे वाटत होते. पोर रडली बिडली की काय ? काही तरी विपरीत घडलं की काय अशा भयाचा एक -------- त्यांच्या मनात विस्तारात चालला होता. तिच्याशी तातडीने बोलायला हवं हा विचार मनात प्रबळ होत चालला. अजून दोन तुकड्यांचे वर्ग घ्यायचे होते. पण मनात भीतीचा विचित्र विळखा घट्ट होत होता. काही तरी अशुभाची चाहूल लागल्यासारखं मन कातर झालं होतं. अखेर त्यांनी प्रिन्सीपॉलना फोन केला. तब्बेत फारच बिघडली असल्याने दोन वर्ग स्थगित करण्याची परवानगी मागितली आणि कधी नव्हे ती रिक्षा करून घरी पोहोचल्या. बेल वाजवूनही शरू दार उघडत नाही म्हटल्यावर आणखीनच धसकल्या. आपल्या किल्लीने कुलूप उघडून त्यांनी शरूच्या खोलीत धाव घेतली. खोलीत ती दिसली नाही पण मग लोम्बकळणारे पाय दिसले. मनातल्या भीतीवर मात करीत त्या पलंगावर स्टूल आडवं पडलं होत ते सरळ करत त्यावर चढल्या आणि ओढणीच्या फासातून मन सोडवत शरुला खाली घेतलं.

नंतर त्यांची भाची रेवती शर्वरीला इंजेक्शन देता देता म्हणाली, "मावशी तुला दोन सेकंद जरी उशीर झाला असता तरी शर्वरी हाती लागली नसती. आत्महत्या करण्याचं हे भयंकर पाऊल तिनं का उचललं ते नंतर ती जरा सावरली की मग तिच्याकडून काढून घे." रेवती गेली त्यानंतर त्या सुन्न होऊन शरुजवळ बसल्या. तिच्या अंगाखांद्यावरून हात फिरवत फिरवत आठवणींचा महापूर लोटला. त्यांचं रडणं त्यांना आवरताच येईना. भीती मनातून काही केल्या हलेना. नजर अशीच फिरत असताना उशीखालून कागद डोकावताना दिसला त्यांनी तो काढला. शरूने लिहिलेलं पत्र ...

झोपलेल्या शरुजवळ बसून त्यांनी व्याकुळ मनोदशेत वाचायला सुरुवात केली.

प्रिय आई ,

गेले कित्येक दिवस तुला सांगावं असं वाटत होतं. पण सांगणार तरी काय ? मला पुढचं आयुष्य म्हणजे अंधारच वाटतोय. आई, दोन पेपर्स नाही म्हणावे तसे चांगले गेले. माझ्या मनावरचा ताण वाढतोय. तुला कसं सांगावं ? मी तुझ्या स्वप्नांना पूर्ण विराम दिला हे कसं सांगू ? कोणत्या तोंडाने सांगू तुला ? शाळा, कॉलेजातले शिक्षक, नातेवाईक सर्वांच्या मोठया अपेक्षा आहेत माझ्याकडून त्या पूर्ण करता आल्या



नाहीत... म्हणजे होणारच नाहीत, तर मग हा जन्म फुकट गेला असं वाटतं आहे. तू खूप कष्ट उपसले माझ्यासाठी. तुझी स्वप्ने मला ठाऊक होती. माझी स्वप्ने मी तुला सांगू शकले नाही. मला कुणी जवळच्या मैत्रिणी नव्हत्याचं. तू मला एका कोशातच ठेवलं होतं. त्यातून मी तुझ्या पर्यंत कशी पोहोचणार? तुझी स्वप्ने पुरी करणं माझ्या हाती होतं . पण मी पूर्ण अपयशी ठरले. हवे तेवढे मार्क मिळणारच नाहीत ही भीती माझ्या गळयाभोवती आवळत चालली आहे. त्यात घुसमटत मी दिवस रेटत आहे. भीती असह्य होत चालली आहे आई. मी म्हणजे पूर्ण अपयश ! तुझ्या जगण्यावरचा कलंक ! हे असं निरर्थक जीवन जगायचं तरी कशाला ? माझ्या जगात सध्या काळोख आहे. मी जो जो भीती दूर सरते तो तो ती माझ्या नसांमधून जोरात वाहायला लागली आहे. हे असं जगणं संपवून टाकायचं. कणाकणाने मारण्यापेक्षा एकदम मरण चांगलं ना ? जगले वाचले तरी मी गरीब बिचारी पराभूत म्हणून जगणार ! माझं चित्रकार होण्याचं स्वप्न तर पूरं होणारच नाही. ब्रशचा फटकारा मारण्याएवढा आत्मविश्वास शिल्लक नाही. पण तुझं स्वप्न ही मी नाही पूरं करू शकणार ! मन मारून अभ्यास केला. पण दोन पेपर नाही मनासारखे गेले. यापुढे अभ्यासाची उमेदच शिल्लक नाही. आई मला माफ कर. पुढल्या जन्मी पुन्हा तुझी मुलगी होईन आणि तुझं स्वप्न पूरं करीन.

तुझी अपयशी मुलगी
शरू

त्या दिवशी त्यांच्या मनात जी खंत निर्माण झाली ती अजून मूळ धरून आहे. आपण कसं समजून घेऊ शकलो नाही तिला ? आणि तिचं हे दाट होत गेलेलं नैराश्य कसं लक्षात आलं नाही ? आई म्हणून आपण सपशेल अपयशी ठरलो. हे त्यांच्या मनाला डाचत राहीलं. नंतर शरूबरोबर सतत राहताना मानसोपचार तज्ञांकडे तिच्यासह जाताना त्यांच्या मनात सूक्ष्म भीती लावलवत राहिली. आज तिच्या दणदणीत यशाने ती भीती कोमट झाली आहे. दोघींमधली भिंत ढासळते आहे. किती चुकीच्या भीतीने केवढ्या भयानक गोष्टीचा निर्णय शरूने घेतला होता. संपलंच असत सारं. त्यांनी पत्र परत पर्समधे टाकलं. आता तिची स्वप्न पुरी करायला हवीत. हा निश्चय मनात एखाद्या कोवळया किरणासारखा पसरला. पद्माताई अधीरतेने शाळा संपवून घरी परतण्याची वाट बघत राहिल्या.

माधवी कुंटे
५०२/ ५०३ नारायण निवास,
हनुमान रोड , विलेपार्ले पूर्व,
मुंबई - ४०००५७.
भ्रमण ध्वनी - ९८१९६७९५५०



ऋचा कर्वे

ऋचा कर्वे

कवयित्री, लेखिका, निवेदिका,

प्रतिवर्षी दिवाळीअंकातून कविता, कथा, ललितलेखन प्रकाशित.

ललित लेख, आणि कथांना राज्यस्तरीय पुरस्कार प्राप्त.

निवेदिता प्रतिष्ठान तर्फे कथाकथन स्पर्धेत उत्तेजनार्थ पारितोषिक प्राप्त.

छंद - वाचन लेखन प्रवास

निवेदिता ग्रुपची वाचक...

# पाऊस

नभ आले धरेवरी
आज पाउस होऊन
कोणी घातली ग साद
मेघमल्हार गाऊन

नशा गंधील मातीची
वारा शहारला मनी
निळया डोळयांचा पिसारा
दूर थिरकला वनी

दाही दिशात घुमली
शीळ ओली पाखरांची
झंकारली रानातून
तान कोकीळस्वरांची

धून सावळया नभाची
पावसाचे अलगूज
रुणझूणे पानोपानी
हळविशी कुजबूज

खोल रुजला पाऊस
ओल भिनली उरात
स्वप्न घेऊन हिरवे
आले लावण्य भरात



# बाईची जात



घनघोर वादळात
जशी थरथरे वात....
तशी लढे आयुष्याशी
बाईमाणसाची जात....

लाख नियम बंधने
तिच्या साध्या जगण्यास....
कसे मिळावे स्वातंत्र्य?
श्वास मोकळा घेण्यास....

आभाळाची ओढ तिची
उंबऱ्यात थबकते.....
पार क्षितिजा जाण्याची
आस पाउली थिजते......

आशा आकांक्षांचे कोंब
होरपळून निघती.....
तिच्या स्वप्नांचे मनोरे
सारे कोसळून जाती...

मनाविरुद्धचा सारा
कोण खेळ हा मांडतो?
नाच ग घुमाचा फेर
पुरे आयुष्य कोंडतो.....

कुणी खुडावी गर्भात
किती निर्भया बनती....
हुंडाबळीत जळती
नसे कशाची गणती....

बाई पणाची जात ती
जात काढावी खणून......
तिला जगायचे आहे
फक्त माणूस म्हणून.....

ऋचा कर्वे
११, श्रीकृष्णकुंज हाऊसिंग सोसायटी,
३२३, नवी पेठ, मयूर लॉन्ड्रीवर,
पुणे ३०.
७७५७८२६२९३



स्वाती बेडेकर

स्वाती बेडेकर

गोष्ट एका पॅडवुमनची*

पॅडमॅन चित्रपटात अक्षयकुमारने जो रोल केलाय ते आयुष्य प्रत्यक्षात जगले.

विज्ञान शिक्षणाचे काम करत असताना एक गोष्ट लक्षात आली. आणि **सखी**या जैविक व सर्वांना परवडणाऱ्या सॅनिटरी नॅपकिन्सचा जन्म झाला.या सखी पॅडसच्या वर्षभराच्या कोट्याची किंमत फक्त ३००रु आहे.(महिन्याला १०प्रमाणे १२महिन्यांच्या १२०पॅड ची किंमत). *हायजीन बकेट* *चॅलेंज* या योजना राबवल्या.

# जगावेगळ्या बायका! म्हणजे कशा?



अझीवा कासीम आणि मी

अगदी सर्व सर्वसामान्यांसारख्या. कधी फैशनेबल तर कधी साध्या सुध्या. कुटुंबासाठी झटणाऱ्या, कधी बिझनेस मध्ये चतुराई दाखवणाऱ्या, कधी गृहिणी, कधी माता, कधी शिक्षिका, कधी बँकर, कधी डॉक्टर सर्व ठिकाणी आपापली भूमिका निभावणाऱ्या. मग त्या जगावेगळ्या कशा? कारण याच जगण्यात त्यांनी असे काही केले की ज्यामुळे जगण्यात एक बॅलन्स येईल. या बायकांनी आपले आयुष्य जगताना, आपल्या जबाबदाऱ्या निभावताना आपल्या भोवतीच्या जगात जे कमी आहे, जिथे ताळमेळ नाही तिथे तो आणण्याचा प्रयत्न केला. परिणाम मिळो न मिळो पण या प्रयत्नांना सोडले नाही. स्वतःची वाट चालताना लागणाऱ्या छोट्याश्या पायवाटेवरल्या रानफुलानाही त्यांनी कुरवाळले,

पाण्याने सिंचन केले. कधी पणती होऊन कुठल्याशा अंधाऱ्या कोपऱ्याला उजळून टाकले.

कधी एकट्या तर कधी घोळक्याने त्यांनी जगण्यावर त्यांची छाप सोडली. अशा काही गोष्टी तुम्हाला सांगणार आहे, जगावेगळ्या बायकांच्या!

इंटरनॅशनल फेडरेशन ऑफ युनिव्हर्सिटी वूमेन (Graduate Women's International).

काळ 1918-19 च्या आसपासचा. संपूर्ण जग महायुध्दाच्या आगीत होरपळून निघाले होते. युद्धाची सर्वात मोठी झळ खरे तर बायका आणि मुले याना सर्वात जास्त बसते. मग त्या समाजातल्या कुठल्याही थरामधील असोत. तेव्हा जरूर होती की या विखुरलेल्या समाजाला एकत्र कसे आणता येईल या विचाराची. ग्रेट ब्रिटन मधील व्हर्जिनिया ग्लिडेर्विक, कॅरोलिना स्परजिओन आणि रोज सिडविज यांच्या नेमकेच हे मनात आले. ज्यांना शिक्षण मिळाले आहे, त्यांनी जर प्रेमभावनेचा प्रचार केला, पुढील पिढी वर प्रभाव टाकला तर युद्धाची पुनरावृत्ति टळू शकेल असा हा विचार होता. त्यांनी जगातील इतर युनिव्हर्सिटीच्या पदवीधर बायकांशी संपर्क साधायला आणि आपल्या मनातल्या योजनेचा प्रसार करायला सुरुवात केली. आणि वर्षभरातच अमेरिका आणि कॅनडा तुन अनेक पदवीधर बायका त्यांच्याबरोबर जोडल्या गेल्या. आंतरराष्ट्रीय शांतता प्रक्रिया कशी सुरू करता येईल याविषयी आपले विचार मांडू लागल्या.

पुढच्याच वर्षी म्हणजे 1919 मध्ये एका मोठ्या परिसंवादाचे आयोजन केले गेले. जगभरातल्या जवळ जवळ 20 देशातल्या पदवीधर बायकांनी या परिसंवादात भाग घेतला.

मुंबईतही Women graduate Union म्हणून संस्थेची सुरुवात झाली. भारत हा जरी ब्रिटिश कॉलनी होता तरीही मिनू लाम नावाच्या एलफिन्स्टन कॉलेज मध्ये कायद्याचा अभ्यास करणाऱ्या स्त्रीने भारताचे नेतृत्व या परिसंवादात केले होते.☺

पुढे भारतातील सुशिक्षित स्त्रियांनी मिळून 'इंडियन फेडरेशन ऑफ युनिव्हर्सिटी वूमन'स असोसिएशन्स' ही संस्था सुरू करून शिक्षणातून शांतता ह्यावर कार्य करायला सुरुवात केली. एमी रुस्तमजी या संस्थेच्या पहिल्या अध्यक्षा होत्या.

स्त्रियांना शिक्षण हे मुख्य ध्येय असलयाने उच्च शिक्षण मिळवण्याच्या संधी मुलींना उपलब्ध करून देणे यावर संस्थेचा भर असतो. या संस्थेच्या चौदा शाखा भारतात कार्यरत आहेत. मुलींना शिक्षण मिळावे म्हणून अनेक लहान मोठ्या शिष्यवृत्ती संस्थेतर्फे दिल्या जातात. मुंबईतील WGU ही शाखा अनेकांना माहीत असेलच. त्याच्या तर्फे शिष्यवृत्ती तर दिल्या जातातच. परंतु पॉलिसी लेव्हल वर काही काम व्हावे म्हणून युनिटेड नेशन्स, अनेक देशांची सरकारे यांच्या बरोबर विचार मंथन केले जाते.

या इंटरनॅशनल आणि नॅशनल संस्थेने शंभर वर्षे पूर्ण केली आहेत. स्त्रियांना शिक्षण, त्यांचा समाजकारणात सहभाग जेणेकरून समाजात बरोबरी, न्याय, सर्वांना संधीची उपलब्धी राहिल आणि शांतता प्रस्थापित होईल.

त्यासाठी जागतिक पातळीवर ब्रिटिश आणि अमेरिकन महिलांच्या बरोबरीने डॉ. बिना राय आणि चित्र घोष या भारतीय महिलांनीही मोठे उपक्रम सुरू केले आहेत. जगातील सुधारक देशामध्ये महिलांसाठी कार्य करण्यासाठी त्यांनी शिष्यवृत्ती सुरू केल्या आहेत.

अझीवा, एक तरुण मुलगी. दिसायला साधीशी, वयाने लहान अगदी छोट्या छोट्या कारणांनी आई वडिलांना हाक मारेल अशी. परंतु असे सामान्य आयुष्य सर्वांना मिळतेच असे नाही. तुम्ही एखाद्या इराक सारख्या इस्लामिक देशात मायनोरिटी म्हणून राहात असाल तर कधीच नाही.

अझीवा याझदि कम्युनिटी मधली मुलगी. याझदि म्हणजे मध्य आशिया मधील एक स्थानिक जमात आहे ज्यांनी इस्लाम स्वीकारला नाही. सर्व ठीक ठाक सुरू होते जोवर ISIS नावाच्या राक्षसाने मध्य आशियाला ग्रासले. इस्लामच्या नावाने फक्त दहशतवाद फैलावणारी ही संघटना.

एखाद्या धर्माचे पालन न करणे किंवा स्वतःच्या धर्माप्रमाणे वागणे हा गुन्हा कसा काय होऊ शकतो? आणि ह्या गुन्ह्याची शिक्षा ठरवायचा अधिकार कोणाचा? परंतु काही धर्मांध अतिरेकी हा त्यांचा अधिकार समजतात. अझीवा इराक मधील सिंजल या ठिकाणी राहात होती. इसिस येणार येणार अशा अनेक धमक्या अनेक दिवस ते ऐकून होते. एक दिवस खरेक्सह वडिलांनी तिला इसिस साठी खंडणी गोळा करत असल्याची बातमी दिली. कसेही करून वडिलांना इतर कुटुंबीयांना घेऊन पळून जाण्यास तिने भरीस घातले. काही दिवसातच तिच्या गावावर हल्ला झाला आणि उर्वरित कुटुंबीय मारले गेले. जुलमी लोकांच्या नियमा प्रमाणे बायकांना आणि मुलींना ते ठेऊन घेत गुलाम म्हणून.

अझीवा कडे शिक्षण होते, स्वप्ने होती. साऱ्या जुलूमाना तोंड देऊन तिने तिथून पळ काढला. वेगवेगळे देश फिरत ती आज जीनिवा युनिव्हर्सिटी मध्ये पोचली आहे. राहिलेले शिक्षण पुरे करण्यासाठी.

आपल्या आप्तांना शोधून काढण्यासाठी. आणि हजारो लोकांच्या आयुष्याची वाताहत करण्याचा अधिकार कोणी दिला हा जाब विचारण्यासाठी.

तिचे वय आहे अवघे चोवीस वर्षे. एका रेफ्युजी चे आयुष्य ती जगत आहे. डोंगरा एव्हढा लढा एकटीने लढण्याचा

वसा तिने घेतला आहे. पण तिच्यातील अवखळ लहान मुलगी मात्र अजून जिवंत आहे. UNIGE मध्ये विद्यार्थी म्हणून रहाताना जेव्हा मदतीचा पहिला हप्ता मिळाला तेव्हा आता कॉलेज मध्ये जायचे म्हणून तिने बूट खरेदी केले.

समाज म्हणून अझीवा आणि तिच्या सारख्या अनेक मुलींची स्वप्ने आपल्याला जपता येतील का?

अझीवा कासीम ची गोष्ट तुम्हाला BBC documentaries मध्ये पहाता येईल.

वूमन'स इंटरनॅशनल च्या शिक्षणातून शांती या परिषदेत खास आकर्षण होते झामास्वातझि दालमिनी मंडेला यांना ऐकण्याचे, त्यांना भेटण्याचे.

स्वातझी, जे त्यांना स्वतःला म्हणून घ्यायला आवडते, झेनानी मंडेला यांच्या कन्या आणि नेलसन आणि विनी मंडेला यांच्या नात म्हणजे पौत्री आहेत. त्यांना ह्या गोष्टीची पूरेपूर जाणीव आहे. त्यांच्या नावाशी जोडलेले मंडेला हे नाव त्यांना प्रसिद्धीही देते आणि एक मोठी जबाबदारीही.

लहान पणापासूनच शिक्षण, समाजाचे सक्षमीकरण आणि स्वातंत्र्य या गोष्टी त्यांच्या मनावर चांगल्याच बिम्बल्या गेलेल्या आहेत. नेल्सन आणि विनी मंडेला या आजी आजोबांचे शिस्तपूर्ण संस्कार त्यांचे पाय जमिनीशी बांधून ठेवतात असे त्या सांगतात.



1919 सालाची इंटर नॅशनल फेडरेशन ऑफ युनिव्हर्सिटी विमेनची पहिली कॉन्फरन्स. यामध्ये भारताच्या मिनू लाम यांचाही सहभाग होता.



झामास्वातझि दालमिनी मंडेला सोबत

मोठ्या नावाशी निगडित असले की अपेक्षाही मोठ्या असतात. परंतु हेतू शुद्ध ठेवून आपल्याला झेपेल असेच काम प्रत्येकाने करावे हेही त्या सांगतात. दरेकाची पॅशन आणि आवड यानुसारच काम होऊ शकते. त्यामुळे त्यांची आवड म्हणजे लहान मुले आणि पॅशन म्हणजे शिक्षण त्या क्षेत्रातच काम निवडले. साऊथ आफ्रिकेतील ग्रामीण भागामध्ये कंटेनर मध्ये वाचनालय सुरू करण्याचे कार्य त्यांनी सुरू केले. आतापर्यंत अशी चौदा वाचनालये त्यांनी बनवली आहेत आणि सर्वदूर पोहोचेपर्यंत हे काम सुरू ठेवण्याचा त्यांचा इरादा आहे.

कुठल्याही नावांनी प्रतिष्ठेच्या ओझ्याखाली दबून न जाता आपल्या प्रयत्नांनी मंडळांच्या कार्याला वेगळ्या उंचीपर्यंत घेऊन जाण्याचा हा मार्ग उत्तम आहे.

हा एक प्रयत्न होता जगभरातल्या काही मैत्रिणींचे अंतरंग जाणून घ्यायचा आणि कदाचित त्यांच्यात आपलेच प्रतिबिंब पाहण्याचा.

स्वाती बेडेकर
९८२४०५८६७५
अ-१-३० जय रणछोडदास सोसा.,
मकरंद देसाई रोड, वडोदरा - ७




सुलभा गुप्ते

सुलभा गुप्ते.

निवृत्त शिक्षिका. आर्मी ऑफिसरची पत्नी. भारत भ्रमण. प्रदेश भ्रमण. अनुभवाने समृद्ध. त्यामुळे लेखनात आलेली समृध्दता आणि परिपक्वता.

# सुळावरची पोळी



कोल्हापूरच्या सरदार मोहित्यांची पत्नी सुलक्षणा देवींनी चौथ्यांदा कन्येला जन्म दिला. सुधारक, पुरोगामी विचारांच्या मोहिते घराण्याला पुत्रजन्माने झाला असता तितकाच आनंद कन्येच्या जन्मानेही झाला. घरोघरी साखर वाटण्यात आली, सनई, चौघड्याच्या मधुर संगीताच्या जोडीने कन्येचे नाव शालीन ठेवण्यात आले. चारही मुली सरदार घराण्याला साजेशा वैभवात वाढत होत्या.

सरदार मोहित्यांची राजवाड्याशेजारीच एका आर्मी ऑफिसरचे ब्रिटिशकालीन घर होते. त्यांची मुलगी लहानपणीपासून शालीनची मैत्रीण होती. त्यांच्या घरातील स्वच्छता, टापटीप, अंकलचे स्मार्ट वागणे, बोलणे ऑंटीच्या झुळझुळीत शिफॉनच्या साड्या, लिपस्टिक,बॉबकट,सफाईदार इंग्लिश बोलणे,टेबल

म्यॅनर्स इ. ने प्रभावित झालेल्या शालीन ने वयाच्या सहाव्या, सातव्या वर्षीच निश्चय केला होता " लग्न करीन तर आर्मी ऑफिसरशीच!'

एकामागोमाग मागण्या येऊ लागल्या. आईच्या आग्रहावरून 'दाखवण्याचे 'कार्यक्रम होऊ लागले. काहीही कारण नसताना

शालीन नकार देत होती. अखेर आईने विचारले,

'बाळ तुझ्या मनात काय आहे? उगाच नकार देण्याने आमच्या नावाला काळिमा लागतो. मनात आले ते सांग. आम्ही जबरदस्ती करणार नाही"

"आईसाहेब, लग्न करीन तर आर्मी ऑफिसरशीच! नाही तर जन्मभर कुमारी राहीन. "

" हे काय भलतेच खूळ ?"त्यांनी कपाळाला हात लावला.

आर्मी वाल्यांचा जीव कसा धोक्यात असतो, सरहद्दीवर,युद्धावर कुटुंबापासून दूर राहते लागते, जीवन किती खडतर असते वगैरे सांगून मन वळवण्याचा प्रयत्न केला पण शालीन आपल्या निर्णयावर ठाम होती.

आर्मी ऑफिसर कुठून शोधणार? वैभवशाली कुटुंम्बातील मुलीशी लग्न करण्याची हिम्मत, खडतर जीवनाची खात्री असणारा आर्मी वाला तरी करेल का? अशक्य! पण हितचिंतक नातेवाईक गप्पा बसतात थोडेच? एक दिवस भल्या पहाटे एक जवळच्या खेड्यात राहणारी दूरची मावशी अचानक आली .

" ताई ऊठ !" शालीन साठी स्थळ घेऊन आलेय. तिला हवे तसे. लाखात एक. .शोधून सापडणार नाही. आमच्या छोट्याशा खेड्यात शेतकरी आहेत.दोन मुले शेती करतात, तिसरा आर्मीत आहे. "

सुलक्षणाबाईंचा चेहरा काळवंडला.

"अगो! मुलगा लाखात एक असेल ! पण कुठे आमचे सरदार घराणे, गाड्या, घोडे, नोकर चाकर दरबारी मान सन्मान ! दर्जा!

खेड्यातील शेतकऱ्याचा मुलगा. घराणे अशिक्षित,,खेडवळ राहणी,घरकाम?"

झोपेतून उठून आलेल्या शालिनच्या कानांवर बोलणे पडले. "आईसाहेब! मी ह्याच मुलाशी लग्न करणार! नाहीतर कुमारी राहणार!"

त्यांनी घाबरत,घाबरत सरदार साहेबांच्या कानांवर घातले.. त्यांच्या रागाचा पारा खवळला.

"अशी शंभर कुळे आम्ही पोसतो. अशा भिकारड्या घरात आमची मुलगी सून..? दळभद्री, करंटी, कार्टी! सगळा दोष तुमचा. असल्या मूर्ख मुलीला जन्म दिलात. तिची वकिली करता? तुम्ही ,तुमच्या लाडक्या मुलीचा हात धरून माझ्या घरातून चालत्या व्हा. तोंड दाखवू नका. "

आईसाहेब अपराध्यासारख्या खाली मान घालून उभ्या राहिल्या. बराच वेळ धुमसल्यानंतर ते म्हणाले ,

“येव्हढे काय सोने लागून राहिलेय?"

"आपलाच दाम खोटा आहे. हट्टी आहे, बिथरली तर कुमारीच राहील, आपली नाचक्की होईल. .मन मारून का होईना तिच्या पाठीशी उभे राहावे लागेल ..शांतपणे विचार करावा."

सकाळी बघू. आम्हास एकांती राहू द्या. "(निस्तब्ध शांतता)

रात्रभर विचार करून राजहट्ट, स्त्रीहट्ट ,बालहट्ट, इथे तर कन्याहट्ट !

मनाविरुद्ध निर्णय घेणे अपरिहार्य होते.

"आपलाच दाम खोटा आहे. हट्टी आहे, बिथरली तर कुमारीच राहील, आपली नाचक्की होईल. .मन मारून का होईना तिच्या पाठीशी उभे राहावे लागेल ..शांतपणे विचार करावा."

सकाळी बघू. आम्हास एकांती राहू द्या. "(निस्तब्ध शांतता)

रात्रभर विचार करून राजहट्ट, स्त्रीहट्ट ,बालहट्ट, इथे तर कन्याहट्ट !

सकाळी बाहेर येताच ड्रायव्हरला बोलावून सांगितले,

"गणपत, आशापुरात जा, शेतकरी अण्णासाहेबांना, असतील तसे वाड्यावर घेऊन ये."

बैलगाडीतून आलेल्या मावशीबाईंचा भाव रातोरात वधारला. जाताना आलिशान गाडीने निघाल्या.

संस्थानचा गणवेष घातलेल्या शिपायाने अदबीने लखोटा अण्णांच्या हाती दिला. तातडीने वाड्यावर या, वाचून ते घाईने अंगरखा, धोतर, मुंडासे बदलून तातडीने, त्याच गाडीतून निघाले.

वाड्यावर स्वतः सरदारसाहेबानी दार उघडून स्वागत केले. चहा ,फराळ येताच अण्णांनी मुद्द्याला हात घातला ."

"आपले चिरंजीव सैन्यात ,असून लग्नाचे आहेत. आमची कन्या शालीन पदरात घ्यावी, स्वीकार करावा अशी विनंती करतो. "

स्वप्न, भ्रम की भास ?

अण्णांनी मनात अंबाबाईला नमस्कार केला व बोलू लागले ,

"आम्ही साधी, खेडवळ, शेतकरी माणसे ! असे काही स्वप्नातही अपेक्षित केले नाही. परंतु प्रस्ताव आपल्याकडून आलाय म्हणून विधिलिखित मानून स्वीकार करतो. औपचारिता नको "

दारा आडून ऐकणाऱ्या राणी साहेबांनी लगेच मिठाईची ताटे बाहेर पाठवली.

"राणीसाहेब बाहेर या लवकर, आनंदाची बातमी आहे, अण्णांकडून होकार आहे. "

सुलक्षणदेवी लगबगीने बाहेर येऊन त्यांच्या शेजारी बसल्या.

सरदार मोहिते- "चला तर! आपण लगेच बोलणी सुरु करू या. लवकरात लवकरच चा मुहूर्त धरावा असे आम्हास वाटते. "शुभस्य शीघ्रम !" अण्णासाहेब लग्न इथेच आमच्या वाड्यात व्हावे. आमच्या इतमामास शोभेल असे सर्व

आम्ही आनंदाने करू. आपण आपल्या अपेक्षा, अटी सांगाव्यात, अशी मी आपणास विनंती करतो . "

अण्णा-"छे :!छे :!:माफ करा ! काय बोलता हे आपण?

आम्ही घरंदाज, स्वाभिमानी शेतकरी आहोत. खूप मोठी शेती आहे. जीवाला जीव देणारी चार कुटुंबे आहेत आमच्या शेतावर भरपूर गुरे वासरे आहेत. आम्ही सर्व कुटुंबीय स्वत: मेहनत करतो. शेती उत्तम चालते. देवाच्या दयेने विहिरींना भरपूर पाणी आहे. आम्ही अत्यंत आनंदात, सुखात आहोत. हेच आमचे वैभव, हीच आमची श्रीमंती! आमची कोणतीही अपेक्षा किंवा अट नाही.. आपल्या वैभवाला साजेशा कोणत्याही लौकिक ,पारमार्थिक वस्तू, हुंडा, पैसे, दागिने, वस्त्रालंकार आम्हास नकोत हीच आमची अट आहे. ते सर्व इथेच वाड्यावर शोभून दिसते. आमच्या खेड्यातील घरात ते विसंगत दिसेल .

लग्न साधेपणाने व्हावे .तो खर्च आपण हवा तर सैन्यातील जवानांच्या गरजू विधवांना किंवा कुटुंबियांना द्यावा.. ते सुद्धा आर्मीतील अधिकाऱ्याशी लग्न करण्याची कन्येची इच्छा आहे म्हणून! ती सुद्धा एकप्रकारे देशसेवाच आहे. .आपण फक्त शकुनाचा नारळ देऊन कन्यादान करावे.

आपले गुरुजी सांगतील त्या मुहूर्तावर आम्ही वरात घेऊन येऊ."

आपण ज्यांना साधा अशिक्षित शेतकरी समजत होतो त्यांचे हे उच्च विचार ऐकून सरदारसाहेब अत्यंत प्रभावित झाले, शरमिंदे झाले. मात्र विवाह थाटामाटात करण्याचे त्यांचे स्वप्न स्वप्नच राहिले.

गुरुजींनी १० दिवसानंतरचा मुहूर्त काढून दिला. लग्न साधेपणाने करण्याचे ठरल्यामुळे कोणतीच खरेदी नव्हती. आठ दिवसात जवळची नातेवाईक मंडळी (लाजे काजेस्तव बोलावलेली आली. )

वाड्यासमोर मांडव, साधी फुलांची सजावट, रोषणाई नाही, भपका नाही. रागरंग पाहून पाहुण्यांच्या उत्साहावर पाणी पडले. सर्व गप्पं गप्प . मौनम सर्वार्थ साधनं!

विवाहाचा दिवस उजाडला. नवरदेव सुशांत, आई वडील, मोठा भाऊ, वहिनी आणि मानकरीण मावशीबाई. हो! आता त्या वरपक्षाकडून आल्या होत्या. मागोमाग आशापुऱ्यातील सर्व गावकरी, अशी वरात वाड्याजवळ येऊन पोचली. बैलांच्या गळ्यातील घंटांचा आणि घुंगुरमाळांचा मधुर आवाज ऐकून सगळ्यांनी चपापून पहिले. अगदी बरोबर ओळखलंत आपण! वरपक्षाची वरात चक्क बैलगाड्यातून आली होती. एकंदर एकवीस बैलगाड्या. वरपक्षाची वरात! त्यामुळे, बैलांना एकापेक्षा एक सुंदर मखमली झुली, शिंगाना बेगड, गळयात घुंगूरमाळा व कवड्यांच्या माळांनी सजवले होते.

सर्वात समोर सुशांतचे चार मित्र मिलिटरी युनिफॉर्म मध्ये मार्चिंग करत होते. वऱ्हाड पोचल्याची खूण म्हणून त्यांनी एकसाथ हवेत आवाजाच्या फैरी झाडल्या.

किती नयनरम्य दृश्य होते! जगावेगळी वरात! डोळ्यांचे पारणे फिटावे इतके सुंदर पण .. .. .. ..

दृश्य पाहून वधूपक्षाकडील सर्वांनी नाके मुरडली. सुशांत व त्याचे मातापिता खाली उतरले. सगळ्यांना दुसरा प्रचंड धक्का बसला. फक्त सुशांतने रेशमी पेहराव घातला होता. अण्णांनी साधा सुती अंगरखा, धोतर, मुंडासे व स्त्रियांनी किंचित बरी पण साधीशीच नऊवारी लुगडी नेसली होती. कुंणाच्याही अंगावर एक फुटका मणी नव्हता. काळ्या पोतीत ओवलेला जेमतेम एक छोटासा सोन्याचा मणी! एकजात सगळ्या लंकेच्या पार्वती!!!

सुतकी चेहऱ्याने लग्न पार पडले.गावकरी मात्र आनंदात होते. जेवणावळी पार पडल्या आणि वरपक्ष, जसे आले होते तसेच बैलगाड्यातून वरात घेऊन परतले .

कोणालाच अधिक थांबण्यात स्वारस्य नव्हते. पाहुणे ताबडतोब पांगले. घर सुने झाले. बाबासाहेब व आईसाहेबांच्या डोळ्यातले अश्रू थांबत नव्हते. कन्या सासरी गेली म्हणून नव्हे. ........

इतकी शिकवून मोठी केली, लाडाकोडात वाढवली ,मुलीने मात्र डोळ्यांवर पट्टी बांधून जळत्या आगीत उडी घेतली. आता जन्मभर तिची होरपळ होईल ह्या काळजीने! जगात झाली एव्हढी छी थू पुरे झाली. इतर मुलींनी व व्याही लोकांनी संबंध तोडले.

इकडे शालीन मात्र आनंदात होती, मनाप्रमाणे आर्मी तला नवरा मिळाला होता. दिवेलागणीला वऱ्हाड आशापुऱ्यात पोचले. कुळंबिणीने भाकर तुकडा ओवाळून नवीन सुनेला घरात घेतले.

गृहप्रवेश केला त्याच क्षणापासून शालिनची तारेवरची कसरत सुरु झाली.. छोटीशी वस्ती असलेल्या

विवाहाचा दिवस उजाडला. नवरदेव सुशांत, आई वडील, मोठा भाऊ, वहिनी आणि मानकरीण मावशीबाई. हो! आता त्या वरपक्षाकडून आल्या होत्या. मागोमाग आशापुऱ्यातील सर्व गावकरी, अशी वरात वाड्याजवळ येऊन पोचली. बैलांच्या गळ्यातील घंटांचा आणि घुंगुरमाळांचा मधुर आवाज ऐकून सगळ्यांनी चपापून पहिले. अगदी बरोबर ओळखलंत आपण! वरपक्षाची वरात चक्क बैलगाड्यातून आली होती. एकंदर एकवीस बैलगाड्या. वरपक्षाची वरात! त्यामुळे, बैलांना एकापेक्षा एक सुंदर मखमली झुली, शिंगाना बेगड, गळयात घुंगूरमाळा व कवड्यांच्या माळांनी सजवले होते.

गावात अर्थात वीज नव्हती कंदिलाच्या मिणमिणत्या उजेडात देवाला, वडीलधाऱ्यांना नमस्कार केले, अंधुक प्रकाशात हसत खेळात ताज्या ज्वारीच्या पिठाच्या गरम,गरम भाकरी, पिठले व मिरचीचा ठेचा. जोडीला गूळ. पहिल्याच घासाला शालिनला जबरदस्त ठसका बसला. कसाबसा एक तुकडा तिने गूळ लावून,लावून ,पाणी पीत. घशाखाली उतरवला .. घर म्हणजे नारळाच्या झावळयांनी शाकारलेली, लांब लचक झोपडी !खोल्या खूप (किती कोण जाणे),दारे,खिडक्या नाहीच.

आयुष्यात प्रथमच बैलगाडीने प्रवास केल्यामुळे शालिनचे सगळे अंग दुखत होते. ती खूप थकून गेली होती. सुशांतने हात धरून तिला त्यांच्या "खोलीत' नेले .दार नव्हतेच. तरटाचा पडदा लावला होता. त्याने दाखवलेल्या सुम्भाच्या खाटेवर, सतरंजीवर तिने अंग झोकून दिले व ती गाढ झोपी गेली. समजूतदार सुशांत मात्र तिचाच विचार करत शेजारी पहुडला होता. केव्हातरी त्याचाही डोळा लागला.

पहाटे सुमारे चार वाजले असतील. बाहेरून आवाज आला,

"वहिनी! चला! आपल्याला जायचे आहे". "अरेच्चा! हा तर मोठ्या जाऊबाईंचा आवाज! उजाडले सुद्धा नाही, अन म्हणे, चला,जायचे आहे! सासुरवासाचा हा काय प्रकार!? "

"मला कुठेही जायचे नाही. तुम्ही जा, हवे तर!'

"नाही,नाही! मी तुम्हाला सोडून जाऊ शकत नाही, तुम्हाला यावेच लागेल !"

शालिनचा नाईलाज झाला. आळोखे पिळोखे देत, आळसावलेली ती बाहेर आली. जावेने तिचा हात धरला व काही न बोलता, मुकाट्याने त्या ,कंदिलाच्या मिणमिण प्रकाशात शेताच्या दिशेने तिला नेऊ लागल्या.

वाचकहो! श्वास रोखून धरा, कारण इथून पुढे जे वर्णन आहे तेच कथाबीज आहे.

जाऊबाई दबक्या आवाजात सांगू लागल्या ,

"झपाझपा पावले उचला. झुंजूमुंजू व्हायच्या आत आपल्याला आपला कार्यभाग उरकून घरी परतायला हवे."

शालिनला काहीच कळेना.हा काय प्रकार आहे! ती काकुळतीला अली, तिने दुबळा प्रयत्न केला,

आपला नवरा आर्मीत असून दारू पित नाही, सिगरेट ओढत नाही हे तिच्या लक्षात आले. ,तिने मनोमन देवाचे आभार मानले. तिसऱ्या दिवशी त्यांच्या स्वागतासाठी मेसमध्ये डिनर पार्टी होती. मधुर संगीत, नृत्य, सुग्रास जेवण! आनंदाच्या लाटेवर हेलकावतच दोघे रूमवर आले.

"जाऊबाई! क्षमा करा! मी घरातील सर्व कामे करीन ,पण अर्ध्या रात्री हे ........ "

जावेने तिला पुढे बोलूच दिले नाही, तिच्या तोंडावर हात ठेवला, तिला बळेच खाली बसवले ,

"पटकन उरकून घे. कोणाची चाहूल यायच्या आत "

मिट्ट काळोखात आता तिच्या डोक्यात लख्ख प्रकाश पडला. काय "उरकून घे. "

तिच्या पोटात गोळा उभा राहिला. ते काय पंख्याचे बटण आहे? दाबले की पंखा सुरु व्हायला?"

जावेने हात धरूनच ठेवला होता. "ऊठ आता,चल घरी"

कधी स्वप्नातही पहिला नाही, किंवा कल्पना केली नव्हती असा तो दिव्य अनुभव, लग्नानंतरचा पहिलाच!

तीन दिवस हाच प्रकार. अखेर तिचे डोके भयंकर दुखू लागले. तिसऱ्या दिवशी तिने सुशांतला आपल्याला प्रातःर्विधीच न झाल्याचे सांगितले .. आता कुठे तिची अवघडलेली स्थिती त्याच्या लक्षात आली. आपल्या घराला ना संडास, ना बाथरूम! तरटाचा आडोसा! बिचारीने तीन दिवस कसे काढले असतील?

त्याने स्वतःला खूप दोष दिला.

सकाळ होताच ,'आम्ही देव दर्शनाला जाऊन येतो ' असे आई, अण्णांना सांगितले. देवदर्शनाच्या नावाने कोणीच आडकाठी घेतली नाही. दोघे निघाले ते बसने सरळ पुणे गाठले. मेसमधील सुव्यवस्था, शिस्त, बडदास्त पाहून शालीन खुश झाली. अभिनंदनासाठी मित्रांची रीघ हास्यविनोद, गप्पा. तेव्हाच आपला नवरा आर्मीत असून दारू पित नाही, सिगरेट ओढत नाही हे तिच्या लक्षात आले. ,तिने मनोमन देवाचे आभार मानले. तिसऱ्या दिवशी त्यांच्या स्वागतासाठी मेसमध्ये डिनर पार्टी होती. मधुर संगीत, नृत्य, सुग्रास जेवण! आनंदाच्या लाटेवर हेलकावतच दोघे रूमवर आले. बेड शेजारच्या टेबलावर काय होते?

कुठलाही आनंद चिरकाल नसतो ह्याचा लगेच प्रत्यय आला. आर्मी ऑफिसर च्या पत्नीच्या जीवनाची ओळख लवकरच टप्प्या टप्प्याने होत गेली.

"आर्मी हेड क्वार्टर कडून तार आहे, सीमेवर शत्रू सैन्याची जमवाजमव सुरु झाली आहे. युद्धाचे ढग जमू लागलेत. रजेवरील सर्वांनी तातडीने ड्युटीवर रुजू व्हावे"

दारू न पिता सुशांत झपाटल्यासारखा, बॅग भरता भरता सूचना देत होता.

"हा चेक घे, उद्या बँकेतून पैसे काढ ,बँकेचा पत्ता कोणीही सांगेल, सकाळी मेस सोड, काल ओळख झालेल्या मिसेस वर्मा बरोबर रहा. मेसची माणसे घर दाखवतील, सामान नेण्यास मदत



करतील. स्वतःची काळजी घे. येतो मी. बाय डार्लिंग !"

ती अवाक होऊन बघत, ऐकत होती. दुसऱ्या दिवशी मेसच्या माणसांच्या मदतीने तिने रुम सोडली, सामान हलवले, पैसे काढले.

मिसेस वर्माने तोंडभर हसून स्वागत केले. समवयस्क असल्याने दोघी हसत खेळत राहत होत्या .सरहद्दीवर युद्ध चालू होते ..फक्त रेडिओ व वर्तमानपत्र हीच बातम्या कळण्याची साधने. सैनिक परत कधी येतील किंवा येणारच नाही , शाश्वती नाही. शालिनने जवळच एक छोटा फ्लॅट घेतला व एकटीचा संसार मांडला ..कोर्सेस जॉईन केले, छंद जोपासणे सुरु केले.

जवळ जवळ एक वर्षाने सुशांत घरी आला, आला तो बदलीची बातमी घेऊनच. भाड्याच्या फ्लॅट सोडून आर्मी फ्लॅट मध्ये स्थलांतर. घर सजवणे, दीर्घ विरहानंतरचा सहवास. मजेत आयुष्य चालू होते. एक वर्षाच्या आतच कन्या रत्न झाले, दुधात साखर.

सहा महिन्यात शालीन दुसऱ्यांदा गर्भवती झाली, पण बदल्यांचे सत्र सुरु झाले दूर बॉर्डरला बदली झाली. पुन्हा घर सोडणे, शिफ्टिंग, पॅकिंग, एकटे राहणे.

आर्मी हॉस्पिटल मध्ये प्रसूती. जवळ मिसेस वर्मा. एव्हाना ती अनुभवाने समृद्ध झाली होती. स्वतःच्या हिंमतीवर पुण्यात जमीन घेतली, आवडीनुसार बंगला बांधून घेतला लहानपणी शेजारच्या अंकलचा होता तसा सुंदर, हिरवळ, बाग. सुशांत येऊन जाऊन असायचा. कित्येक आव्हानांना यशस्वीपणे तोंड देत खंबीर राहून स्वप्ने पूर्ण केली.

मुलांचे शिक्षण, विवाह पार पाडले.

आज निवृत्त आयुष्य सुखाने, शांतपणे पार पाडत आहेत. जगावेगळ्या लग्ना पासून आजपर्यंत अनेक आंबट गोड आठवणी जोडीला आहेत. .

लष्कराची नोकरी, म्हणजे सुळावरची पोळी, दोघांच्या प्रेमाने पुरणाची पोळी बनली.

सुलभा गुप्ते
३३, रक्षक सोसायटी, पिंपळे निलख,
औंध, पुणे, ४११०२७
९९६७४७९९२०
Major_gupte@yahoo.com




तनुजा इनामदार

वर्तमानपत्रे, मासिके आणि दिवाळी अंकासाठी विविध प्रकारचे लेखन लेखन. कवितांचे कार्यक्रम.

# श्रावण माझा



थेंब टपोरे पानांवरती
मोती सजती झाडांवरती
सुवास घेऊनी कुंद धुंद हा
श्रावण माझा आला ग||

क्षणात बदले रंग नभाचा
भरून येई उर ढगांचा
ऊनपाऊस खेळत खेळत
श्रावण माझा आला ग||

दुथडी भरून वाहते सरिता
घन निळा जणू कृष्ण सावळा
वनराईला खुलवीत भुलवित
श्रावण माझा आला ग ||

© मना

# तो आणि ती

ती म्हणाली,
रोज नाही भेटायचं,
उगाच सारखं सारखं
फोन वर ही नाही बोलायचं,

तो पडला मनाचा फकीर
झोकून देऊन जगणारा
तो तो क्षण त्यावेळी
भरभरून जगणारा

ती मैत्रीच्या रेषेवर उभी,
प्रेमापासून दूर,
हा प्रेमाच्या रेषेवर उभा
पण मनात काहूर


आपण आवडतो त्याला
तिला पक्क माहीत
पण मैत्रीच्या पुढे
हिची पावलं पडत नाहीत.

उगाच मनात हुरहूर
मैत्री जपेल ना तो,
मित्र म्हणून कायम
सोबत असेल का तो?

तो म्हणतो आयुष्य
प्लॅन करून नसतंच जगायचं
नात्याचं देखील नाव ठेऊन
बारसं नसत करायचं,

जे आहे ते स्वीकारून
जगत राहायचं असतं
आयुष्यातले कुणा बद्दल
काही वाटण्याचे क्षण
भरभरून जगायचं असतं.
© मना

तनुजा समित इनामदार
A/103, वनाझ परिवार सोसायटी,
शास्त्री नगर कोथरूड पुणे 38
९०४९७४५९९९





निशा वर्तक

निशा वर्तक
दिवाळी अंकासाठी कथा, लेख लिहते, कविता लिहते.

# मदनबाण



आज मी पाहिले त्याला नेहमीसारखेच तिच्याकडे!! तिच्या पुढ्यात मस्त दरवळत होता तो!! पण कुणाची तरी तो वाट पाहात होता... त्याची नजर भिरभिरत होती.. आतुर झाला होता तो तिला पाहण्यासाठी, तिला आनंद देण्यासाठी... तिला खुलवण्यासाठी!! तिच्या केसांत विराजमान होण्यासाठी.

माझी नजर त्याच्याकडे गेली आणि मला खूप भरून आले गं.... तुझी खूप आठवण आली!! माझे पाय आपसूकच वळले त्याच्याकडे. मी ही मोहरले गं त्या धुंद सुगंधाने आणि त्याच्या त्या शुभ्र धवल लांब भरगच्च पाकळ्या पाहून!! पण तो मला व्याकुळ दिसला, मला विनवू लागला..'घे न मला, भेटव ना मला , तुझ्या सखीला... ती का येत नाही? माझ्याशिवाय तिला आणि तिच्याशिवाय मला शोभाच नाही. तिच्या काळ्याभोर लांब केशसंभारावर मी किती खुलुन दिसायचो आणि तिचं सात्त्विक सोज्वळ सुंदर रूप आणखी खुलुन दिसायचं'.

मला खूप गहिवरून आले गं!! पुर्वीची तू मला आठवली... मदनबाण केसांत माळुन चोहीकडे दरवळणारी तू... किती गोड दिसायचीस... गो-या गो-या तुझ्या कांतीवर आणि काळ्याभोर केशसंभारावर तो किती खुलुन दिसायचा. तोही खुश असायचा आणि तुही ! तुला किती आवडायचा तो! तू येताना, अगोदर त्याचा सुगंध यायचा आणि समजायचं कि तू येत आहेस!!! तुझ्या येण्याची वर्दी तो आधीच द्यायचा!!

हे सारे आठवून माझे डोळे पाणावले, टचकन डोळयात पाणी आले.... मी घेतले त्याला माझ्या ओंजळीत आणि हळुवार कुरवाळले आणि श्वासात भरभरून घेतलं...... सा-या स्मृतीने माझ्या मनाचा गाभारा सुगंधीत झाला.

मी विचार करू लागले ह्यात तुझा काय दोष? तो त्याचा फुलण्याचा, दरवळण्याचा धर्म पाळतोय मग तू का म्हणुन तुझ्यावर लादलेला धर्म पाळावा!! तू केसांत माळलास गजरा तर काय बिघडणार आहे? का नाही माळायचा तू गजरा? कुमारी असताना तर माळत होतीस ना? मग आता का नाही? तुझा सखा आता जरी नसला तरी तुझ्या मनात, ह्रदयात तर तो आहेच न!! त्याच्यासाठीच तू आता माळायचास गजरा... त्या सा-या आठवणी, सारी ह्रदयाची स्पंदने तुझी तू पुन्हा आंत आंत अनुभवायची... त्या निमित्ताने तुझा प्रिय सखा तुला क्षणभर भेटल्या सारखे वाटेल!! मी ठरवलेय तुझ्याशी मदनबाणाची भेट घडवायचीच!! तू घेशील ना त्याला ओंजळीत ? मला माळायचा आहे त्याला तुझ्या केसात... मोडुन तोडुन टाकायची आहेत सारी बंधने. बदल हा तर निसर्गाचा नियम आहे न!! मग आपण का नाही बदलायचं?

आपण आपली संस्कृती सोडून द्यायची असं माझं बिलकुल म्हणणे नाही. आपली संस्कृती ही तर सर्वात श्रेष्ठ संस्कृती आहे पण काळाप्रमाणे चांगले बदल तर घडतच असतात. पुर्वी सतीची चाल होती पण नंतर समाजसुधारकांनी ती बंद केलीच न!! पुर्वी पुनर्विवाह होत नसत पण आता होतातच ना!! पुर्वी बालविवाह होत असत पण आता होऊ शकत नाहीत. हे सारे चांगले बदल कुणीतरी घडवून आणलेत. आता हा बदलही घडायलाच हवा. शेवटी आपणच आपल्यावर ही बंधने लादत असतो.

अग तोड ती बंधने आणि माळ तो तुझा आवडता मदनबाण... कुंकु सुद्धा लाव, आणि तुझे आवडते मंगळसूत्र जे तू आठवण म्हणुन जपून ठेवले आहेस सुरक्षित कपाटात ते सुद्धा घाल तुझ्या गळयात....तुझ्या सख्यालाही आनंदच होईल बघ! सुखावेल तो तुझ्याकडे बघून.

सौ निशा नंदन वर्तक
ॐ सर्वोदय सोसायटी,
विलेपारले (पुर्व), मुंबई ४०००९९
मो. नं. ९९३०२४३४८९


उषा कुळकर्णी

उषा शरद कुळकर्णी.

म. रा. वि. मं. च्या नागपूर शहर परि-मंडळातून निवृत्त. संगीत व लेखनाची आवड. आता पावेतो सुमारे ३० कथा विविध नियतकालिके व मासिकातून प्रसिद्ध. काही पारितोषिक प्राप्त.

# प्रीतीची रीत ही न्यारी



ऑफिस मधून घरी आल्या आल्या राहुलला राधिकाने विचारले,

" राहुल, हॉलचे नक्की झालंय ना...? पैसे झालेत गोळा, उद्या भरून टाकूया."

" हॉल...? कसला हॉल...?"

" अरे असं काय करतोसं. नंदन हॉल बुक करायला सांगितलं होतं ना तुला मी. प्रदर्शन आहे पुढल्या महिन्यात."

"अरे हो, मी तुला सांगायचेच विसरलो. त्या तारखेला हॉल रिकामा नाही."

" रिकामा नाही म्हणजे...? मी तर तुला किती तरी आधी बुक करायला सांगितल होतं, तरी तू......" राधिकाचा पारा हळूहळू वाढत होता.

"मला नाही जमलं जायला, गेलो तेव्हा बुक झाला होता."

" अरे पण आता प्रदर्शनाचे काय...? अवघे वीस दिवस राहिलेत."

"दुसरा हॉल बघ न.... नाही तर तारीख पुढे ढकल..."

राहुलच्या या बेफिकीर उत्तराने राधिकाचा संताप शिगेला पोहचला.

"किति सहज बोलतोस तू हे. दुसरा हॉल परवडणार आहे का क्लासला...? आणि पुढे ढकल काय.... पुढे मुलांच्या परीक्षा, सणावाराचे दिवस इतर अडचणी असतात. समजत कसं नाही तुला. सगळ्या मुलांची चित्रे तयार आहेत. केवढा उत्साह मुलांचा, त्यांच्या दुप्पट पालकांचा. आता वेळेवर त्यांना

काय सांगू...? तुला कुठल्याच गोष्टीचा सिरीयसनेस नसतोच कधी. किती निर्विकार आहेस रे तू."

राधिकाचा पारा चढलेला बघून राहुल आपल्या खोलीत निघून गेला. राधिका तिथेच दोन्ही हातांनी डोके गच्च धरून बसून राहिली. केवढ्या उत्साहानी तिने मुलांच्या चित्रांच्या प्रदर्शनाची तयारी केली होती. त्यांचे पालक अगदी आतुरतेने त्या दिवसाची वाट पाहत होते. काय सांगणार आता त्यांना, कसे तोंड देणार. रात्रभर तिला नीटशी झोपही लागली नाही. मुलांचे हिरमुसलेले चेहरे आणि पालकांच्या नाराज नजरा तिचा पाठलाग करीत राहिल्या. सकाळी ती जागी झाली तेव्हा राहुल ऑफिसला जायच्या तयारीत होता. जाताना त्याने घडलेल्या प्रसंगा बद्दल सॉरी सुद्धा म्हणण्याची तसदी घेतली नाही. तो गेला. राधिकाला रडू येऊ लागले. नेहमीचेच झालंय हे. याला कशाचच कौतुक नाही, महत्व नाही. सणवार, पाहुणे-रावळे सगळे मीच धावून करायचे. पाहुणे गेल्यावर हा घरी येणार. काही म्हंटले तर कामाचे निमित्त पुढे करणार. बस झालं आता. तिने दोन चार कपडे बॅगेत भरले, दाराला कुलूप लावले. रिक्षात बसून ती सरळ माहेरी निघून आली. तिला असे अचानक आलेले बघून आईला आश्चर्य वाटले.

" अरे आत्ता कशी काय आलीस..?" आईने विचारले.

"नको येऊ का...? जाते मग.." हातातली बॅग सांभाळत राधिका चिडून बोलली.

" अग ये न.... सहज विचारलं.."

काही तरी बिनसलंय हे आईने ओळखलंच.

बाबांनीही आईला खुणेनीच शांत राहायला सांगितलं.

वहिनीने आणलेला चहा तिने मुकाट्यानेच घेतला. आणि ती आतल्या खोलीत जाऊन झोपली. असे दोन दिवस गेले. राहुलचा साधा फोनही नाही. यामुळे तर ती जास्तच चिडली. समजतो काय स्वतःला. आता फोन आला तरी उचलणार नाही. संध्याकाळी ती आणि वहिनी चहा घेत होत्या इतक्यात राधिकाचा फोन वाजला. तिने लक्षच दिले नाही. शेवटी वहिनीच म्हणाली. राधीका बघ तरी कुणाचा फोन आहे. राधिकाने बघितले फोन राहुलच्या मित्राचा होता. तिने नाही उचलला.

"राहुलच्या मित्राचा नंबर आहे."

"मग उचल नं, बघ तरी काय काम आहे."

"कसलं काम वहिनी, मित्राकरवी काही तरी थातूर मातुर सांगून सारवा सारवी करणार तो."

"अगं कशावरून असं असेल, मित्राला काही काम असेल तुझ्याकडे. बोलायला काय होतंय..?"

वहिनीच्या आग्रहाने तिने फोन उचलला.

"हॅलो"

"हॅलो राधिका वहिनी, राहुलचा सिरीयस ॲक्सिडेंट झालाय. तुम्ही लगेच या." राधिकाने न बोलता फोन ठेऊन दिला.

"काय म्हणत होता मित्र...?"

"राहुलचा गंभीर अपघात झालाय तर तुम्ही लवकर घरी या"

"अगं मग जायला हवं..."

"कसलं गं, खोटं सगळं. मित्रा करवी आपलं काम करून घेतोय. आयुष्याबद्दल जो माणूस सिरिअस नाही त्याला अपघात तरी सिरिअस कसा होणार.??" यावर वहिनी काही बोलली नाही.

फोन पुन्हा दोन-तीनदा वाजला. आता मात्र वहिनीला राहवेना.

"राधिका.... खरच अपघात झाला असेल, तू गेली नाहीस आणि जर काही कमी-जास्त......"

हे ऐकताच राधिकाच्या मनात धडधडू लागले. खरं असेल तर...?

ती तशीच उठली.

"वहिनी मी जाऊन येते"

"थांब मी पण येते. एकटी नको जाऊस."

वहिनीने स्कूटर काढली. दोघी राधिकाच्या घरी पोचल्या तर घराला भले मोठे कुलूप.

"बघ वहिनी, मी म्हटलं ना त्याला कशाचच काही येऊन पडलं नाही."

"जरा त्या मित्राला फोन लाव आणि विचार तर."

राधिकाने अमोलला फोन लावला. "हॅलो अमोल. कुठे आहात तुम्ही."

"वहिनी मी दवाखान्यात आहे. राहुल अजूनही शुद्धीवर आलेला नाही. डोक्याला मार लागलाय."

"कुठल्या दवाखान्यात ?"

" श्रद्धा हॉस्पिटलमध्ये. मी आय सी यु समोरच थांबलोय."

दोघीही तशाच हॉस्पिटलकडे निघाल्या. राधिकाला आता मात्र रडू आवरत नव्हते. ती सारखी वहिनी लवकर चल म्हणत होती. दवाखान्यात पोचल्या तर अमोल समोरच उभा होता. राधिका लगबगीने तिकडे धावली. वहिनी स्कूटर पार्क करायला गेली.

"कसलं गं, खोटं सगळं. मित्रा करवी आपलं काम करून घेतोय. आयुष्याबद्दल जो माणूस सिरिअस नाही त्याला अपघात तरी सिरिअस कसा होणार.??" यावर वहिनी काही बोलली नाही.
फोन पुन्हा दोन-तीनदा वाजला. आता मात्र वहिनीला राहवेना.
"राधिका.... खरच अपघात झाला असेल, तू गेली नाहीस आणि जर काही कमी-जास्त......"

" अमोल... राहुल कसा आहे. डॉक्टर काय म्हणताहेत." आवाजातून काळजी झिरपत होती.

"डॉक्टरांचे प्रयत्न चालू आहेत, शुद्धीवर आल्या शिवाय काही सांगता येत नाही असं म्हणतात."

"तेवढ्यात वहिनी पण आली.

"कुठे झाला अपघात...? कसा..?" वहिनीने विचारले.

"अहो काल संध्याकाळी मी त्याला फोन केला. म्हंटल आज सुटी आहे, ये इकडे. शाम्या आणि प्रकाश पण येत आहेत, बसू जरा. तर नाही म्हणाला. मी म्हंटल का रे काय झालं? तर म्हणाला तुझी वहिनी रागावून माहेरी निघून गेलीय तिला आणायला जायचंय."

"मी म्हंटल अरे राग उतरला की येईल दोन दिवसात, तर म्हणाला नाही रे, नाही येणार ती. स्वाभिमानी आहे फार. मलाच जायला हवं, अन तसंही चूक माझीच आहे ना."

"अरे यार तू एवढा हळुवार केव्हा पासून झालास.?"

"दोन दिवसात भणभणीत दिसणा-या घराने शिकवलं सारं, बाय द वे, मी निघतोच आहे नंतर बोलू. तुमचं चालू द्या. आमचे एवढेच बोलणे झाले. त्यानंतर तासाभरातच फोन वाजला माझा. बघतो तर राहुलचा फोन. मी फोन उचलून म्हटले, "अबे यार येणार असशील तर लवकर ये.."

तसं पलीकडून आवाज आला, "हॅलो मी पोलीस इन्स्पेक्टर रोकडे बोलतोय. हा फोन ज्यांचा आहे त्यांना गंभीर अपघात झालाय. श्रद्धा हॉस्पिटलमध्ये अॅडमिट केलेय. तुम्ही लवकर तिथे पोहचा."

"हॉस्पिटल माझ्या घरापासून जवळच आहे. मी दहा मिनिटात तिथे पोहचलो पण राहुलला पाहू शकलो नाही. त्याला O. T. मध्ये नेले होते.

राधिकाच्या डोळयातील अश्रुना खंड नव्हता. इतक्यात आई बाबाही तिथे आले. सगळे राधिकाला धीर देत होते.

"अरे हो वहिनी, राहुलच्या खिशातील ह्या दोन-तीन पावत्या डॉक्टरांनी मला दिल्या त्या ठेवा तुमच्या कडे." असे म्हणून अमोलने त्या पावत्या राधिकाच्या हवाली केल्या. राधिकाने बघितले त्यातली एक पावती राहुलने तिच्या चित्रप्रदर्शनासाठी बुक केलेल्या दुस-याच एका हॉलची होती. राधिकाला भडभडून आले. टपटप ओघळणा-या अश्रूंच्या थेंबांनी पावती पार भिजून गेली. रात्र भर वेटिंग रूम मध्ये सर्वजण बसून होते. कुणाच्याच डोळयाला डोळा लागला नाही. सकाळी नर्सने आवाज दिला

"अरे हो वहिनी, राहुलच्या खिशातील ह्या दोन-तीन पावत्या डॉक्टरांनी मला दिल्या त्या ठेवा तुमच्या कडे." असे म्हणून अमोलने त्या पावत्या राधिकाच्या हवाली केल्या. राधिकाने बघितले त्यातली एक पावती राहुलने तिच्या चित्रप्रदर्शनासाठी बुक केलेल्या दुस-याच एका हॉलची होती. राधिकाला भडभडून आले. टपटप ओघळणा-या अश्रूंच्या थेंबांनी पावती पार भिजून गेली. रात्र भर वेटिंग रूम मध्ये सर्वजण बसून होते. कुणाच्याच डोळयाला डोळा लागला नाही.

"राहुल देशकर पेशंटकडचे कोण आहे इथे..?"

राधिका झटकन उभी झाली.

"तुम्हाला डॉक्टरांनी बोलावलंय."

ती आत गेली. मनात नसत्या शंका-कुशंका चे जाळे विणतच.

"पेशंट शुद्धीवर आलाय. धोका टळलाय आता." डॉक्टर म्हणाले.

"मी भेटू शकते का...?" राधिकाने विचारले.

"नाही... आत्ता नाही. अर्ध्या तासाने रूम मध्ये शिफ्ट केल्यावर. पण गर्दी करायची नाही पेशंट जवळ." डॉक्टर म्हणाले.

डॉक्टरांचे आभार मानून ती बाहेर आली. आई-बाबा, वहिनीला हे सांगताना तिला रडू आवरले नाही.

रूममध्ये शिफ्ट झाल्या झाल्या चौघेही आत गेले. वेगवेळया नळयांच्या आणि यंत्रांच्या मध्ये राहुल डोळे मिटून पडला होता. वहिनीनेच आवाज दिला.

"राहुल"

त्याने डोळे उघडले. राधिकाला पाहून तो हसला. ती थोडी जवळ गेली तसा राहूल तिला म्हणाला

"चल घरी जाऊया आपल्या."

हे ऐकताच सगळे मोठ्याने हसले आणि राधिका अधिकच रडू लागली.

इतक्यात सकाळच्या राउंडचे डॉक्टर आले. त्यांनी चार्ट बघितला, रिपोर्टस् बघितले. राहुलला तपासले अन् म्हणाले.

"अरे वा, good. nothing serious."

तसं राहुल म्हणाला " डॉक्टर सिरिअस नाही असं म्हणूच नका. मी कुठलीच गोष्ट सिरिअसली घेत नाही हीच तर तक्रार आहे माझ्या बायकोची. त्यामुळेच तर ही वेळ आली. सिरिअस नाही म्हणाल तर पुन्हा सोडुन जाईल"

तशी राधिका ओरडली, "राहुलssss गप्प बस नाहीतर....."

सगळे खो-खो हसू लागले.

■

उषा शरद कुळकर्णी
९४२०८५६८५८, ७४१०१६६५०८
३०३ विक्रम दर्शन अपार्टमेंट,
कोहिनूर कॉलोनी, सहकार नगर – २
पुणे ४११००९



# पाककृती

1 मिस्सी रोटी

साहित्य: कणिक, बेसन, ओवा, हिंग, मीठ, तिखट, तूप, पाणी.


कृती: कणिक व बेसन एकत्र करून बाकी सर्व मसाले टाका. एक मोठा चमचा तूप व पाणी टाकून पीठ मळून घ्यावे. अर्धा तास ओल्या कापडाने झाका.एक बाजू तव्यावर भाजा तर दुसरी मंद गॅसवर फुलवा.गरमागरम तूप लावून वाटा.



2 कुटकी

साहित्य : ४ ते ५ पोळया, गुळ एक वाटी,वेलची पूड अर्धा चमचा, मीठ, तूप.


कृती: पोळयांचे बारीक तुकडे करावे, गूळ घालून पाणी उकळत ठेवावे.वेलची पावडर घालून पोळयांचे तुकडे घालावे. चार ते पाच मिनिटे शिजू द्यावे. वरुन तूप घालून प्लेटमध्ये सजवावे.



3. शेंगोळे

साहित्य : २ वाट्या कणिक,१ वाटी रवा, १ वाटी तूप, तेल, मीठ, वेलची पावडर, गूळ १ वाटी.

कृती: गूळ, वेलची पावडर, मीठ घालून कणिक घट्ट मळावी. हाताने वळी बनवून त्या चे गोल रिंग तयार करून तेलात तळावे.नंतर तूपावर रवा भाजून त्या त गूळाचे गरम पाणी करुन शेंगोळे सोडावे.5मिनीटे शिजू द्यावे. गरमागरम खायला द्यावे.



रव्याचे बटाटे वडे

साहित्य

राव १ वाटी, १ मोठा उकडलेला बटाटा, आलं - लसूण- मिरची- कोथिंबीर वाटण (चवीप्रमाणे), चवीप्रमाणे मीठ, कांदा , चिमुभर साखर, बेसन, पीठ, हळद, तिखट, चिमूटभर खाण्याचा सोडा , टाळण्यासाठी तेल इ .

कृती

नेहमीप्रमाणे रव्याचा उपमा करून घ्यावा. त्यात उकडलेला बटाटा कुस्करून टाकावा. आल- लसूण- मिरची- कोथिंबीर वाटण, चवीप्रमाणे मीठ, चिमूटभर साखर, खाण्याचा सोडा टाकून मिश्रण चांगले मळून घ्यावे व त्याचे माध्यम आकाराचे गोळे करावे. वड्यासाठी भिजवतो तसे बेसन पीठ भिजवावे. वरील गोळे या पिठातून काढून टाळावेत. आपल्याला आवडेल त्याप्रमाणे चटणी, सॉस बरोबर खायला द्यावेत.

टीप - अशाच प्रकारे भाताचे केलेले वडेही चांगले लागतात.


गौरी गाडेकर

गौरी गाडेकर

बँक ऑफ इंडियाच्या अधिकार पदावरून स्वेच्छा निवृत्ती. तीन कथासंग्रह आणि दोन अनुवादित पुस्तके प्रसिद्ध. दिवाळी अंकांमधून लेखन.

# द्रौपदी



आटपाट नगर होतं
त्यात मोठमोठे वाडे होते तालेवारांचे

त्यात पाळण्यात रडत होते मुलगे
दुडुदुडु धावत होते मुलगे
शाळेत न जाण्याचा हट्ट करत होते मुलगे
मस्ती, गुंडागर्दी करत होते मुलगे

हो. त्या आटपाट नगरात
तालेवारांच्या त्या मोठमोठ्या वाड्यांत
जन्माला येत होते फक्त मुलगे

मुलगे,....मुलगे
वंशाचे दिवे

आणि हे वंशाचे दिवे पेटवण्यासाठी
आणि हे वंशाचे दिवे तेवत ठेवण्यासाठी
आवश्यक असणा-या स्त्रिया
आयात केल्या जायच्या
आसपासच्या नगरांतून

स्त्रिया,
हुंडा,
वरदक्षिणा,
मानपान
आणि असं बरंच काही
जन्मभर चालणारं

तर एक दिवस अक्रीतच घडलं
आटपाट नगरातल्या
एका तालेवाराच्या
भल्यामोठ्या वाड्यात
एक मुलगी जन्मली

दोनशे वर्षांनंतर म्हणे
त्या खानदानात
मुलगी जन्माला आली

देवाची कृपा म्हणायची
की
धाडस मातापित्याचं?
बहुधा पित्याचं

धाडस मुलगी होऊनही तिला जिवे न मारण्याचं
धाडस टोपभर उकळत्या दुधात टाकून
तिला पोटभर दूध न पाजण्याचं
धाडस खोल खड्डा खणून
दाईकरवी जिवंत न गाडण्याचं
धाडस इतर मार्ग चोखाळून
तिचं आयुष्य न संपवण्याचं

खूप मोठं धाडस पित्याचं
खूप मोठं धाडस पित्याचं

अख्ख्या वाड्याने
नव्हे अख्ख्या गावाने
पहिल्यांदाच पाहिली
लहान मुलगी दिसते कशी, हसते कशी
लहान मुलगी रडते कशी, पडते कशी

आईकाकींच्या माहेरगावीही
एव्हाना पसरलं होतं लोण
खात्रीपूर्वक मुलगा व्हावा
परदेशीही जाती कोण



सा-या पंचक्रोशीत
तिच्या तोलाची मुलगी नाही
बिचारीला मैत्रीण नाही
खेळ नाही, खेळणं नाही
नगरातल्या दुकानांतही
बाहुलीबोळकी काही नाही

रांगूही लागली नव्हती
येताहेत मागण्या तेव्हापासून
शेजारून, गावातून,
तालेवारांच्या दूरदूरहून

बाप बघतोय दिवास्वप्नं
लेकीच्या स्वयंवराची
स्वयंवर की लिलावाची बोली?
बघू. ती मोठी होईल त्यावेळी

आई मात्र चिंताक्रांत
छातीत तिच्या सदैव धडकी
काय होईल पोरीचं
वयात येईल जेव्हा लाडकी

मिळेल तिला चांगला वर
चांगलं घर, चांगलं सासर?
मिळेल छाया सुखाची?
की भाळी भोग लिहिला आहे
द्रौपदी व्हायचा
अख्ख्या खानदानाची?

गौरी गाडेकर
1/602, कैरव, जी.ई. लिंक्स,
राम मंदिर रोड, गोरेगाव (प),
मुंबई - ०४
फोन नं. ९८२०२०६३०६



शुभांगी मांडे

शुभांगी मांडे खारकर

बी ए. बी. जे . एम आय टी कॉलेज मधून मिडिया समन्वयक म्हणून निवृत्त .

वाचन, गायन, अभिनय, लिखाण हे छंद. सकाळ, प्रहार , हिंदुस्तान या पेपर मध्ये लिखाण. अनेक दिवाळी अंकात कथा, कविता, लेख प्रसिद्ध.



# कोनाडे... भिंतीतले मनातले !

मध्यंतरी एका चित्र प्रदर्शनाला गेले होते. मला स्वत:ला जरी चित्र काढता येत नसले तरी, चित्रकाराच्या भावना व्यक्त होण्याच्या त्या माध्यमाचा आस्वाद घ्यायला आवडते. अशा एका प्रदर्शनात अनेक चित्र पाहता पाहता एका चित्राने माझे लक्ष वेधून घेतले. काही क्षण मी तिथेच रेंगाळले. मग पुढे गेलेली मी परत मागे आले. काय होते त्या चित्रात? तो होता एक कोनाडा आणि ठेवली होती एक चिमणी ;म्हणजे छोटा दिवा .कंदिलाची छोटी बहिन. प्रदर्शनातून बाहेर पडले पण माझे मन त्या कोनाड्या भोवतीच रेंगाळत राहील. आणि आठवत राहीले माझे आजोळ.

माझ्या मामाचा चौसापी वाडा होता. वाडयाला दोन दरवाजे होते. गावाच्या मध्यभागी हा वाडा असल्यामुळे या वाड्यातूनच लोकांची ये-जा व्हायची. गावाच्या एका टोकापासून दुसऱ्या टोकापर्यंत जायला वाड्यातून लोकांना सोयीच व्हायचं.

वाडा प्रशस्त होता. मोठ्ठं अंगण आणि त्या अंगणाच्या चारही बाजूना भरपूर खोल्या. ओसरी , देवघर ,स्वयंपाकघर , बाळंतीनीची खोली आणि त्या पलीकडे अंगण. न्हाणीघर आणि त्या पलीकडे पडका मोकळा वाडा.

प्रत्येक खोलीत कपाट करण्याची तेव्हा पद्धत नव्हती. कदाचित कपडे, आणि इतर मौल्यवान वस्तू पेट्यांमध्ये ठेवण्याची पद्धत असेल तेव्हा. श्रीमन्ताकडे मात्र मौल्यवान वस्तू ठेवण्यासाठी तिजोऱ्या असायच्या आणि त्याही भिंतीत सुरक्षित ठेवलेल्या. कपाटे नसली तरी पण प्रत्येक भिंतीला कोनाडे मात्र नक्की असायचे. कोनाडा म्हणजे साधारण एक फुट बाय अर्धा फुट उंचीचा भिंतीतला कप्पा. हा दिसायला

जरी छोटा असला तरी यात ज्या वस्तू ठेवल्या जायच्या त्या मात्र नक्कीच महत्वाच्या आणि पटकन सापडाव्यात अशाच ठेवलेल्या असायच्या .

वाड्याच्या मुख्य दरवाज्याला दिंडी दरवाजा म्हणत असत. आणि त्या दरवाज्याच्या पाठीमागे कोनाडे केलेले असायचे. दिवेलागणीच्या वेळी या कोनाड्यात छोटे कंदील लावून ठेवलेले असायचे . दाराची कडी वाजली की दाराच्या छोट्या चौकटीतून कंदिलाच्या उजेडात नौकर किंवा घरातलं कोणी मोठं माणूस बाहेर कोण उभ आहे हे पहायचं आणि मगच दरवाजा उघडला जायचा.

मामाच्या घरातल्या ओसरीवरच्या कोनाड्यात ठेवलेले असायचे छोटे कंदील. मोठे कंदील खुंटीला टांगून ठेवलेले असायचे .

माजघराच्या कोनाड्यात असायचा आजीचा वेणी-फणीचा डबा. त्या डब्यात असायची फणी, मेणाची डबी, कुंकवाचा करंडा. तेलाची काचेची बाटली असायची दुसऱ्या कोनाड्यात आणि त्याच्या सोबतच पितळेची छोटी वाटी. तेल लावताना तेल या वाटीतूनच काढले जायचे. एखाद्या कोनाड्यात पितळेच्या डब्यात पांढऱ्या दोऱ्याचे रीळ, जाड सुई आणि पुडीचा दोरा, त्याला टोचलेली सुई आणि दोन तीन काळया पांढऱ्या गुंड्या .

स्वयंपाक घराच्या चुलीच्या वरच्या कोनाड्यात काडेपेटी आणि वापरून झालेल्या काड्या ठेवलेल्या असायच्या, एखाद्या कोनाड्यात चहा साखरेचे डबे, चूल पेटवण्यासाठी छोटीशी चिमणी, काही काळानंतर आलेल्या स्टोव्हला ....तो पेटविण्यासाठी लागणारा काकडा, काकडा बुडवायला छोटी रॉकेलची काचेची बाटली आणि पीन अशा अनेक वस्तू कोनाड्यात विसावा घेत असायच्या .

देवघरातल्या कोनाड्यात ठेवलेल्या असायच्या एखाद्या पितळेच्या डब्यात वाती , फुलवाती, सरकी काढलेला कापूस, तर कुठे पोथ्यांची चळत. हळदी-कुंकवाचे पंचापाळे अशाच कोनाड्यात ठेवलेले असायचे.

बाळंतीनीच्या खोलीत असायचा बाळाच्या गुटीचा डबा आणि छोटीशी सहान. बाळंतसोप आणि बाळाच्या बारीक सारीक तक्रारींवर आजीबाईच्या बटव्यातील अनेक औषधाचा खजिना असलेल्या पितळेचा डबा.

प्रत्येकाची जागा ठरलेली. अंधारातही सहज सापडाव्यात अशा या अनेक वस्तू वर्षानुवर्षे तिथेच ठेवलेल्या असायच्या. आजी आजोबा, काका-काकू, आई-बाबा आणि मावशी मामानी हाताळलेल्या. मायेनी, काळजीने निगुतीने जिथल्या तिथे नीटनेटक्या ठेवलेल्या.

पुढे वाडा गेला, गावं बदलली.

> प्रत्येकाची जागा ठरलेली. अंधारातही सहज सापडाव्यात अशा या अनेक वस्तू वर्षानुवर्षे तिथेच ठेवलेल्या असायच्या. आजी आजोबा, काका-काकू, आई-बाबा आणि मावशी मामानी हाताळलेल्या. मायेनी, काळजीने निगुतीने जिथल्या तिथे नीटनेटक्या ठेवलेल्या.

शहरातल्या छोट्या घरामध्ये राहायला आलो तरी मनातून आणि डोळयासमोरून ते कोनाडे काही जात नाहीत. वाड्यातले ते कोनाडे कधी मोजले नाहीत. ते भितीवरचे कोनाडे तरी मोजता येतील पण मनाच्या कोनाडांचा काय? कधी तयार झाले? कसे तयार झाले? कुनाकुनासाठी बांधले आणि कितीकिती भरले याची मोजदाद करता येईल ?

अगदी लहानपणीचा आठवतो तो कोनाडा फक्त खेळण्याचा, हुंदडण्याचा. लपाछपी, चोरपोलीस, डबा ऐसपैस, विटी दांडू, गोट्या आणि घरात खेळताना काचापाणी, पट, पत्ते, सागर गोटे हे सगळे खेळताना केलेली आणि झालेली भांडणे, मारामाऱ्या, ढकला ढकली आणि रडा पडी. केसांच्या झिपऱ्या आणि मळलेले कपडे. पण मन मात्र सदोदित आनंदी असायचं. अंगात सतत उत्साह. आयुष्यातला हा कोनाडा मला वाटत सगळया कोनाड्या पेक्षा जास्त आनंदाने , समाधानाने, कुठलीही काळजी आणि चिंता नसलेला आणि निर्मळ पणाने भरलेला आसाच होता.

जसजसे आपण मोठे मोठे होत जातो तसे तसे कप्पे वाढत जातात. तरुण पानाचे कप्पे मात्र रंगीबेरंगी, हळवे, आसुसलेले असेच आठवतात. मैत्रीणींशी मारलेल्या तासंतास गप्पा, आईची काम टाळल्यावर खावी लागणारी बोलणी, वडिलांचा धाक, भावाचा किंवा बहिणीचा काही बाबतीत मिळणारा पाठिबा किंवा सतत विरोधी पक्षाची भूमिका. वयच असं की कधी नदीला आलेला पूर आणि त्यात मारायचा सूर अशी घाई, कधी पुढचा मागचा विचार न करता धबधब्या सारख कोसळण तर कधी कातरवेळी होणार उदास मन. मन मनास उमगत नाही अशी अवस्था. तरी खूप हवाहवासा वाटणारा हा तरुणपणाचा कोनाडा.

वय वाढले, जबाबदाऱ्या वाढल्या. पती पत्नी या नात्यात बांधले गेलो. आणि त्या नात्या बरोबर येणारे अनेक नातेवाईक एकावर एक फ्री या योजनेने संसारास जोडले गेले. कधी सुखाशी, कधी दुखाशी. नाती जुळतात पण मनं जुळतातच असं नाही. आनंद, तडजोड, मनस्ताप सहन करत करत महिने वर्षे निघून जातात. काही कोनाडे आनंदाने, समाधानाने भारतात तर काही आयुष्यभर ठसठसणाऱ्या जखमांनी, कुठलाच कोनाडा रिकामा राहत नाही एवढे मात्र खरे.

मुलांच्या आठवणीचे कोनाडे मात्र आपले वय वाढते तसे तसे रंग बदलत जातात, त्यांच्या अवखळ

बाललीलांनी सुखावणारे आपले मन त्यांच्या परीक्षेतील कमी मार्कांनी हिरमुसून जाते. कधी आपण रागवतो. त्यांच्या काळजीने आपली झोप उडते. भविष्यातील त्यांच्या विरहाच्या कल्पनेने मन उदास, कासावीस होते. तर कधी त्यांच्या अपेक्षा पूर्ण करता करता थकून जातो. त्यांचे तरुण होणे आणि आपले प्रौढत्व हे स्वीकारायला जरा त्रासाचं व्हायला लागतं. कोनाड्यात मात्र भर पडत जाते.

संध्या छाया भिवविती हृदया अशी अवस्था येऊ लागते आणि मग काही कोनाडे कायमचे बंद करावेसे वाटतात. पण ते आता अधिकच स्पष्ट दिसायला लागतात. एकटेपणा, एकाकीपणा, थकलेली गात्रे यांना या कोनाड्याचा कधी कधी आधार वाटायला लागतो.

प्रत्येकाच्या मनातल्या

संध्या छाया भिवविती हृदया अशी अवस्था येऊ लागते आणि मग काही कोनाडे कायमचे बंद करावेसे वाटतात. पण ते आता अधिकच स्पष्ट दिसायला लागतात. एकटेपणा, एकाकीपणा, थकलेली गात्रे यांना या कोनाड्याचा कधी कधी आधार वाटायला लागतो.

कोनाड्यांची संख्या वेगवेगळी, आकार वेगवेगळे . तीव्रता वेगळी. काही गच्च भरलेले, काहीमध्ये एखादीच स्मितरेषा. कुठे धबधबा तर कुठे रखरखीत वाळवंट. मात्र असे एकही मन नसेल ज्यात कोनाडे नाहीत. प्रत्येकाच्या कोनाड्यात आहे आठवणीचा साठा. आठवणी सुखाच्या, दु:खाच्या , निराशेच्या, हुरहूर लावणाऱ्या, कधी अभिमानाने उर भरून येणाऱ्या तर कधी पश्चातापाच्या आगीत जाळून टाकणाऱ्या. रान कुठलेही असोत, भाव कुठलेही असोत, कोनाडे भरलेले आहेत हे नक्की .

आयुष्याच्या सांजवेळी हे कोनाडेच साथ देतात. सोबत देतात. देवघरातल्या समई सारखे निवांत. अंधाराला दूर लोटणारे आणि कोनाड्यातल्या तेलाच्या बुधलीसारखे वातीला तेवत ठेवणारे .

शुभांगी मांडे खारकर
३५, अक्षय पैलेस, वारजे,
पुणे -५२
९९७०९६७३३४






आसावरी कुलकर्णी

आसावरी कुलकर्णी.

कवयित्री शिक्षीका , विविध दिवाळी अंकात लेखन. कवी संमेलन तसेच स्पर्धांमध्ये सहभाग. सूरश्री कलामंच मधून गायन व निवेदन, यातून मिळणारा निधी गरजूंना देण्यात येतो. चारोळी संग्रह प्रदर्शनाच्या मार्गावर.



# मन बावरे

वाटणारी प्रत्येक गोष्ट
शब्दांत मांडता आली तर --
मनातली प्रत्येक भावना
बोलून दाखवता आली तर--
तुझ्या वर प्रेम आहे
हे सहज सांगता आले तर--
तुझी खूप आठवण येते
हे विसरून जाता आलं तर--
तुझ्या पलीकडे सुद्धा जग आहे
हे जाणून घेता आलं तर--
माझसुद्धा अस्तित्व आहे
हे समजून घेता आलं तर--
किती बरं होईल
जर मन वाचता आलं तर?
शब्दांपलीकडलं काहीतरी
नजरेनचं जाणता आलं तर—

आसावरी कुलकर्णी
डोंबिवली पूर्व.
९६६५९६६६४७


सौ. निर्मला देशमुख

सौ . निर्मला देशमुख,

धुळे . 99233 21777

एम . ए . बी .एड. निवृत्त शिक्षिका, वाचन, लेखन, गायन आणि प्रवास हे आवडते छंद, वृत्तपत्रे, दिवाळी अंकासाठी लेखन केले आहे. अनेक स्पर्धेत बक्षीसप्राप्त लेखन केले. स्वानंदासाठी हा छंद जोपासत आहे .

# ''मी कथा लिहिते...!''



'मी एक दोन कथा लिहिल्या आहेत. छापायला पाठवू?'

'छापायला? तुझं कोण छापणार?

'असं का म्हणताय ? '

'या 12 /13 वर्षात तू फक्त संसार केलाय? तुला लिहिता येतं हे आजच कळतय.' 'दुसरे काही करायला मला सवड तरी होती का?'

'प्रश्न तो नाही. काहीतरी खरडून पाठवू नकोस. ते केराच्या टोपलीत जाईल ....आणि दिवाळी अंकात छापून यायला तू कोण अशी मोठी लेखिका लागून गेलीय ! ते मोठमोठ्यांचे नावं पाहून मासिकात छापतात. अन् पुरेसे पोस्टेज पाठव !'

' म्हणजे कथा परत येईल असे म्हणायचे आहे का तुम्हाला !'

'मी तुला सावध करतोय. तू भोळी आहेस जगाचे व्यवहार तुला कळत नाहीत. मग रडत बसशील .'

नयना हिरमुसली. आत आत कढ आले. ' मला जमणार नाही ? का नाही ? जे इतरांना जमतं ते मला का नाही जमणार ?'

'मला काही व्हायचय.' ' मला काही करायचय ' हा आक्रोश गेले कित्येक वर्ष करत आले आहे . लग्नाला तेरा वर्ष उलटली होती पण मनातलं काही कागदावर उतरवता आलं नाही .संसाराच्या चक्रात कशी भरडून निघाली होती. वाढता संसार, येणारे जाणारे, दुखणे. या सगळ्या प्रापंचिक अडचणीतून तिचं डोकं वर निघतच नव्हतं. हे सर्व नजरेआड करून स्वतःच्या आवडीचं लेखन करत राहणं सोपं नव्हतं. त्यात काय मिळणार होतं ? लेखनाला पैसे देतात ? दिले तर ते पोटभरीचे असतात. पण मुळातच पोट भरण्यासाठी, पैसे मिळवण्यासाठी लेखन करायचच कशाला ! लेखन आपली आवड आहे .आपलं स्वप्न आहे. खूप लिहायचं....आनंदासाठी .....पण स्वतःचा स्वतंत्र विचार करायला तिला सवडच नव्हती. पण मन मोठं वाईट असतं, ते आपलं डोकं वर काढतच असतं. घर संसार,. मुले , माणसे ह्यांच्यातून मनात काही विचार यायचे आणि ती लिहित सुटायची. मनातला आक्रोश लपविण्यासाठी ती लिहायची. अन् अशाच अवस्थेत मनाने बंड केले अन् तिने कथा लिहिली ...आणि दिवाळी अंकासाठी पाठवून दिली.

' जास्तीत जास्त काय होईल? छापली जाणार नाही .एवढेच ना? नाही तरी आजवर काही मिळालं नव्हतंच ---

जवळजवळ महिना वेगळया उमेदीत गेला. निराशा मनाला शिवतच नव्हती .आणि तो दिवस उजाडला .... आज अंक निघायचा होता. पोस्टमनची वाट पहात राहिली. जेवली देखील नाही. अंक काही आला नाही. काय झालं असेल? पोस्टात गहाळ झाला असेल? की पाठवलाच नसेल? आपली कथा छापून आली नसेल तर? हे म्हणतात तसे आपल्याला अजून कोणी ओळखत नाही म्हणून स्विकारली नसेल तर?

तिला एकदम रडू फुटलं .. आजवर अनेक दुःख पचवले होते .... आणि आता आशेचा नवा अंकूर दिसला होता ..त्याच्या नाजूक, कोवळेपणाने ती हरखली होती. आयुष्याची सगळीच दिशा बदलण्याची जिद्द बांधून उभी होती .अन् मनात आलं ...हे सगळंच खोटं ठरलं तर ......

संध्याकाळी घरी आल्यावर

पुढचे चार - आठ दिवस विचित्र शांततेत गेले .आत गुदमरल्यासारखे होत होते. विचार करून आपणही लिहू शकतो. रांधा वाढा उष्टी काढा एवढेच तिला करायचं नव्हतं. तिच्या दादांनी तिला वेगळं वाढवलं होतं .आयुष्याची जाण दिली होती .अपार कष्टानं शिक्षण घेतलं होतं; मन घडवलं होतं. लग्नानंतर तिच्या आयुष्याची दिशाच बदलली होती. ती कुणी धडपडणारी , जिद्दी , महत्वाकांक्षी मुलगी होती हे विसरून गेली होती. धुक्यापलिकडचे माणूस पहावं तशी ती पूर्वायुष्याकडे पहात होती. आपल्याला मिळालेले अपयश ती कुणाला सांगणार नव्हती.

ह्यांना सांगण्यावाचून राहवले नाही ...' आज अंक निघणार होता .. अजून आला नाही .'

' पहिल्या दिवशी अंक कोण पाठवणार? केव्हातरी येईल सात आठ दिवसांनी ! ' आणि आपल्यासारख्यांनी फार मोठ्या आशा अपेक्षा करू नयेत .

' असं बोलू नका हो. माझ्या फार अपेक्षा आहेत.'


' तू धडपड कर. मात्र अपयश आल्यावर रडू नकोस .'

पुढचे चार - आठ दिवस विचित्र शांततेत गेले .आत गुदमरल्यासारखे होत होते. विचार करून आपणही लिहू शकतो. रांधा वाढा उष्टी काढा एवढेच तिला करायचं नव्हतं. तिच्या दादांनी तिला वेगळं वाढवलं होतं .आयुष्याची जाण दिली होती .अपार कष्टानं शिक्षण घेतलं होतं; मन घडवलं होतं. लग्नानंतर तिच्या आयुष्याची दिशाच बदलली होती. ती कुणी धडपडणारी , जिद्दी , महत्वाकांक्षी मुलगी होती हे विसरून गेली होती. धुक्यापलिकडचे माणूस पहावं तशी ती पूर्वायुष्याकडे पहात होती. आपल्याला मिळालेले अपयश ती कुणाला सांगणार नव्हती.

अन् एक दिवस एक दिवाळी अंक तिच्या हातात आला .त्यात तिची कथा आली होती. मुलाच्या जावळातून हात फिरवावा तसा तिनं अंकावरून हात फिरवला. दुसर्या पानावरचं आपलं नाव दहावेळा वाचलं . हे सगळं खरंच होतं का ? ह्याची खात्री करून घेत होती .

संध्याकाळी नवरा घरी आल्यावर त्यांच्यासमोर अंक ठेवला . " अरे वा ! मिळाला वाटतं अंक ! " नयनाला झालेला आनंद ती लपवू शकत नव्हती . आपल्या निर्मळ मनाच्या बायकोकडे पाहून तो फक्त हसला अन् म्हणाला , "तू किती धडपडून हे सगळं केलंस हे मी पाहिलंय .ह्यापुढे असंच यश मिळावं ...........! "

सौ . निर्मला देशमुख
शासकीय कर्मचारी वसाहत
वाडी भोकर रोड, देवपूर,
धुळे.
९९२३३२१७७७




प्रिया धारूरकर

प्रिया धारूरकर-कवयित्री ,लेखिका

स्वामी रामानंद तीर्थ, विद्यापीठ नांदेड यांच्या प्रथम वर्ष पदवी अभ्यासक्रमात जीवनी ही कविता समाविष्ट. अनेक पुरस्कारांनी सन्मानित असे (१) विदेहीआणि (२) अंग भरून वाहणाऱ्या पान्ह्यातून हे दोन काव्यसंग्रह प्रकाशित. घन दाटले स्वर-हा ललित लेख संग्रह प्रकाशित.

# महाश्वेतादेवी परिचय



ऋण के बल पर,ऋण के बल पर
दो रुपये, दस रुपये,सौ रुपये
दस सेर गेंहु,पांच सेर चावल
मुनावर हमे देता है उधार
हमे क्या मालूम करना है क्या
हम ताकते रह जाते है बेवकुफों कि तरह
और उसके पालतू लोग हमारी बाँहे थाम
बाँये अंगुठे पर लगाते है स्याही
और सफेद कागज पर लगाते है निशान
वह कागज संदुको मे रहेता है सुरक्षित
उसके पास इस तरह के हजारो है कागज
ऋण के बल पर ही वह बना है महाराज
ऋण के बल पर ही वह बना है सरकार!
उधार देकर वह सरकार बन गया
और हम बन गये बँधूआ
हम कभी मुक्त नही हो सकते!
ऋण के बल पर,ऋण के बल पर...

दास्यत्व पत्कराव्या लागणाऱ्या, परिस्थितीला शरण जाणाऱ्या, छळ सोसणाऱ्या, वेदना जगणाऱ्या आणि जागणाऱ्या, शोषित, पिडीत अशा समाजातल्या स्त्रियांनी गायलेलं हे गीत. हे गीत सापडतं 'दौलतीच्या' कहाणीत. पण मग कोण ही दौलती..?

हिमालयातल्या उत्तर काशी जिल्ह्यातल्या गावांमध्ये आजही माणसाला गुलामाची वागणूक दिली जाते. त्यांना 'बँधूआ मजदूर' असं संबोधलं जातं. गावचा जमिनदार या गुलामांना कर्जाऊ रक्कम देतो. ते कर्ज चक्रवाढ व्याजामुळे संपतच नाही मात्र हे फेडता फेडता पुन्हा नव्यानी अजून कर्ज घ्यावं लागतं. ते फेडण्यासाठीची ताकद संपलेली असते. म्हणून मग ते फेडण्यासाठी म्हणून घरातली मुलगी, बहीण, नवी नवरी यांना अक्षरश: लालबत्ती एरियात विकलं जातं. वेश्या बनवलं जातं. त्या आयुष्यभर न संपणारं हे कर्ज फेडत राहतात. त्यातली एखादी मात्र प्रतिशोध घेऊ पाहते.

विद्यार्थी दशेत असतानाच त्यांनी कम्युनिस्ट आंदोलनात भाग घेतला होता. १९४२-४३ चे आंदोलन, देशातले दुर्भिक्ष, विभाजन ते भागा आंदोलन या सर्वाचा त्यांनी अगदी जवळून अनुभव घेतला होता त्यामुळे त्यांच्यात एक संग्रामी मनोभाव रुजत गेला व तोच त्यांचा स्वभाव किंवा व्यक्तिविशेष बनून राहिला.

महाश्वेता देवींच्या कादंबऱ्यांमधून दौलती, द्रोपदी, गोहूँमनी, चंडी, सुजाता, शनिचरी अशा अजूनही कितीतरी जणी हळू हळू आपल्याला उलगडत जातात. एक वेगळाच, आपल्या कल्पनेपलीकडचा असा वास्तवपट शब्दाशब्दातून आपल्यापुढे साकारत जातो. अविश्वास वाटावा असं भयंकर वास्तव आजही जगणाऱ्या आदिवासींच्या जगण्याचं चित्रण ठायी ठायी दिसत राहतं. आणि आपण महाश्वेता देवींच्या कार्यापुढे, त्यांच्या लेखणी पुढे पुन्हा पुन्हा नतमस्तक होत राहतो.

पद्मश्री, साहित्य अकादमी, मॅगॅसेस, ज्ञानपीठ अशा अनेक उच्चतम पुरस्कारांनी सम्मानीत प्रसिद्ध बंगाली लेखिका महाश्वेता देवी यांचा जन्म १४ जानेवारी १९२६ साली ढाका येथे झाला. प्रसिद्ध बंगाली लेखक मनिष घटक यांच्या त्या सुपुत्री. त्यांचे आजोबा(आईचे वडील)प्रतिभा या पत्रिकेचे संपादक होते. घरात सरस्वतीचा वरदहस्तच. साहजिकच त्यांच्याही हाती लेखणी आली परंतु ही लेखणी मात्र स्वतंत्र विचारसरणीची, लढवय्यी, धार असणारी होती. ज्या लेखणीने कायमच संघर्षाची, कृतीची जोड घेऊनच साहित्यकृती निर्मिली. वेदनेतून, संवेदनेतून, सहानुभूतीतून साकारलेली अक्षरं, 'अक्षरसाहित्य' निर्माण करत गेली. कादंबऱ्या, कथा, नाटक, बालसाहित्य अशी एकूण १७५ पुस्तके त्यांनी लिहीली.

रविंद्रनाथ टागोर असतानाच्या काळात काही काळ त्या शांतिनिकेतन मध्ये शिकण्यासाठी होत्या तेव्हा तिथे साहित्यसभा होत असत. लेखन, वाचन प्रत्येकालाच करावे लागे व त्यावरील चर्चेतही भाग घ्यावा लागे. आपसूकच लेखणीला वळण लागत गेले असणार. त्यांचे वडील मनिष घटक, कवी कंकन चंडी, मुकुंदराम चक्रवर्ती यांच्या साहित्याचा त्यांच्यावर प्रचंड प्रभाव होता. त्यातही मुकुंदराम चक्रवर्ती यांच्या अद्भुत शब्दभांडारानी त्या प्रेरित होत्या. 'झांसी की रानी'हे त्यांचे प्रथम प्रकाशित पुस्तक.

राजनीती, वर्गसंघर्ष, जातीयता, आदिवासी, उपेक्षित आणि त्यांच्या समस्या, शोषण करणारे जमीनदार, निर्धन शेतकरी, भ्रष्ट अधिकारी हा त्यांच्या लेखनाचा मूळ गाभा.

किसान आंदोलन, वन आंदोलन, नक्षल वादी आंदोलन अशा सगळयाच आंदोलनांमधे त्यांचा सक्रिय सहभाग होता. त्यांचं स्त्री असणं कुठेही आड न येऊ देता हा सगळा संघर्ष त्यांनी त्या परिस्थितीचा एक पूर्ण भाग होऊन अनुभवला. त्यांच्या मानवतेच्या संचितातून,आपल्या लेखक असण्याच्या कर्तव्यातून, सामाजिक जाणिवेच्या भानातून त्यांनी-जंगल के दावेदार, घहराती घटाएँ, नील छवि, टेरोडेक्टील, हजार चौऱ्यासी की माँ,ईंट के उपर ईंट, भटकाव, दौलती, शालगिरह की पुकार पर, श्री श्रीगणेश महिमा, अकलान्त कौरव, अग्निगर्भ, चेट्टीमुंडा और उसका तीर, मूर्ति,कृष्णद्वादशी, बनिया की बहू, भारत मे बँधूआ मजदूर अशा अजूनही अनेक उत्तमोत्तम कलाकृतींची त्यांनी निर्मिती केली आहे.

विद्यार्थी दशेत असतानाच त्यांनी कम्युनिस्ट आंदोलनात भाग घेतला होता. १९४२-४३ चे आंदोलन, देशातले दुर्भिक्ष, विभाजन ते भागा आंदोलन या सर्वाचा त्यांनी अगदी जवळून अनुभव घेतला होता त्यामुळे त्यांच्यात एक संग्रामी मनोभाव रुजत गेला व तोच त्यांचा स्वभाव किंवा व्यक्तिविशेष बनून राहिला.

विजन भट्टाचार्य यांच्याशी विवाह झाल्या नंतर कॉलेज मध्ये त्यांनी इंग्रजी अध्यापनाचे कामही केले. काही काळ त्या आंदोलनापासून दूर होत्या. परंतू आदिवासींच्या समस्यांशी लढणं हे त्यांचं ध्येयच होतं.

देशाच्या एकूण लोकसंख्येच्या ८ टक्के आदिवासी तर १७ टक्के हरिजन यांच्या पर्यंत पाणी, शाळा, दवाखाना, सडक या मूलभूत सोयीसुविधा पुरवल्या जाण्यासाठी त्यांची आग्रही भूमिका होती. त्या म्हणतात, "आदिवासींमध्ये सगळे नैसर्गिक गुणधर्म पाहायला मिळतात जसे पहाडाचे धैर्य, नदीची शांती. प्रत्येक आदिवासी जणू काही एक महादेशच आहे. पण आपण त्यांना समजून घेतलेच नाही, उलट आपण त्यांचे क्षेत्र नष्टच करत राहीलो. कमी वेतनावर कष्ट करणाऱ्या

आदिवासींचे शोषण करत राहिलो". या संदर्भातली 'टेरोडेक्टील' ही रूपक कथा तर माध्यमातल्या प्रत्येकांनी वाचण्यासारखीच आहे.

महाश्वेता देवींचा विचार, कार्य, कृती यांच्यातल्या निरंतर समन्वयामुळेच त्या त्यांच्या लेखन कार्यातही सफल होऊ शकल्या. 'साक्षात कर्मातच मनुष्याला मुक्ती आहे' असा त्यांचा गाढ विश्वास होता जो त्यांनी सार्थ देखील ठरवला.

जमीन, जंगल, पाणी ही नैसर्गिक संपत्ती खरं तर सर्वांचीच पण ठराविक लोकांनी तिच्यावर आपली सत्ता प्रस्थापित केलेली. या साठीचा लढा, लढण्यासाठीचं बळ अडाणी, निरक्षर अशा आदिवासींमध्ये रुजवणे तसं अवघड पण त्यांनी हे पेललं. शोषितांच्या दुःखाला वाचा फोडली. त्या म्हणतात लिहिणं ही माझी हौस किंवा षौक नाहीये तर ती माझी वेदना व्यक्त करण्यासाठीची व अनेकप्रश्नांची उत्तरे शोधण्यातून निर्माण झालेली नितांत अशी गरज आहे. ही लेखनामागची भूमिका स्पष्ट करताना त्यांना या गोष्टीचे अतीव दुःख होत असे की आपल्या कडे लेखन करणाऱ्या व्यक्तीकडे निरपेक्ष पहिले जात नाही. पुरुष लेखक, स्त्री लेखिका हा लिंगभेद आजही केलाच जातो. हा भेदभाव का, नुसते लेखक म्हणून संबोधले का जात नाही? असा सडेतोड प्रश्न त्यांचा असे. या भेदभावातून तुमच्या मनाचा अस्वच्छ दृष्टिकोन व भावना, विचारांची अपूर्णताच लक्षात येते, असेही त्या म्हणतात. पुरुषांसारखं लेखन त्या करतात असा त्यांच्यावर आरोप केला जायचा तेव्हा त्या म्हणत, मी का कोणासारखे लिहीन, मी माझ्याच सारखे लिहते. कोण काय म्हणतं यांनी कधीच विचलीत न होता त्या त्यांचं कार्य अखंड करत राहिल्या. अथकतेनं लिहीत राहिल्या.

कोणत्याहीपूर्वग्रहाशिवायआपली ठाम भूमिकाघेऊन,आत्मविश्वासपूर्वक वर्तमान सत्य लेखकांनी पुन्हा पुन्हा समाजापुढे मांडलं पाहिजे, हे खऱ्या लेखकाचं उत्तरदायित्व आहे असे म्हणताना त्यांच्या कलाकृतीतून त्या ते दाखवूनही देत.

अग्निगर्भ' ही त्यांची गाजलेली कादंबरी. यात प्रामुख्याने आलेली बसाई टूडू, काली सांतरा आणि द्रोपदी ही तीन पात्र. खालच्या वर्गातला, भूमिहीन संथाल आदिवासी बसाई टूडू हा अग्निगर्भाचा नायक. जो प्रशासनातल्या अधिकाऱ्यांसाठी आणि उच्चवर्गातल्यांसाठी कायम दहशत निर्माण करणारा. अनेक वेळा मारला गेला असे समजत असताना पुन्हा पुन्हा जिवंत होणारा. वाचताना केव्हाच आपलासा होऊन जातो. तर काली सांतरा हा निव्वळ शांतिदूताचं व्यक्तित्व घेऊन वावरणारा. आणि द्रोपदी ही समस्त दलित, दमीत स्त्रीचं प्रतिनिधित्व करणारी. असंख्य वेदना सहन करूनही स्त्री शक्तीचं दर्शन घडवणारी. जिच्यावर सरकारी अधिकाऱ्यांसमोर सामूहिक अत्याचार केला जातो. या अमानुष कृत्याच्या विरोधात ती निडरतेनी लढते. असंतोषाला संग्रामात बदलणाऱ्या बसई टूडू आणि द्रोपदी या व्यक्तिरेखांच्या माध्यमातून कादंबरी समजून घेताना लक्षात येतं की समग्र भारताचं वर्तमान जीवन आकारलेलं आहे आणि म्हणूनच महाश्वेता देवी या फक्त बंगाली लेखक नसून त्या भारतीय लेखिका आहेत हे अनेक वेळा स्पष्ट होत जातं.

कोणत्याही पूर्वग्रहाशिवाय आपली ठाम भूमिका घेऊन, आत्मविश्वासपूर्वक वर्तमान सत्य लेखकांनी पुन्हा पुन्हा समाजापुढे मांडलं पाहिजे, हे खऱ्या लेखकाचं उत्तरदायित्व आहे असे म्हणताना त्यांच्या कलाकृतीतून त्या ते दाखवूनही देत.

त्यांच्या कादंबऱ्या वाचताना जाणवतं आपल्याच देशात घडणाऱ्या या सगळ्या बाबींबाबत आपण मात्र अनभिज्ञ असतो. वाचताना विद्रोह, असंतोष, चीड, उद्विग्नता आपल्यातही धुमसत राहते पण आपण स्वतःला हतबल समजू लागतो पण या सगळ्या परिस्थितीशी न्याय देण्यासाठी त्या लढल्या आहेत. म्हणूनच त्यांना 'प्रथम पंक्ती कि जुझारु लेखिका' संबोधलं जातं.

अंधश्रद्धा,रुढी,परंपरा यावर भाष्य करणारे त्यांच्या कादंबऱ्यांवरचे रुदाली, हजार चौऱ्यासी की माँ, मातीमाय, गणगोर, गुडिया, संघर्ष हे चित्रपट देखील गाजले.

जगात कुठेही शोषणकर्ता आणि शोषितांचा चेहरा एकसारखाच असतो आणि कोणत्याही देशाचा इतिहास हा साधारण मनुष्यच घडवत असतो. हाच माणूस आचार-विचारांनी, ज्ञानानी, विज्ञानानी, विवेक व्यवहारानी त्या विशिष्ट काळाला अजूनच वैशिष्ट्यपूर्ण बनवत असतो. असे म्हणणाऱ्या या व्रतीचा मृत्यू वयाच्या नव्वदाव्या वर्षी कलकत्ता येथे 28 जुलै 2016 रोजी झाला आणि एक अक्षरक्रांतीज्योती शांत झाली.



प्रिया धारुरकर
६, आलाप, ज्योतिनगर, दशमेश्वर शिवमंदिराजवळ, औरंगाबाद.
९९८०९ २२०८९


आशा पाटील

आशा पाटील

छंद - लेखन, वाचन, कथाकथन, नाट्याभिनय

व्यवसाय- शिक्षिका

लेखन साहित्य – एकूण १२ पुस्तके प्रकाशित

काव्यसंग्रह, बालकथासंग्रह, कथासंग्रह प्रसिद्ध. अनेक पुरस्कारांनी सन्मानीत. राज्यशासनाच्या हिंदी व इंग्रजी माध्यमांच्या शाळांकरिताच्या इयत्ता सातवी सुलभ भारती मध्ये समावेशित पाठ ' वाचनाचे वेड'.

# वृक्षवल्ली आम्हा सोयरे...

आपलं आयुष्य हे एखाद्या मोगऱ्याच्या फुलाप्रमाणे असते. काही मोगऱ्याच्या फुलांना कमी पाकळ्या पण सुवास भरपूर असतो. तर काही मोगऱ्याच्या फुलांना बत्तीस पाकळ्याही असतात. या पाकळ्यांचा भरपूर सुगंध असतो. देठावर पाकळ्यांचा जणू पानांच्या कोंदणात मुकुट आहे, असा भास मनात होतो. देठ हे फुलांचे अस्तित्व, आणि पाकळ्या फुलांचे व्यक्तित्व असतात. मनुष्याचे ही व्यक्तित्व असेच असते. रमालाही अनेक फुलझाडं, फळझाडं लावण्याचा छंद होता. लहान असताना, रमा जेव्हा बघावं तेव्हा एखाद्या रोपा शेजारी त्याला निरखत बसलेली दिसायची. त्या रोपावरून प्रेमाने हात फिरवत, त्याच्याशी गप्पा मारत बसलेली दिसायची. तिच्या मैत्रिणी खेळायला बोलवायला यायच्या, तेव्हाही ती खेळायला जाण्यापेक्षा त्या रोपट्याबरोबर वेळ घालवणे पसंत करायची. तिने परसबागेत छानपैकी बाग फुलवली होती. तिच्याकडे जेवढी जागा होती, तिची तिने वाटणी केली होती. काही भागात फुलझाडे, काही भागात फळझाडे तर काही भागात वेल लावले होते. उरलेल्या थोड्या भागात तुळशीची रोपे आणि सब्जांची रोपे लावली होती. तिची ही आवड घरातील कोणालाही त्रासदायक वाटत नव्हती. आईला तर तिच्या या सवयींचा खूप फायदा व्हायचा. एकतर दररोजच्या पूजेला देवाला वाहण्यासाठी ताजी फुले मिळायची. केसात माळण्यासाठी कधी गजरा, तर कधी एखादं फूल तरी नक्कीच मिळायचं. परसबागेत प्रवेश केला की सुवासानं मन दरवळून जायचं. स्वयंपाक घरात आवश्यक असणारे कोथिंबीर, कढीपत्ता, आलं, लिंबू, काकडी, तोंडली, कारली, पालेभाज्या हे तर मिळतच असे; पण सोबत फळांचाही रसास्वाद घेता येई. रमा अभ्यास सांभाळून हे सारं करत होती, हे महत्त्वाचं.

रमाला राजू नावाचा छोटा भाऊ होता. तो मात्र स्वभावाने एकदम तिच्याविरुद्ध होता. त्याला संपूर्ण वेळ मित्रांबरोबर खेळणे, मोबाइल पाहणे, संगणकावर फिल्म पाहणे, टीव्हीवर कार्टून पाहणे, रमाताईला खोड्या करून त्रास देणे आणि यातून कधी मूड आलाच तर अभ्यास करणे. मुलगा म्हणजे म्हातारपणाचा आधार, वंशाचा दिवा, वंश चालवणारा कुलदीपक. या आणि अशा अनेक भ्रामक कल्पना रमाच्या आई- बाबांच्या मनात होत्या. त्यामुळे त्याचे फालतू लाड पुरविले जात होते. रमा आता नववीत होती. अभ्यासक्रमातून मूल्यसंवर्धन होतच

असते; पण ते दैनंदिन जीवनात वापरायचे असते. हे मुलांना सांगावं लागतं. हे तिला राजू वरून दिसून येत होतं. ती जसजशी मोठी होऊ लागली, तसं तसं तिला जास्तीत जास्त वेळ अभ्यासाला देणं भाग होतं. शाळा, घरात आईला थोडी फार मदत आणि बागकाम. यात आजकाल तिला अभ्यासाला वेळ देणं कठीण होऊ लागलं. तिकडून अधून मधून राजूला बागकाम करताना मदतीला घेण्याचा प्रयत्न ती करे; परंतु राजू आगाऊ होता. तो रोपांना पाणी घालण्याचं काम सांगितलं की, मुद्दाम एवढं पाणी घालायचा की अति पाणी घातल्याने ते एकतर आडवे होई नाहीतर खराब तरी होई. ही काम टाळायची युक्ती आहे हे रमाला चांगलंच माहीत होतं; पण तरीही तिला त्याच्या मदतीची गरज पडायची. पुढच्या वर्षी ती जेव्हा दहावीला जाईल, तेव्हा तिला तिच्या छंदाला वेळ द्यायला होणार नाही. हे ती जाणून होती. म्हणूनच सवय व्हावी म्हणून ती राजूला अधूनमधून परसबागेत काम सांगत होती.

रमा हुशार असल्याने नेहमी शाळेचा पहिल्या तीनात नंबर असे. राजू मात्र कसाबसा पास होत होता. रमाने नववीलाही शाळेमध्ये तिन्ही वर्गातून पहिला क्रमांक पटकाविला होता. दहावीमध्येही यशाची परंपरा आपण कायम राखणार आहोत, असे आश्वासन तिने मुख्याध्यापक, वर्गशिक्षक तसेच आई बाबांनाही दिले होते. तिने आता या वर्षात आपण कशा पद्धतीने अभ्यास केला पाहिजे, याचे नियोजन केले. तिच्या आतापर्यंतच्या यशाचे महत्त्व म्हणजे तिचे नियोजनच होते. साधं एखाद्या कामासाठी ती बाहेर पडणार असली तर त्या दिशेला घरातल्या कुणाचं दुसरं काही काम आहे का? हे विचारून जात असे. दिवसभरात करावयाच्या कामांचे

पाहाता पाहाता वर्ष अभ्यासाच्या धामधुमीत कधी संपत आलं, तिच्या तिला कळलंच नाही. अभ्यास व्यवस्थित चालला होता. तिला दहावीच्या परीक्षेचं काहीच टेन्शन वाटत नव्हतं. ती फक्त दहावीनंतर काय? या प्रश्नचिन्हालाच जास्त घाबरत होती. राजू तर लहानपणापासून खेळात तरबेज झाला होता.

नियोजन, एकतर आदल्या दिवशी रात्री किंवा उठल्या नंतर तासात करे. तिच्या मते आज आपण काय काय करायचे हे ठरवलेले असले की ते नक्की होते. मग या नियोजनात थोडे बागकाम, टीव्हीवर बातम्या पाहणे, आईला स्वयंपाकघरात मदत याही गोष्टी सामील असत. रमाने दहावीचेही नियोजन अगदी नेटके केले होते. रमावर आई बाबांचा पूर्ण विश्वास होता. बाबांना नेहमी वाटे तिने स्त्रीरोगतज्ञ व्हायला हवे, तर आईला वाटे तिने क्लास वन अधिकारी व्हावे. तिला विचारल्यावर मात्र ती अजून काही ठरविले नाही, असे सांगत असे. ते ऐकून आई म्हणे ही,

'तू आणि कोणतीही गोष्ट न ठरवता करणं शक्य आहे का?'

यावर रमाला आपले ध्येय सांगावे की नको ते कळत नसे. कारण तिला शेतीविषयक कोर्स करण्याची आवड होती. पण आई बाबांना हे पटेल का याविषयी तिचं मन साशंक होतं.

पाहाता पाहाता वर्ष अभ्यासाच्या धामधुमीत कधी संपत आलं, तिच्या तिला कळलंच नाही. अभ्यास व्यवस्थित चालला होता. तिला दहावीच्या परीक्षेचं काहीच टेन्शन वाटत नव्हतं. ती फक्त दहावीनंतर काय? या प्रश्नचिन्हालाच जास्त घाबरत होती. राजू तर लहानपणापासून खेळात तरबेज झाला होता. कबड्डी हा खेळ म्हणजे त्याच्यासाठी जीव की प्राण होता. त्याने कबड्डीमध्ये करिअर करावे, या मताचे आई- बाबा होते. रमाला कधी कधी आई बाबांच्या मानसिकतेचं गणित कळतंच नसे. ती विचार करे, राजूला कबड्डी हा खेळ आवडतो. त्याच्यात अव्वल दर्जाही प्राप्त केलाय. म्हणून त्या खेळात करियर करू द्यायला आई-बाबा तयार आहेत. याउलट आपण शेतकी साईडचे शिक्षण घेवू इच्छितो. मात्र आपण डॉक्टर व्हावे, असे आई-बाबांना वाटते. म्हणजे मुलींना त्यांच्या मनाप्रमाणे वागताच येत नाही का? हा तिच्या मनात रूळणारा प्रश्न तिने आईला एकदा विचारला. आईने यावर तिची बाजू लक्षात घेण्याऐवजी उलटपक्षी तिची समजूत घातली. ' अगं तुझी बुध्दीमत्ता, जिद्द, चिकाटी पहाता तू डॉक्टर होणंच योग्य आहे. तू डॉक्टर होवू शकतेस, यात काही शंकाच नाही.'

'पण मला डॉक्टर व्हायला आवडत नाही.'

'मग, मग काय आवडते, बागकाम. छंद म्हणून ठिक आहे; पण यातच करिअर म्हणजे विचार करण्यासारखी गोष्ट आहे. तू डॉक्टर झाली तर...'

'झाले तर काय माझ्याकडे पैसा भरपूर प्रमाणात असेल, माझं हॉस्पिटल असेल आणि गाडी, बंगला, नोकर-चाकर.'

'मग हे खोटं आहे का?'

'तसं नव्हे गं आई.'

पण पुढं जास्त बोलून काही उपयोग होणार नाही. हे माहीत असल्यामुळे ती गप्प बसत असे. या सर्व गोष्टी बाबांना समजून सांगणे महत्त्वाचे होते. तिचं आणि बाबांचं पटत असे. एकदा ती बाबांना या विषयावर सविस्तर बोलली होती. बाबांना तिचं म्हणणं थोडं का होईना पटतंय, हे त्यांच्या चेहऱ्यावरून लक्षातही येत होते पण ते तसं बोलून दाखवत नव्हते. ती नेहमी राजूला, अभ्यासाला बसण्यावरून बोले, तेव्हा तो मला आता दुसरे महत्वाचे काम आहे, असं काही तरी म्हणून टाळत असे. ती म्हणे ही, 'आवड असली की चांगली निवड होते आणि आपोआपच सवडही मिळते.' पण तो ऐकेल तर शपथ.

तिचे दहावीचे पेपर सोपे गेले. आपला शाळेत प्रथम क्रमांक येणार,

असा तिला आत्मविश्वास होता. दहावीच्या वर्षात बागकामाकडे दुर्लक्ष झाल्याने, परसबागेतील बरीच रोपे, झाडे, वेली कमी झाल्या होत्या. त्यांच्याकडे दुर्लक्ष झाल्याचे तिला वाईट वाटत होते. तिने पुन्हा आपले लक्ष तिकडे केंद्रित केले, हे सर्व पाहून बाबा तिला म्हणतंही,

'वाडवडिलांनी कमावलेली पाच एकर शेती आहे. ती करते का बघ. तुझ्या हुंड्यात देऊन टाकू तुला.'

ते शहरात राहात असल्याने गावाकडे शेत बटईने दिले होते. पाहिजे तसे उत्पन्न काही येत नव्हते; पण शेत आहे हे सांगायचा मोठेपणा होताच.

रमा ही मग सहज म्हणे,

'हुंड्यात न्यायचीच म्हणून तर त्याची निगा, लावणी, काढणी शिकायला हवे. म्हणून तर शेतकी महाविद्यालयात घाला, असं म्हणतेय.'

यावर बाबा निरुत्तर होत. दहावीचा निकाल लागला. रमा शाळेतच नाही, तर राज्याच्या यादीत आली होती. जिल्ह्यात प्रथम आली. तिचा आनंद गगनात मावेनासा झाला. खरंच अपेक्षित फळ प्राप्त झाली की, आनंद काही आगळाच असतो हे खरं. तिचे नाव प्रत्येक वृत्तपत्रातील पानांवर फोटो, मार्कासह आले होते. अभिमानाने बाबांची छाती फुगली होती. तर आईचे मन तिच्या यशाने आनंदात न्हाले होते. तिचे नाव या एका यशाने जिल्हाभर झाले होते. तालुक्याला रहात असलेली, क्लास न लावता स्वतःच्या व शिक्षकांच्या मार्गदर्शनाने आणि स्वतःच्या स्वतंत्र प्रकारच्या अभ्यासाच्या पद्धतीने, आज ती सर्वत्र ओळखली गेली होती. तिच्या शाळेत, अनेक संस्थांकडून, जिल्ह्याच्या ठिकाणी सत्कार झाले. वृत्तपत्रात तिची मुलाखत छापून येणार म्हणून मुलाखत घ्यायला वृत्तपत्राचे प्रतिनिधीही आले. त्यांनी मुलाखतीत तिच्या यशाचे रहस्य विचारले. अभ्यासाची सचोटी, वेळेचे नियोजन, आवडते छंद, भविष्यातील अभ्यासक्रमाची निवड याबाबतीत प्रश्न विचारले. स्थानिक तसेच जिल्ह्याचे चॅनलवाले ही हेच प्रश्न घेऊन तिची मुलाखत घेत होते. ती प्रत्येकाला व्यवस्थित उत्तर देत होती. तिची दिनचर्या, वेळेचं नियोजन हे सर्वचं विद्यार्थ्यांचा आदर्श ठरणार होते. तिने कोणतीच गोष्ट हातचे राखून उत्तरं दिली नाही. सेल्फ स्टडीला महत्त्वं हवे, हेच ती पुन्हा पुन्हा सांगत होती. भविष्यातील आकांक्षा, करिअर याविषयी विचारल्यावर, मी ग्रिकल्चरल साइड निवडणार असल्याचं तिनं सांगितलं. तिच्या या उत्तरावर आई-बाबा नाराज होते. वृत्तपत्रवाले चॅनलवाले मात्र तिचा निर्णय कौतुकास्पद आहे, असे मानत होते. कारण “खेड्याकडे चला” हा आदर्श आजच्या पिढीने उचलणे खूप महत्त्वाचे आहे. वडिलोपार्जित

अभ्यासाची सचोटी,
वेळेचे नियोजन, आवडते छंद,
भविष्यातील अभ्यासक्रमाची निवड
याबाबतीत प्रश्न विचारले. स्थानिक तसेच
जिल्ह्याचे चॅनलवाले ही हेच प्रश्न घेऊन
तिची मुलाखत घेत होते. ती प्रत्येकाला
व्यवस्थित उत्तर देत होती. तिची दिनचर्या,
वेळेचं नियोजन हे सर्वचं विद्यार्थ्यांचा
आदर्श ठरणार होते. तिने कोणतीच
गोष्ट हातचे राखून उत्तरं
दिली नाही.

असो किंवा स्वकर्तृत्वावरची असो. काळ्या आईची सेवा करून, गर्भातून सोन्या, मोत्यासारखं वाणं असणार पीक घेणे, आजकाल महत्त्वाचं आहे. हे सर्वजण जाणतच होते. आजकाल वाढणारी मेडिकल, इंजिनिअरिंग, लॉ, डीएड कॉलेज यामधून दरवर्षी ब बाहेर पडणारे डॉक्टर, इंजिनिअर, वकील, शिक्षक यांची संख्या खूप आहे. या प्रकारचे शिक्षण घेणारे किती टक्के विद्यार्थी स्वतःच्या पायावर सक्षमपणे उभा राहतात. हाही एक अभ्यासाचा, चिंतनाचा विषय आहे. कोणी तरी वेगळी वाट हाताळणं महत्त्वाचं. प्रवाहासोबत पोहणं सोपं पण प्रवाहाविरोधात पोहण्यात फरक असतो.

रमाच्या मते तर, मुलींनी हर एक क्षेत्रात आपला यशस्वी ठसा उमटवला आहे. कोणतेच क्षेत्र नाही जिथे पुरुषांच्या खांद्याला खांदा लावून तिने काम केले नाही. मग या शेतकी क्षेत्रातही आजपर्यंत खूप मुलींनी करिअर केले असेल, मीही करेन. रमाच्या जिद्द, चिकाटीमुळे तिने कोणतेही क्षेत्र निवडले तरी ती यशाच्या अतिउच्च शिखरावर पोहोचणारच होती. असा आई बाबांना विश्वास होता. आज तिला जबरदस्ती डॉक्टर केले, तरी ती यशस्वी डॉक्टर होणारचं. यात वादच नव्हता पण लेकरांच्या कलाकलानं घेणं ही कधी कधी महत्त्वाचं असतं. हेही ते जाणत होते. ज्या गोष्टींची आवड असते, त्यात व्यक्ती तन, मन, धनाने काम करते. कधी कधी पैशांपेक्षाही आत्मिक, मानसिक सुख, जीवनात स्थैर्य असणं महत्त्वाचं असतं. या सर्वांचा विचार करून, शेवटी आई बाबांनी रमाला बऱ्याच वाद विवादानंतर तिचं आवडतं क्षेत्र निवडण्याची परवानगी दिली. रमाचा आनंद आज गगनात मावेनासा झाला होता. रमाने पहिल्यापासून झाडांवर प्रेम केलं होतं. त्यांच्या सानिध्यात राहायला मिळणार म्हणून तिला खूप खूप आनंद झाला सहजंच ती गुणगुणू लागली.

“वृक्षवल्ली आम्हा सोयरे वनचरे
पक्षीही सुस्वरे आळविती.”

■

सौ. आशा अरुण पाटील
साईराम न्यू सी ४२३/४२४,
विजापूर रोड, सोलापूर -४
९४२२४३३६८६



सौ. कादंबरी देशमुख

सौ. कादंबरी देशमुख

लेखिका आणि कवियत्री, लेखन आणि वाचन हे छंद. 'जीवनमार्ग' हा काव्यसंग्रह, 'रसाळ कथा' हा कथासंग्रह आणि 'एका इनामदाराची संघर्ष यात्रा' ई. पुस्तके प्रकाशित.

# निरुत्तर



परवा बऱ्याच दिवसांनी गंगुमावशीची गाठ पडली. नेहमी हसतमुख आणि अनादी दिसणाऱ्या गंगुमावशी खूपच नाराज आणि आगतिक वाटल्या. म्हणून मी विचारले, "मावशी तब्येत बरी आहे ना?"

"मला काय धाड झालीया? पर बाई, येडं व्हायची येळ आलीया बघा. मधी दोन-चार बाऱ्या तुमच्या घराकडं पावली वळली होती माझी! पर म्हटलं आमचं रडगाणं पुढं गावून तुमच्या सुखाचा जीव दुखत का म्हणून लोटा."

"अहो मावशी , असं काय मला परक्यासारखं मानता ? काय अडचण आहे सांगा पाहू आता. मला जेवढी शक्य आहे, तेवढी मदत मी करीन."

"बाई, तुमाला वाटतंय तशी अडचण पैशाची नाही. मागच्या दोन-तीन वर्सात कंदीच आली नाही. पर

गतवर्षाच्या म्हंजी ३१ डिसेंबरच्या तारखेला वरीस हुईल, कई कई हाल केल्यात साऱ्या कुटुंबाच दैवानं?"

"म्हणजे !" मी हबकूनच मावशीला नीट न्याहाळत विचारले.

> राहून राहून गंगुमावशी मला विचारात होत्या, बाई ह्यो कसला नववर्साच स्वागत म्हणून सण ३१ डिसेंबरला रातच्या बाराला साजरा कराचा म्हनं ? आपला गुढीपाडवा नववर्साचा सण, म्हणून येरवेळी सडारांगोळी करून गुडी हुबी करून किती बी गरिबी असुदे मुठीच का होईना पुरान घालून, देवाला पुरणावरणाचा निवद करतोच की!

"आवं देव देतो, आन दैव नेतं. असं झालं आमच्या घरांत!"

"असं कोड्यात बोलू नका. जे असेल ते मोकळेपणानं बोला. तुम्हाला हलके वाटेल." मी म्हणाले.

माझ्या कल्पेनेच्याही पलीकडचे गंगु मावशीने सांगितले. ते ऐकून खेड्यातही आणि समाजातील सर्व थरांत 'नवं वर्षाचे स्वागत' हा आनंदोत्सव किती विकृत स्वरूपात चंगळवादाबरोबर सर्रास धुमाकूळ घालतोय याची माहिती मिळाली. चंगळवादाचा विकृत दर्शनचं जणू! कारण कष्ट करून हातावर पॉट भरणारी गंगुमावशी आणि तिचा गरीब कष्टाळू निर्व्यसनी माळकरी नवरा गांवात शेतमजुरी करून जगात आहेत. कष्टाळू वृत्ती व प्रामाणिकपणा यामुळे त्या दोघांना कदही कामाचा, तुटवडा पडत नाही. मोठ्या कष्टाने आणि काटकसरीने संसार करतच आईबापांनी "राजाला(मुलगा) गावांतच बारावीपर्यंत शिकविले. एक छोटा कोर्सही करायला लावले. त्यामुळे राजा गावांलगतच्या शहरांतील एमआयडीसीत तीन वर्ष नोकरी करून कुटुंबाला आर्थिक स्थैर्य देत होता. धाकट्या बहिणीला राजाने दहावीनंतर कॉलेजचे शिक्षण द्यायला सुरुवात केली होती. अंगभर कापड आणि घरचं ताज अन्न हे कुटुंब समाधानानं, आनंदानं खात होतं. सारं कसं ठीक चाललं होतं.

पण गतवर्षाच्या ३१ डिसेंबर राज आणि त्याचे दोन मित्र एका टूव्हिलर वरून तिघे जण थाटात गांवाजवळच्या एक धाब्यावर गेले. तिथं खाणं आणि कधी नव्हे ते पिणं हेही राजुने मित्रांच्या नादाने केले. घरी येताना होऊ नये ते झाले. राजाला अपघातात अपंगत्व आले. तीन वर्षात मिळवलेले पैसे, असेल नसेल ते ऑपरेशन-उपचारासाठी गेले. वर दारू पिऊन एका टूव्हिलरवर तिघे हे बेकायदेशीर कृत्य! म्हणजे गंगुमावशीच्या भाषेत घरचा खोळंबा आन आब्रूचा खेळ खंडोबा झाला.

राहून राहून गंगुमावशी मला विचारात होत्या, बाई ह्यो कसला नववर्साच स्वागत म्हणून सण ३१ डिसेंबरला रातच्या बाराला साजरा कराचा म्हनं ? आपला गुढीपाडवा नववर्साचा सण, म्हणून येरवेळी सडारांगोळी करून गुडी हुबी करून किती बी गरिबी असुदे मुठीच का होईना पुरान घालून, देवाला पुरणावरणाचा निवद करतोच की! गतवर्षी राजाला पोरगी म्हणाली "इंग्रजी महिन्याप्रमाणं ह्योबी पाडवाचं! म्हणून संमदी करत्यात. मी बी घरांत भजी, गरा, फोडणीचा भात असं समदं गोडधोड अन चमचमीत सणाला करतु तसा सैपाक केला हुता. त्ये सुग्रास जेवान जेवायचं सोडून राजा का व हाटेलात जेवायला गेला. असल्या मैतरांबरबर? ही कसली आनंद साजरा करन्याची नवी पद्धत निगाली. वर नाचून, दारू पिऊन कसं येणाऱ्या नव्या वर्साचं कसलं ह्यो स्वागत?"

गंगुमावशी तोंडाने असे प्रश्न विचारात होती आणि तिच्या डोळ्यांतून अश्रुधारा वाहत होत्या!

मी निरुत्तर होऊन ऐकत होते.

कादंबरी देशमुख
९४०५५४२४५५





रेखा राव

रेखा राव

लेखन वारसा आईकडून आलाय. लेखनाला उशीरा सुरवात पस्तीस नंतर. आता पर्यंत ५०० हून अधिक कथा, ४ कादंबरया, लेख व प्रवास वर्णन. अनेक कथा स्पर्धेत बक्षीस. गेली ३५ वर्षे लिहीते. ३ कथा संग्रह १ कादंबरी २ प्रवास वर्णन अशी पुस्तके प्रसिद्ध झालीत. संगीत, नृत्यांची आवड. केनिया येथे असताना भरत नाट्यम, कथ्थक, मणिपुरी या नृत्यांचे क्लासेस घेतले.



# वृक्ष आपुले सांगाती

अलीकडे कुठलेही सण, उत्सव हे जात, धर्म, देश या पुरते मर्यादित राहिले नसून जागतिक पातळीवर साजरे केले जातात. याचे कारण तांत्रिक आणि वैज्ञानिक प्रगती. शिक्षण, प्रसार माध्यम, प्रवास यामुळे माणसाची वृत्ती आणि दृष्टी समृध्द झाली आहे. आपल्या प्रगतीसाठी, स्वप्नपूर्तीसाठी तो जगाच्या पाठीवर कुठेही जावून वास्तव्य करू शकतो. साहजिकच तेथे राहिल्यावर तेथील सण, उत्सव, स्वातंत्र्यदिन तो उत्साहाने साजरे करतो. त्यामुळे दिवाळी, नाताळ, ईद हे सर्वत्र जगभर साजरे करताना दिसून येतात. त्याचप्रमाणे जागतिक पर्यावरण दिन, महिला दिन, योग दिन, जेष्ठ नागरिक दिन, valentine day, हे साजरे होताना दिसतात. अलीकडे मातृदिन आणि पितृदिनही थाटात साजरा होताना दिसतो.

यंदाचा पितृदिन आम्ही आमच्या कन्येसोबत अमेरिकेतील कॅलिफोर्निया येथे

साजरा केला. आमची निसर्गाची आवड पाहून तिने ‘Muir Woods National Monument’ या पार्कला भेट देण्याचे ठरविले. हे पार्क तिच्या घरापासून साधारण दोन तासांच्या अंतरावर आहे. सुट्टीच्या दिवसात लोकांची फार गर्दी असल्यामुळे इथे पार्किंग मिळत नाही. म्हणून आम्ही एका विशिष्ट ठिकाणी गाडी पार्क करून तेथून शटल बस सर्व्हिस घेतली. डोंगरातील नागमोडी अरुंद रस्ता पार आम्ही अर्ध्या तासाने पार्कजवळ पोंचलो. दुपारचा दीड वाजला होता. सर्वत्र रखरखीत पिवळे धमक कडक उन पडले होते. तरीही कन्येच्या सांगण्यावरून आम्ही जाड जाकेट हातात घेतले होते. तिकीट दाखवून आम्ही पार्कच्या प्रवेश द्वारातून आत प्रवेश केला. एखाद्या अति थंडगार ए.सी. हॉलमध्ये प्रवेश केल्यासारखे वाटले. संध्याकाळ व्हावी तसा मंद अंधुक प्रकाश आणि अंगाला झोंबणारा थंडगार वारा. लगेच अंगावर जाकेट चढवले. आजूबाजूला पाहिले तर पहारा देत असल्यासारखे ताठ, सडसडीत, उंच उंच वृक्ष. मानेला ताण देवून, नजर वर करून पहिले तर झाडाचे शेंडे कुठेच दिसत नाहीत. जणू आकाशावर स्वतःच्या पानांचे छत्र धरून उभे. झाडेही इतकी दाटीवाटीने उभी होती की सूर्याचे किरणही झाकले गेले होते. वृक्षांचा तो ताठ, हिरवागार नजराणा डोंगरा पल्याडून पुढे पुढे जात होता. हे पाहण्यासाठी डोंगरातून लाकडी फळ्या घालून सुरेख पथमार्ग केला होता. मध्ये मध्ये लाकडी पूल, कमानी लागत होत्या. त्याखालून झुळूझुळू पाण्याचा प्रवाह खळखळतवाहत होता. त्याला पक्ष्यांची किलबिलाट साथ देत होती. पुढे चालत जात होतो तसे जंगल घनदाट होत होते. गार वारा अंगावर शहरे आणीत होता. मग झाडाच्या छतामधून डोकावणारा एखादा सूर्याचा किरण दिसताच त्याची उब अंगावर घेण्यासाठी त्याच्याखाली थांबत होतो. बसायला बाजूला लाकडी बाकडे ठेवली होती. त्यावर बसून विश्रांती घेत होतो व आजूबाजूच्या वृक्षांची पाहणी करीत होतो. वादळ, वारे, पाउस, अग्नी यामुळे झाडाच्या बुंध्याना वेगवेगळे विचित्र आकार आले होते. काहीना मोठमोठे खिंडार पडले होते. त्यासमोर उभे राहून फोटो काढले. काही झाडे जखमी सैनिकांसारखी आडवी तिडवी पडली होती. त्यावर गवत, रोपटी, वेली उगवल्या होत्या. ही झाडे दोन तीन हजार वर्षापूर्वीची असून यांची उंची ३८९ फूट असून रुंदी २२ फूट आहे. यांची मुळे जमिनीत १४ ते १५ फूट असून खोल असून या मुळांचा विस्तार १०० फुटापर्यंत पसरलेला दिसतो. या झाडांच्या बुंध्याच्या साली १२ ते २२ इंच जाड असतात. त्यामुळे जीव, जंतू, उन, पाउस आणि अति थंडीपासून यांना संरक्षण मिळते. या झाडांना रेडवूड म्हणतात. ही झाडे केवळ कॅलिफोर्नियाच्या पैसिफिक समुद्रकिनारी उत्तरेकडे दिसतात. येथील समुद्राच्या खाडीत व दलदलीत यांची वाढ होते. हे वृक्ष अनादि काळापासून उभे आहेत. यांच्या उंचीमुळे, खोल मुळांमुळे आणि बुन्ध्यावरील जाड सालींमुळे यांचे सर्व प्रकारच्या हवामानापासून संरक्षण होते आणि अनेक वर्षे ही झाडे तग धरून जिवंत राहू शकतात. या झाडांची पानेही जाड, टोकदार सुईसारखी निमुळती असतात. त्यामुळे टी पाणी शोषून घेतात. यावर छोटी छोटी फळे येतात. या झाडांच्या अती उंचीमुळे यावर सदैव धुके व दव पडते. याचे पाणी होवून झाडांना पोषण मिळते. झाडाच्या मुळावरीलरोपटी, वेळी, गवत यामुळे झाडांच्या मुळाना संरक्षण मिळते. अंधुक प्रकाशातही यांची वाढ होते. यावरील फळ परिपक्क होताच बिया खाली पडतात आणि नव्या वृक्षाची निर्मिती होते. या वृक्षांच्या ओंडक्यावरील वर्तुळावरून या वृक्षाचे वय व पावसाचा अंदाज केला जातो. ही जंगल संपत्ती टिकवून ठेवण्यासाठी येथील अमेरिकन सरकार सतत कार्यशील असते. वेळोवेळी याची नीट काळजी घेते. त्यामुळे हे जंगल हजारो वर्षापासून सुरक्षित आहे. आणि त्याचे सौंदर्य टिकून आहे.

> काही झाडे जखमी सैनिकांसारखी आडवी तिडवी पडली होती. त्यावर गवत, रोपटी, वेली उगवल्या होत्या. ही झाडे दोन तीन हजार वर्षापूर्वीची असून यांची उंची ३८९ फूट असून रुंदी २२ फूट आहे. यांची मुळे जमिनीत १४ ते १५ फूट असून खोल असून या मुळांचा विस्तार १०० फुटापर्यंत पसरलेला दिसतो. या झाडांच्या बुंध्याच्या साली १२ ते २२ इंच जाड असतात. त्यामुळे जीव, जंतू, उन, पाउस आणि अति थंडीपासून यांना संरक्षण मिळते. या झाडांना रेडवूड म्हणतात.

हिरवीगार झाडी, सुरेख हवा आणि सुरेख परिसर पहात आम्ही चालत चालत किती पुढे गेलो कळलेच नाही. खूप अंधारून आले. गार वारा अंगाला झोंबू लागला. तसे आम्ही परत फिरलो. जितके चालून पुढे आलो होतो तितकेच परत चालायचे होते. वृक्षवल्लींची पुन्हा पाहणी करीत पार्क बाहेर आलो. तर बाहेर सोनेरी पिवळे उन पडले होते. संध्याकाळचे साडेचार वाजले होते. शटल बस साठी मोठी रांग होती. रांगेत उभे राहिलो पण मनातून ते ताठ, विशाल, धीर गंभीर वृक्ष जात नव्हते. जणू पित्याच्या उदात्त, धीर, गंभीर व्यक्तिमत्वाची आठवण करून देत होते. पितृदिना निमित्त ओळख झालेली ही ‘रेडवूड’ वृक्षवल्ली कायम स्मरणात राहील, हे नक्की.

■

रेखा राव
२६, अनुपमा, बँक ऑफ बडोदा
हाऊसिंग सोसायटी, बामनवाडा,
विलेपार्ले (पूर्व) मुंबई ४०००९९
९९२०३०२१५९




राही लिमये
वाचन, कथा, कविता, लेख लिहिणे

# रम्य ते वार्धक्य

दुपारी मासिक चाळत पडले होते. त्यात जाहिरात होती सिनियर सिटिझनसाठी रहाण्याची सोय. मनात आलं काळ किती बदललंय? आता कोणी म्हातारं होत नाही. ज्येष्ठ किंवा सिनियर सिटिझन्स होतात. काळाबरोबर बदललं तरच माणूस सुखी होणार आहे. साठीनंतर बोनस आयुष्य सुरु होतं. ते आनंदात कसं घालवायचं ते आपणच ठरवायचं.

खरं तर आता मुलं त्यांच्या त्यांच्या विश्वात रमलेली असतात. जबाबदाऱ्या संपलेल्या असतात. आपली विचारसरणी सकारात्मक असेल तर ह्या वयात झालेलं मनाचं फुलपाखरू आपण एन्जॉय करू शकतो. फुलपाखरू म्हणायचं कारण मन कुठेच स्थिर होत नसतं. छोट्या छोट्या गोष्टी विसरल्या जातात. मुड स्विन्ग्स होत असतात. मन लकडी उगाचंच हसत असतं तर कधी पूर्वीचं काहीतरी आठवून दुःखी होतं. फार वेळ मन दुःखात रमायला लागलं की , त्याला फटका मारून ताळ्यावर आणायचं कारण सारखं दुःखी रहाणं शारीरिकदृष्ट्या आपल्याला परवडणार नाही. डायबिटीस , बी पी असे आपले मित्र मग आपल्याशी फार लगट



करायला टपलेलेच असतात.

आणखी एक गंमत सांगू का? प्रगल्भतेला आता आपली बेस्ट-फ्रेंड करायचं. आपण निवांत असताना विचार केलं की, आपल्या लक्षात येतं अरेच्चा तरुण असताना आपल्या मनाविरुद्ध काही झालं. आपल्या लाईफ पार्टनरने पिक्चरला, नाटकाला, हॉटेलात नेलं नाही की प्रचंड राग यायचा. आपल्यासारखं कमनशिबी जगात दुसरं कोणी नाही असं वाटायचं. आणि आता टीव्ही वर जाहिरात पाहिल्यावर आपण ठरवतो हा पिक्चर पाहायचा पण काही कारणाने राहून जातं. आपल्याला राग येत नाही. आपण मनात म्हणतो असुदे नंतर दुसरा पिक्चर बघू. आपल्याला आश्चर्य वाटतं आपण इतके कसे बदललो? पण हा बदल सुद्धा आपल्याला आनंदच देतो. राग, द्वेष, असूया ह्या भावना फार काळ मनात तहान मांडून बसत नाहीत. क्षणभर येतात आणि जातात.

माझ्यातला आणखी एक बदल मला सुखावतो. आता माझा हट्ट नसतो की , प्रत्येक काम मीच करणार. माझं प्रत्येक कामी परफेक्टचं असलं पाहिजे. मला कंटाळा आला तर सामानाच्या पिशव्या मी तश्याच ठेवते. स्वतःलाच सांगते 'राहूदे तिथेच मी उद्या सामान लावणार आहे.' भाजी चांगली झाली नाही असं नवरा म्हणाला तर मला गिल्टी वाटत नाही. मी शांतपणे विचारते, तूप-साखर पोळी खाणार का? आणि माझी मीच खुदकन हसते. क्षणभर भीती वाटते माझं डोकं फिरलं की काय? मला असं का होतंय? मग मी माझं आवडीचं गाणं गुणगुणायला लागते.

माझा कशाचाच हट्ट नाही असं म्हणणारी मी. काही वेळेला मन लहान मुलाच्या वरताण हट्टी होतं. रात्री आईस-क्रीम खाण्याची लहर आलेली असते. नवऱ्याला टीव्ही वरच्या बातम्या महत्वाच्या असतात. तो माझ्याकडे दुर्लक्ष करतो. पण मी त्याच्यामागची भुणभुण सोडत नाही. शेवटी वैतागून तो आईस-क्रीम खायला नेतो. दोघं मिळून आईस-क्रीम खाताना

तुम्हाला सांगू का? मुलगा लांब राहतो पण मला त्याचं वाईट वाटत नाही. त्याच्याबद्दलचं प्रेम तेवढंच आहे. पण माझी तक्रार नसते. दोन महिने झाले तो आलाच नाही. फोने केला नाही. अशी काही कुरकुर नसते. तो आला की, ते चार दिवस माझं जग त्याच्याभोवती फिरतअसतं. तो आनंद अवर्णनीय असतो. तो परत गेला की माझं रुटीन दुप्पट उत्साहात सुरु होतं. कारण मला टॉनिक मिळालेलं असतं.

मी खुश असते. आजूबाजूला असलेली तरुणाईची गर्दी. एखादं आमच्यासारखं जोडपं. सगळयात रमून जात मी आईस-क्रीमचा आस्वाद घेत असते. हळूहळू माझ्या आनंदाची लागण माझ्या नवऱ्यालाही लागते. तो म्हणतो 'खरंच आपण आठवड्यातून एकदा तरी असं रात्री बाहेर पडायला पाहिजे. मस्त वाटतं. ' मी फक्त हसते. मला माहित असतं असं काही घडणार नाहीए. माझा नवरा रात्रीच्या बातम्यांचा मोह सोडणार नाही. तरीपण मी माझ्या आनंदावर ओरखडा येऊ देत नाही. मलाचं आश्चर्य वाटतं. कदाचित हि माझ्या वाढत्या वयाची किमया असेल.

तुम्हाला सांगू का? मुलगा लांब राहतो पण मला त्याचं वाईट वाटत नाही. त्याच्याबद्दलचं प्रेम तेवढंच आहे. पण माझी तक्रार नसते. दोन महिने झाले तो आलाच नाही. फोने केला नाही. अशी काही कुरकुर नसते. तो आला की, ते चार दिवस माझं जग त्याच्याभोवती फिरतअसतं. तो आनंद अवर्णनीय असतो. तो परत गेला की माझं रुटीन दुप्पट उत्साहात सुरु होतं. कारण मला टॉनिक मिळालेलं असतं.

असाच अनुभव देवपूजा, कुलाचार, पोथीवाचन ह्या बाबतीत आहे. पूर्वी एखादा कुलाचार राहिलं की अस्वस्थ वाटायचं. पण आता तसं काही होत नाही. कारण आता मनाला पटलंय हे सगळे उपचार आपल्या आनंदासाठी आहेत. देवाला ह्यातलं काही नकोय. मग माझ्या मनात येतं म्हणजे आता आपण खऱ्या अर्थाने देवाच्या चरणांजवळ पोहचलोय. मग मन अगदी शांत होतं. छान वाटत.

ह्या भावनेची आणखी प्रचिती येते जेव्हा कळतं आपल्या वयाची आपली मैत्रीण देवाघरी गेली. खुप वाईट वाटतं. मन हळवं होतं. कातरवेळी एक अनामिक भीती मनात ठाण मांडून बसते. त्यावर काही उपाय सापडत नाही. मग मी मनाला बजावते आपल्यालाही कधीतरी त्या दुसऱ्या जगात प्रवेश करायचाय. पण कधी ते माहित नाही. मग आतापासून का त्याचा विचार?

आपली शेवटची इनिंग सुरु आहे आनंदात राहायचं, सगळयांना आनंद द्यायचा. आपलं आयुष्य फुलवत राहायचं शेवटपर्यंतं.




राही पं. लिमये
पुरोहित कन्या प्रशालेसमोर,
राजवाडा, सांगली
९८६०४९९६२३



सुनिता बेलोसे

सुनिता बेलोसे


खाजगी शाळेत उपमुख्याध्यापिका, अनेक पुरस्कार प्राप्त (आदर्श शिक्षक म्हणून ) पाच वर्षे ग्रामपंचायत सदस्य व पाच वर्षे नगरसेविका होते. पोलीस स्टेशनशी संबंधित महिला दक्षता समितीची सदस्य म्हणून काम करताना अनेक जणांचे मोडत आलेले संसार मार्गी लावले. समाजकार्याची आवड. कविता करणे, विणकाम, भरतकाम, वाचन इ. छंद ! तसेच वेगवेगळे पदार्थ करून बघण्याची आवड. अनेक काव्यस्पर्धेत सहभाग, कोमसाप दापोली शाखेची सभासद.



# स्वर्गसुख

मेल्याशिवाय स्वर्ग दिसत नाही,
असेच काही नाही.
स्वर्ग गाठणे आपल्या हातात आहे,
जर आपल्याकडे आत्मविश्वास आहे ..... (१)
चार भिंतीत, चार माणसात,
जो राहतो आनंदात,
त्याला मिळते समाधान व तृप्ती
हीच नाही का स्वर्गप्राप्ती ?.....(२)
देताना जन्म सोसल्या कळा,
परंतु पाहताना अवखळ बाललीला,
कौतुक मातेच्या चेहऱ्यावर दिसले,
स्वर्गसुख याहून काय ते वेगळे ?.....(३)
कष्ट करुनि मातीत, पिकवले धान्य,
बघुनी ते शेतकरी झाला धान्य
कष्टाचेच ते फळ मिळाले,
स्वर्गसुख ते काय निराळे ?.....(४)
मनासारखे जेव्हा घडते,
मातृत्त्वाची चाहूल जेव्हा लागते,
स्वप्न जेव्हा सत्यात उतरते,
चेहऱ्यावरून स्वर्गसुखच ओसंडते .....(५)

# आई कशी असते ?



आई कशी असते?
आई ही आईच असते.
आई वज्राहूनही कठीण असते,
आई लोण्याहूनही मऊ असते.
आई दयेचा सागर असते,
आई मायेचा महासागर असते.
आईच्या डोळयात चिंता दिसते,
आई डोळयांनीच समजावत असते.
आई डोळयांनीच रागे भरते
आईच्या डोळयातून प्रेम ओसंडते,
आईच्या डोळयात खूप काही दिसते,
आई डोळयानेच सर्व काही बोलते.
आई अनेक नाती निभावत असते,
आई आधाराचा खांब असते.
आई दिवसभर घरात यंत्र असते,
आई दिशा दाखवणारे होकायंत्र असते.
आई संकट काळी हिमालयाच असते,
आईची तुलना कोणाशीच होत नसते,
आई ही आईच असते. आई कशी असते
ते
आई झाल्यावरच समजते.

सुनिता बेलोसे.
झरी आळी, दापोली, रत्नागिरी
९७६५८७३४८४



मोहना टिपणीस

मोहना टिपणीस
कथा, काव्य, निबंध लेखन
महाराष्ट्र सरकार स्वच्छ भरत अभियन साठी लेखन
नाटकांमध्ये काम, राज्य नाट्य स्पर्धेचे पारितोषक
सामाजिक कार्यात सहभाग.

# मंदोदरी




हिंदू धर्मात 'पंचकन्या स्मरे नित्यम , महापातक नाशनम् 'असे सांगून ज्या पाच कन्यांचा समावेश आहे, त्या आहेत अहिल्या, द्रौपदी, कुंती, तारा, मंदोदरी. ह्या ५ कन्यांच्या स्मरणाने महापापही नाहीसे होते, अशी मान्यता आहे. यातील कुंती व द्रौपदी महाभारतातील, तर अहिल्या, तारा, मंदोदरी रामायणातील. खरंतर रामायणातील सर्व स्त्रिया लक्षात राहण्यासारख्या आहेत. अगदी शूर्पणखा देखील. गीत रामायणात त्यांच्यावर काव्य केले, गीतेही म्हटली जातात. पण मंदोदरी ......? तिची दखल कोणीच घेतली नाही किंवा अजूनही कोणी घेत नाही, कारण रामायणातील तिचा भाग नगण्य आहे. पण तरीही पाच महान कन्यांमध्ये तिचा समावेश आहे. सर्वांना माहीत आहे ती एक राक्षस पत्नी, रावणाची पत्नी म्हणून. रामायणातील नायक श्रीराम आहे तर खलनायक रावण आहे.

मंदोदरीचा रामायणातील भाग अल्प असला तरी महत्त्वाचा आहे. सत्य, धर्म, नीती, न्याय, संत मार्गाचे आचरण करणारी होती. तिचे चरित्र राम भक्ताच्या रुपात महत्त्वाचे ठरते. ती अखंड पतिव्रता होती. श्रीरामाच्या परब्रह्म स्वरूपा बाबत ज्ञानसंपन्न होती. तिच्या गुणांची

चर्चा तुलसीदास वारंवार करतात. ते म्हणतात, 'तिच्या चारित्र्याचे सामर्थ्य इतके होते की त्याला कुठेही सीमा नव्हती. असामान्य चारित्र्य ही तिची विलक्षण अवस्था आहे.'

रावणात कितीही दूर्गूण असले तरी मंदोदरी चे नितांत प्रेम होते. तिला रावणाच्या पराक्रमाचा अभिमान होता. तिला रावणाचे दुर्गुण माहित होते. रावणाची अनेक लग्ने झाली, पण त्याची पट्टराणी मंदोदरी होती. मंदोदरी रावणास सात्विक व न्याय्य, रीतीने, धर्माने वागण्याचा सल्ला देत असे परंतु तो सल्ला कधीच मानत नसे, व मन मानेल तसा स्वैराचाराने वागत असे. मंदोदरी धार्मिक आचरणाची होती. रावणास वेळोवेळी योग्य सल्ला देत असे. रावणाने सीतेला पळवून आणल्यावर तिने सीतेस परत पाठवून श्रीरामाची मैत्री कर असे सांगितले. परंतु रावणाने तिचे ऐकले नाही व दुर्लक्ष केले.

रावणाने सीता वश व्हावी म्हणून हरतऱ्हेचे प्रयत्न केले. कधी गोड बोलून तर कधी कपटाने. पण सीता वश झाली नाही. एके दिवशी तो मंदोदरीच्या महालात खिन्नपणे बसला असता, मंदोदरीने विचारले, "पतिराज आज तुम्ही एवढे कष्टी का ?" तेंव्हा रावण म्हणाला, "सीता वश होत नाही



म्हणून मी कष्टी आहे, तू महापतिव्रता असून पतीचे जे सुख आहे ते आपले सुख मानणारी आहेस, तेंव्हा तू सीतेकडे जाऊन मला ती वश होईल असे काहीतरी कर." तेव्हा मंदोदरी अशोक वनात सीतेकडे गेली. तिला पाहताच सीतेने आलिंगन दिले. मंदोदरीला आनंद झाला व तिने आपल्या पतीला वश होण्यासाठी परोपरीने विनवले. तेव्हा सीतेने ब्रह्म आणि माया, सत्य आणि असत्य निदर्शनास आणून दिले. थोडा ज्ञानोपदेश केला, त्यावेळी मंदोदरीला सीतेची ओळख पटली. एका पतिव्रतेची पतिव्रतेला ओळख पटली. आदराने मंदोदरी ने सीतेचे पाय धरले. मंदोदरी तेथून रावणाकडे आली व सांगितले, "महाराज जानकी तुम्हाला वश होणे कधीच शक्य नाही. श्रीराम प्रत्यक्ष विष्णूंचा अवतार आहे, तर सीता लक्ष्मीचा . तेंव्हा सीता रामाला अर्पण करून शरण जा. "' तेंव्हा रावण म्हणाला , " प्रिये तुझे म्हणणे मला मान्य आहे, पण खरे पुरुषार्थी आपला वीर धर्म कधीच सोडत नाहीत श्रीराम माझ्याशी युद्ध करण्याच्या हेतूने आला आहे. तेंव्हा युद्ध करणे माझे कर्तव्य आहे. त्याला मी आपल्या पराक्रमाने जिंकीन."

राम-रावणाचे युद्ध सुरू झाले पृथ्वी कंपायमान होऊ लागली. सर्व प्राणीमात्र घाबरून सैरावैरा पळू लागले, श्रीराम रथावर चढले. बाण सोडू लागले. रावणही असामान्य योद्धा होता. त्यानेही रामाचे बाण वरचेवर तोडून टाकले. शेवटी श्रीरामाने अर्धचंद्राकृती दिव्य बाण सोडून रावणाची दहाही शिरे छेदन केली , पण लगेच त्या ठिकाणी रावणाची दहा शिरे जशीच्या तशी पुन्हा निर्माण झाली. श्रीरामाने अगस्ती ऋषींनी दिलेला बाण काढून रावणाचे वक्षस्थळ भेदले. आणि रावणाचा देह जमीनीवर छिन्नविछिन्न होऊन कोसळला. आपले धनुष्यबाण लक्ष्मणाच्या हाती देऊन श्रीराम म्हणाले, "आज आमचे अवतार कार्य संपले. ."


मंदोदरीसह रावणाच्या सर्व स्त्रिया तेथे येऊन शोक करू लागल्या. मंदोदरी म्हणाली, " एक दिवस असा होता जेंव्हा रावण व त्याच्या सैन्याने लोकांना त्राही त्राही करून सोडले होते. परंतु आज असा दिवस आला की लंका व लंकावासियांची ही दुर्दशा झाली. स्वामी, आपण सर्व प्रकारे संपन्न होतात, परंतु आज वासनेमुळे आपली ही दुर्दशा झाली आहे. सीता ही पवित्र, तेजस्वी, ओजस्वी, लक्ष्मी रूप असल्याने तिचे हरण करून आपण काय मिळवले, तर सर्वनाश ...स्वतःचा, तसेच राक्षसवंश व लंकापुरीचा.'

> लंकेची तू असशी पट्टराणी,
> मंद उदरी तू सौंदर्यखाणी ,
> शूर पराक्रमी असे जरी राय,
> उन्मत्त अतीक्रूर त्याच्या कारवाया.
> हरण करुनी सीतेचा जर हट्ट न धरता,
> श्रीरामाशी तो मग युद्ध न करता .
> जरी ऐकता सल्ला तुझा, तो रावण
> कधीच न घडते मग हे रामायण.
> पंचकन्येतील तू आहेस पतीव्रता ,
> महापातक नाश होतसे तुला वंदिता ।।

मंदोदरीचा पुराणात नेहमीच एक आदर्श पतिव्रता स्त्री म्हणून उल्लेख होतो. रामायणातील मंदोदरीचे स्थान झगमगत्या तारांगणा सारखे दैदिप्यमान आहे.

■

सौ. मोहना टिपणीस
३ चंद्रशोभा, केवलानंद सोसायटी
आनंदनगर, सिंहगडरोड
पुणे. ५१
मो. ८२७५३७१५६७



सुनिता बापट

सुनीता बापट

मनमुक्त भटकंतीची, जग अनुभवण्याची, सतत नाविन्याचा शोध घेत राहण्याची आवड अन जिगर. मग नव्या ठिकाणी भेटलेली माणसे वाचणं हा छंद. नुकतेच प्रवासवर्णनाचे पुस्तक " आनंदे भ्रमंती " प्रकाशित केले .

# ऋणानुबंधाच्या कुठून पडल्या गाठी...



येवादियां, ये फिजाए बुला रही है तुम्हे ह्या ओळीप्रप्रमाणे यंदा काश्मीरची ट्रीप करायची असे आम्ही काही नातेवाईकांनी ठरविले. आम्ही दहा जण होतो. आतापर्यंत तेथील अस्थिरतेमुळे दोन वेळा रद्द करावी लागलेली ट्रीप, आता ह्यावेळेस काय अनुभव येतो अशी मनात धाकधूक व थोडेसे टेन्शन घेऊनच २०११ च्या सप्टेंबर मधे पुणे-दिल्ली, दिल्ली-जम्मू विमानात बसलो. जम्मूला गेल्यावर आमच्या हॉटेलसमोरच गन्स् अँड अम्युनिशन शॉप असे दुकानाचे नाव वाचून तर आता काय काय होते आहे कोण जाणे असाच विचार मनात आला. पण प्रत्यक्षात मात्र फारच चांगले, सुखद, वेगळे अनुभव आले. भूलोकीचा स्वर्ग, भुरळ घालणारे तेथील निसर्ग सौंदर्य ह्याची प्रचिती येतच होती पण त्याचबरोबर तेथील माणसे त्यांचे सरळ, अतिथ्यशील स्वभाव ह्याचेही अनुभव खूप बोलके आहेत. ते पुण्यात आल्यावर व्यक्त करायचेच अशी खूणगाठ तेथेच बांधली.

विमानप्रवास चांगला होऊन जम्मूतील प्रेक्षणीय स्थळेही छान बघायला मिळाली. त्यानंतर संध्याकाळी तेथेच स्थायिक असलेल्या शर्मा कुटुंबीयांना फोन केला. श्री. शर्मा ह्यांचा मुलगा व माझ्या बहिणीचा मुलगा अमेरिकेत एकत्र शिकत असल्या मुळे त्या मुलाने घरी जाण्याचा आग्रह धरला होता. त्यांना फोन करताच त्यांनी आम्हाला सर्वांनाच जेवणाचे आग्रहाचे आमंत्रण दिले. त्यांच्या आग्रहाला मान देण्यासाठी थोडे संकोचानेच आम्ही त्यांच्याकडे गेलो. तेथे तीन-चार प्रकारच्या काश्मिरी पद्धतीच्या भाज्या, गरम पुर्या, रसगुल्ले असे अतिशय उत्तम आदरातिथ्य झाले. श्रीमती शर्मा जम्मूकाश्मीर बँकेच्या व्हाईस प्रेसिडेंट आहेत. त्यांना अचानक मिटिंग ठरल्यामुळे श्रीनगरला जावे लागले पण तरीही सर्व स्वयंपाकाची जबाबदारी घेण्यास आपल्या भाऊ व भावजयीला त्यांनी बोलावले व आमचा आदर सत्कार केला हे विशेष कौतुकास्पद वाटले. शहरीकरण झालेल्या आपलासारख्यांच्या मनात नक्की हा विचार आला असता की कोण, कुठले मुलाच्या मित्राचे आई वडील व नातेवाईक किंवा आम्हाला ते बाहेरही जेवण देऊ शकले असते पण तसे न करता घरी बोलावून, घरीच पदार्थ करून आम्हाला जेवायला घालणे व ते पण अतिशय हसतमुखाने ह्यातून त्यांचा प्रेमळ स्वभावच दिसून आला. पहिल्या दिवशीचा हा अनुभव निदान थोडा तरी ओळखीतून आलेला. पण पुढील अनुभव हे अनोळखी लोकांचे आहेत. आमचा एक मुक्काम हाऊसबोटमध्ये होता. तेथील शब्बीरभाई खूप मनापासून आमच्याशी बोलत होते. ते म्हणाले आठ-नऊ वर्षांपूर्वी येथे सगळीकडे फार भयावह वातावरण होते. दुपारी तीन नंतर कोणी बाहेर पडत नव्हते. मुलांच्या शाळा कॉलेज बंद होत्या. दिवसात अनेकदा बदुंकीच्या फैरी, बॉम्बचे आवाज येत. तरुण मुले हातात मशीनगन घेऊन अभिमानाने आम्ही अतिरेकी आहोत असे सांगायची. अतिरेकी अचानक घरात घुसून जेवण मागायचे व ते गेल्यावर आर्मीचे लोक येऊन तुमचा, त्यांचा काय संबंध आहे अशी चौकशी करत नजर ठेवायचे. पण आता मात्र चांगले दिवस आले आहेत. असे सांगताना त्याचे डोळे भरून आले. पुढे सांगू लागला की सामान्य जनता आता जागृत झाली आहे. त्यांना आता हे समजले आहे की हिंदू मुस्लीम दंग्यातील राजकारण योग्य नाही. विविध पक्ष एकमेकांच्या विरोधात उभे राहून सामान्यांमध्ये भांडणे लावून स्वत: मात्र रात्री एकाच टेबलवर दारूच्या पार्ट्या करतात. येथील जनतेला आता स्वतंत्र काश्मीरही नको आहे व पाकिस्तानमध्ये संमिलीतही व्हायचे नाही. आम्हाला भारताबरोबरच राहायचे आहे. ह्याचे कारण तो सांगतो की भारत सरकार आम्हाला अनेक सोयी, सवलती देत आहे, पेट्रोल येथे इतर राज्यांपेक्षा स्वस्त आहे. इतर राज्यात शिक्षणासाठी आम्हाला राखीव जागा आहेत. आर्मीचा आम्हाला चांगला आधार आहे. आमची सुधारणा होण्यासाठी शिलाई मशीन्स, रोजगार ते मिळवून देतात. आर्मी मुळेच आमच्या परिस्थितीत लवकर सुधार आला. त्यामुळे आर्मी येथे हवीच. आपल्या देशाबरोबर व आर्मीबरोबर गद्दारी आम्ही करणार नाही. पर्यटन हाच आमचा मुख्य व्यवसाय आहे तो आम्हाला वाढवायचा आहे व स्वत:ची प्रगती करायची आहे. असे उत्साहपूर्ण वातावरण तेथे तयार होत आहे. श्रीनगरमध्ये एका हॉटेलमध्ये चहा पीत असताना तेथील वेटर गप्पा मारू लागला. त्याच्या मते इथे ह्या भागात येणारे पर्यटक सगळयाच काश्मिरी लोकांना अतिरेकी समजतात. पण सगळे तसे नाहीत. कुछ, चंद लोगोंकी हरकते पुरे समाज को बदनाम करती हैं। मूळ आम्ही लोक फार सुस्वभावी, प्रेमळ आहोत. त्याचे ऐकल्यावर मग आम्ही त्याला येथील सरहद संस्थेची त्यांच्या कामाची, आर्मीचे निवृत्त अधिकारी पाटणकर ह्यांच्या काश्मिरींसाठी चाललेल्या प्रयत्नांची माहिती दिली. तसेच काश्मीर अशांत ठेवण्यात खरा हात अमेरिकेसारख्या मोठ्या राष्ट्रांचा आहे. हिंदू मुस्लीम हा वाद नाहीच आहे.

> आम्हाला पाहताच कुतुहलाने दहा बारा पुरूष आणि दहा बारा बायका जमा झाल्या. बायका सुरवातीला बुजल्या पण नंतर आमच्या बरोबर तोडके मोडके बोलत, फोटो काढत अर्धा तास केव्हाच गेला. ह्या लोकांचे विणकाम पाहिले व त्यांची गरीबीही पाहिली. स्वयंपाक घरात फक्त एक चूल व अक्षरश: पाच भांडी व एका ड्रममध्ये आवश्यक ते सामान. जे हात इतके सुंदर गालीचे विणतात त्यांना सुगीचे दिवस कधी दिसणार

अशा गप्पांमुळे तो इतका भारावून गेला की तो आमचे चहाचे बिलच घेईना. हा चहा तुम्ही माझ्यातर्फे घ्या असेच म्हणू लागला. आमच्या हॉटेल बाहेरील रिक्षावाले देखील सांगत की आम्हाला आता शांतता हवी आहे. पर्यटकांना आम्ही फसवत नाही. आमची रोजी रोटी त्यावर आहे. तुम्हाला हवे तेथे घेऊन जातो अशी मिठास बोली बोलायचे. काश्मीरचा राजा हरीसिंह ह्याचा पॅलेस दाखविणारा माणूस तर फार मोलाचे बोलला. त्याच्या मते नेहरूंमुळे पाकिस्तान निर्माण झाला. त्याच वेळेस सरदार वल्लभभाई पटेल पंतप्रधान झाले असते तर काश्मीरचा इतिहास व भूगोल वेगळा झाला असता. लोकांना एवढे हाल सोसावे लागले नसते. असे सर्व स्तरातून ऐकत असलेल्या विचारांमुळे आता आमची येथे फिरताना वाटणारी धाकधूक पूर्ण निघून गेली. आर्मीची हालचाल सर्वत्र होती पण दडपण वाटावे एवढी नव्हती. कोणीही आमची तपासणी केली नाही. अशा सर्व अनुभवांचा परमोच्च बिंदू म्हणावा असा प्रसंग श्रीनगरमधील शेवटच्या दिवशी घडला. त्याने आम्ही आजही भारावलेलो आहोत. श्रीनगरजवळचे क्षीरभवानी मंदिर पाहून पुढे मानसबल व वूलर सरोवर बघायचे ठरविले. सकाळी मंदिर बघून मानसबल सरोवराकडे निघालो. वाटेत पांढरा स्वच्छ कुडता पायजमा व खास काश्मिरी जाकीट घातलेले

साठीकडे झुकलेले गृहस्थ गाड्यांना लिफ्ट मागताना दिसले. आमच्याही गाडीला त्यांनी हात केला. पण अनोळखी व्यक्तिला लिफ्ट नको असे वाटून थोडेच पुढे गेलो होतो तोच माझे यजमान म्हणाले तसे चांगले दिसत आहेत त्यांना गाडीत घेतल्यास प्रत्यक्ष काश्मिरी व्यक्तिशी आपला संपर्क होईल. त्यांची मते समजतील. सर्वांना पटल्यामुळे गाडी पुन्हा मागे

जेवणापूर्वी आमच्या प्रत्येकापुढे एक चांदीची सुरई, गरम पाण्याने भरलेली व तस्त हात धुण्यासाठी आले. हात धुऊन जेवायला बसलो. जेवणात तीन मांसाहारी भाज्या, तीन शाकाहारी भाज्या होत्या. त्यात काश्मिरी पालेभाजी हाक ही मुद्दाम केली होती. आम्हाला वाढण्यास त्यांची पत्नी, बाळंतीण असलेली मुलगी, मानलेला मुलगा व ते स्वत: बसले होते.

घेऊन त्यांना गाडीत घेतले. मग परस्पर परिचयात समजले की ते रिटायर्ड सिव्हील इंजिनिअर होते. त्यांनी आपले नाव ए के राठोर असे सांगितले. ते आम्हाला राठोड असेच वाटले. नंतर समजले की हे करीमभाई वूलर सरोवराच्या पुढे बांदिपुराच्या थोडे अलीकडे त्यांचे गुरु पीरबाबा ह्यांच्या दर्शनास निघाले होते. आमचा प्रोग्रॅम समजल्यावर ते म्हणाले मीच तुम्हाला दोन्ही ठिकाणे दाखवतो. त्याप्रमाणे मानसबलसरोवर पाहून त्याची माहिती ऐकून पुढे निघालो. वाटेत चाललेल्या गप्पात त्यांना आम्ही गालीचा प्रत्यक्ष विणताना पहायची सोय होईल का विचारले असता थोड्याच वेळात त्यांनी अजून एका अनोळखी माणसाला गाडीत घेतले. त्या माणसाच्या अडम ह्या गावी आम्ही गेलो. एका छोट्या वस्तीत घराघरात गालीचे विणत होते. आम्हाला पाहताच कुतुहलाने दहा बारा पुरूष आणि दहा बारा बायका जमा झाल्या. बायका सुरवातीला बुजल्या पण नंतर आमच्या बरोबर तोडके मोडके बोलत, फोटो काढत अर्धा तास केव्हाच गेला. ह्या लोकांचे विणकाम पाहिले व त्यांची गरीबीही पाहिली. स्वयंपाक घरात फक्त एक चूल व अक्षरश: पाच भांडी व एका ड्रममध्ये आवश्यक ते सामान. जे हात इतके सुंदर गालीचे विणतात त्यांना सुगीचे दिवस कधी दिसणार असा प्रश्न मनात घेऊनच बाहेर पडलो. मग वूलर सरोवराजवळील व्ह्यू पॉइंटला गेलो. तेथील विस्तीर्ण प्रदेश डोळ्यात साठवून श्री. करीमभाईंचा निरोप घेऊ लागलो तोच त्यांनी संध्याकाळी आपल्या श्रीनगरच्या घरी जेवायला यायचे आमंत्रण दिले. आम्ही मात्र एवढ्या दोन तासांच्या ओळखीवर जेवायला कसे जायचे म्हणून त्यांना नकार दिला. पण ते जाम ऐकेनात. वारंवार म्हणून लागले आप काश्मिरके याने हमारेही मेहमान हो. खुदाके बंदे हो. तुम्ही कबूल झाल्याखेरीज सोडणारच नाही येथून, एवढे म्हणून त्यांनी घरी तसा फोनही केला. अखेर त्यांना हो म्हणून आम्ही तेथून परत निघालो. संध्याकाळी पुन्हा त्यांचा नक्की या असा फोनही आला. मग रात्री साडे आठला आम्ही त्यांच्याकडे जाण्यास निघालो. पाच सह किलोमीटर अंतर आत आत जाताना आम्ही अचंबित ही झालो होतो व आपण असे बरोबर करतो आहोत ना असेही वाटत होते. पण त्या शंकांना बाजूला सारून सर्व चांगलेच होईल असे मनाशी बाळगून त्यांच्या घरी पोहोचलो. मोठे तीन मजली घर. मुसलमानी पद्धतीचे घराचे मुख्य दार. आत मोठे गालीचे घातलेला दिवाणखाना. नक्षीदार पडदे, लोड, टेकायला उशा असा सरंजाम. करीमभाईंनी आम्ही आल्याचा आनंद पुरुषांना मिठी मारून व्यक्त केला. प्रथम ज्यूस, चहा, कहावा ह्यातले काय हवे असे विचारले मग सर्वांना ज्यूस दिले. थोड्या गप्पा झाल्या. काश्मीरबद्दल त्यांचेही विचार आम्ही आतापर्यंत ऐकले तसेच होते. आम्ही फार भोगले अशी व्यथा त्यांनी व्यक्त केली. मग जेवणाची तयारी सुरू झाली. जेवणापूर्वी आमच्या प्रत्येकापुढे एक चांदीची सुरई, गरम पाण्याने भरलेली व तस्त हात धुण्यासाठी आले. हात धुऊन जेवायला बसलो. जेवणात तीन मांसाहारी भाज्या, तीन शाकाहारी भाज्या होत्या. त्यात काश्मिरी पालेभाजी हाक ही मुद्दाम केली होती. आम्हाला वाढण्यास त्यांची पत्नी, बाळंतीण असलेली मुलगी, मानलेला मुलगा व ते स्वत: बसले होते. त्यांनाही आमच्याबरोबर जेवण घेण्यास सांगितले तेव्हा त्यांनी आप मेहमान हो

आप खाओ हम बादमे खायेंगें असे म्हणून नकार दिला. बोलता बोलता समजले की त्यांच्या पत्नी शाळेत शिकवत असल्याने त्यांच्या अनुपस्थितीत तीन महिन्याच्या बाळंतीण असलेल्या मुलीने सर्व स्वयंपाक घरी केला होता. आधीचा सरंजाम आणि आता हे ऐकून आम्ही अक्षरश: खलास झालो... ह्यावर काय बोलावे तेच समजत नव्हते. त्यांची मुलगी दिसायला फारच सुंदर आहे. काश्मिरी सौंदर्य बघायला मिळाले. तिच्या लग्नाचे फोटो बघताना समजले की नवरानवरीने एकमेकांना लग्नानंतरच पाहिले. साखरपुड्याला नवरा येतच नाही. मुलगी एम. ए. बी. एड. नवरा डॉक्टर म्हणजे इतक्या सुशिक्षित कुटुंबातही ही त्यांची परंपरा चालूच आहे. जेवताना आम्ही पण त्यांना पानात आम्ही काही टाकत नाही. जेवणानंतर दही खातो म्हणजे पुन्हा परत येणे होते अशा प्रकारच्या आपल्या रिती सांगितल्या. सर्व पाहून आम्ही तर अवाक झालोच होतो. पण त्यांनाही प्रचंड समाधान लाभले होते. सतत म्हणत होते तुम्ही आलात हे माझे भाग्यच. माझ्यावर आज खुदा मेहरबान आहे. त्यांचा आनंद चेहर्यावर दिसत होता. व हे सर्व दोन्हीकडून उत्सुफुर्तपणे चालले होते. त्यांच्या नातवाला मुहदिखाई म्हणून पैसे व पत्नीला कापड व बरोबर नेलेले चकली व लाडू दिले. त्यातील कापड व पैसे घेण्यास ते तयार नव्हते. हे घेतल्यास मी पैसे घेऊन तुमचे स्वागत केले असे होईल असे म्हणत होते पण आमची प्रेमाची भेट त्यांनी ठेऊन घेतली. सगळयांचा असा प्रेमळ निरोप घेत रात्री पावणेबाराला त्यांच्याकडून निघालो. आम्हाला गल्लीतून मुख्य रस्त्याला लावून देण्यास ते स्वत: आले रात्री बारा वाजता श्रीनगरमध्ये आम्ही फिरत होतो. ही कल्पनाही केली नव्हती. ते आज सत्यात आले होते. हॉटेलवर पोहोचल्यावरही अर्ध्या तासाने त्यांनी आम्ही पोहोचलोना हे पाहण्यास फोन केला. इतकेच नाही तर दुसर्या दिवशी एअरपोर्टला आम्ही बिना कोई दिक्कत पोहोचलो ना हे पाहण्यासही फोन आला. ह्या अनुभवाने आम्ही अवाक तर झालोच पण त्याच बरोबर हे मागील ऋणानुबंधच असावेत असे वाटून गेले. एकूणच ह्या ट्रीपमध्ये भेटलेल्या माणसांचे वागणे, त्यांचे आदरातिथ्य पाहून शहरीकरणामुळे प्रगत म्हणवणार्या व त्यामुळे माणुसकी, आदरातिथ्य विसरत चाललेल्या आम्हाला खूप शिकण्यासारखे आहे. ट्रीपहून आल्यापासून आम्हा बहिणींच्या मनात हा प्रश्न सतावत आहे की अशा प्रकारे दोन तासांच्या ओळखीवर एवढ्या जणांना घेऊन आपले नवरे घरी जेवायला आले तर आपण तिथल्याप्रमाणे हसतमुखाने मनापासून त्यांचे स्वागत करू शकू का?

■

सुनिता बापट
४८४/२२, वसुंधरा, मित्रमंडळ कॉलनी, पुणे ४११००९
९८८१७२८०२९





सुनेत्रा जोशी

सुनेत्रा जोशी.

तरुण भारत, सकाळला लेख प्रसिध्द. कथा कवितांचे लेखन. अखिल भारतीय साहित्य स्पर्धेत पुरस्कार.

# बदलते भावविश्व...

फोनचा रिसीव्हर ठेवून विनया तिथेच सोफ्यावर बसली. एकदम काही सुचेना. आताच तिच्या भावाचा म्हणजे प्रभाकरचा फोन आला होता. म्हणत होता आईला तीन चार दिवसांपासुन बरे नाही. काळजी करण्याचे कारण नाही पण तुझी आठवण काढतेय. जमले तर येऊन जा चार दिवसांसाठी तरी. विनयाने त्याला बघते कसे जमते ते आणि कळवते असे म्हणुन फोन ठेवला होता.

तसेही ती लग्न झाल्यापासून माहेरी रहायला अशी कधी गेली नव्हतीच कार्य प्रसंगी जाणे व्हायचे पण ते देखील अजयसोबत म्हणजे नवर्या च्या सोबत जायचे आणि यायचे. आई प्रत्येक वेळी म्हणायची रहा की चार दिवस निवांत पण विनया प्रत्येक वेळी पुढच्या खेपेला नक्की राहीन म्हणायची. पण आश्वासन हे आश्वासनच रहायचे. सुरवातीला नव्या नवलाईचे दिवस म्हणुन तर नंतर विश्वास झाल्यावर तो लहान म्हणुन त्याच्या संगोपनात अडकली. अन तो पुरेसा मोठा झाल्यावर पुन्हा चिन्मयात अडकली. आईकडे जाऊन रहायचे मात्र तसेच राहीले.

गेटजवळ रीक्षा थांबल्याचा आवाज आला आणि विचारांची गती थांबली. चिनु आली वाटते. चिन्मयाला ती लाडाने चिनु म्हणते पण आताशा तिला ते आवडत नाही. हे ग काय आई मी आता मोठी झालेय ना दहावीत गेलेय. असे तक्रारीत म्हणत असते. शाळा क्लास आणि अभ्यास यातच तिचा दिवस जातो आणि तिचे टाईमटेबल सांभाळण्यात माझा. हल्ली तर अजय म्हणतो चिनुची दहावी की तुझी?. माझ्या कडे पण अधुन मधुन लक्ष असू दे. का परत दहावीला बसू म्हणजे माझ्या कडे पण बघशील.

आई लवकर दे खायला डबा भरलेला आहे ना? मला दहा मिनिटात परत जायचे आहे. चिनु बुट काढता काढताच ओरडली. अग हो, रोजचेच आहे ना ते. माहीत आहे मला. तिच्या साठी तिच्या आवडीचा मटारभात आणि बुंदी रायता डिशमध्ये काढला. वास नाकात शिरताच वाव मटारभात म्हणुन आईच्या गळयात पडली. ओ मम्मी आणि चक्क गालांची पापी घेतली. विनयातली आई कृतकृत्य झाली. चिनु खाता खाता काय चिवचिवत होती तिकडे विनयाचे लक्षच नव्हते. ती बघत होती एक उमलू पाहणारी टपोरी कळी. नुकतेच फुटू पाहणारे तारुण्याचे अंकुर. गोबरे गाल जाऊन त्यावर चढू लागलेली लाली, भिरभिरती नजर, आता हिला जपायला हवे. हा विचार मनात सुरू होता. तेवढ्यात ती खाणे आटोपून निघाली पण. अच्छा बायबाय टाटा सी यु, चार बजे मिलेंगे टू यू. नेहमीच्या स्टाईल ने म्हणत.

ती गेली. विनयाने दार लावले. जरा पडावे म्हणुन बेडरूम मधे आली. पण झोप येईना. प्रभाकरच्या फोनने मन विचलित झाले होते. मनात

आठवणींचे तुकडे इतस्ततः विखुरले होते ते आपोआप एकेक जोडल्या जाऊ लागले. विनयाला आठवले ती शाळेत असतानाची आठवण. मन त्या काळात जाऊन पोहोचले.

विनयाची आई तिला विनु म्हणत असे. रोज केस विंचरणे वेणी घालून देणे आणि रविवारी शिकेकाई आवळे उकळून न्हाऊ घालणे. त्यामुळे केसही कसे मऊ चमकदार दाट आणि लांब होते. पण सकाळी घाईच्या वेळी वेणी घालायला बसली की घातलेली वेणी कधीच पटकन पसंतीस यायची नाही. चारचारदा उकलून घालायला लावायची. खरे तर सकाळची वेळ बाबांना काही हवे असायचे दादा पण हाक मारायचा पण आई मात्र तिच्या मनासारखे झाल्यावरच उठायची. खुशीत येऊन ती आईच्या गळयात पडून गालावर गाल घासायची. खरचं त्या एका क्षणासाठी आई तो आटापिटा करत असेल का? बहुधा हेच कारण असावे. चिनु आपल्या गळयात पडते तेव्हा आपल्याला पण कसे धन्य झाल्यासारखे वाटते.

कॉलेजला गेल्यावर आपण हट्टाने केस कापून घेतले तेव्हा कोण हळहळली होती आई. पण तिला दुखावण्यासाठी तर तेव्हा तसे केले होते ना. ती दहावीत होती तेव्हाची गोष्ट. तिच्या भावविश्वाला कलाटणी देणारी. की आईबद्दल दुरावा निर्माण करणारी म्हणावी? बाबा नेहमी फिरतीवर असल्याने आईशी अगदी मेतकूट होते. एकदा कसलीशी सुटी होती. बहुतेक रामनवमी. बाबा घरी नव्हतेच. दादाही बाहेर गेलेला. आई शेजारच्या काकुंसोबत देवळात गेलेली. विनया

घरी एकटीच होती. तेवढ्यात पोस्टमन आला. तिने पत्र घेतले आणि बाबांच्या टेबलावर ठेवणार तोच तिने सहज पाहीले. अरेच्चा पत्र बाबांना नाही तिलाच आले होते. आपल्याला कोण पत्र पाठवणार? मग तिने ते फोडले. वर प्रिय विनयास. होते आणि खाली गिचमीड सही. काही कळेना कुणाचे आहे. वाचले. तू मला खुप आवडतेस. रोज तुला बघतो शाळेच्या गेटपाशी उभे राहून वगैरे. लिहीले होते.

तिला भितीच वाटली. आईला सांगावे का? नको ती आपल्याला रागवेल. तुच फाजील आहे म्हणेल का? तिला आपले मुलांशी बोलणे तसेही आवडत नाही. नकोच दाखवायला. तिने ते अभ्यासाच्या कपाटात कोंबून टाकले. आईला ते सापडू शकते असे वाटलेच नाही.

आई घरी आली. विनयाचा रडवेला चेहरा बघुन काय ग? असे विचारताच तिला रडूच फुटले. मग परीक्षेचे टेंशन आले आहे सांगुन वेळ मारून नेली. आईला ते खरेही वाटले. आज आठवणीचा तो तुकडा मनाच्या कपाटातून असा बाहेर पडला. परीक्षा झाली. आई पुस्तकाचे कपाट आवर

कॉलेजला गेल्यावर आपण हट्टाने केस कापून घेतले तेव्हा कोण हळहळली होती आई. पण तिला दुखावण्यासाठी तर तेव्हा तसे केले होते ना. ती दहावीत होती तेव्हाची गोष्ट. तिच्या भावविश्वाला कलाटणी देणारी. की आईबद्दल दुरावा निर्माण करणारी म्हणावी? बाबा नेहमी फिरतीवर असल्याने आईशी अगदी मेतकूट होते.

म्हणुन मागे लागली. शेवटी तिने आवरायला घेतले. आई मदतीला आलीच. नेमके ते पत्र आईला मिळाले. झाले पत्र वाचताच आईचा तोफखाना सुरू झाला. असले धंदे करायला शाळेत जातात का? तू पण पत्र लिहीले का त्याला वगैरे. नाही ग आई तो कोण ते मला माहीत पण नाही. तू रागावशील म्हणुन दाखवले नाही. विनया रडवेली होऊन सांगत होती पण आई विश्वास ठेवायला तयार नव्हती. बाबा आले की सांगतेच त्यांना. दिवसभर आईची तासंपट्टी चालू होती आणि सतत चिवचिवणारी विनया गपगार.

रात्री बाबा आले. विनया झोपल्याचे नाटक करत पडली होती. कान मात्र आईबाबांच्या बोलण्याकडे होते. आईने ते पत्र बाबांना दिले. बाबा वाचून म्हणाले अग कुणातरी टारगट पोराचे काम दिसते. या वयात काही मुले करतात असे धंदे. तशी बनेल असती तर हे पत्र तिने कपाटात तुला सापडू शकेल असे ठेवलेच नसते. विनयाने हे सगळे ऐकले अन एका क्षणात तिचे अवघे भावविश्व बदलले. बाबांनी आपल्यावर विश्वास दाखवला. आपल्याला समजून घेतले. आईने नाही. आईबद्दल मनात एक सुक्ष्म अढी निर्माण झाली. आणि बाबा आता जवळचे मित्र झाले.

मग ती कॉलेजला जाऊ लागली. तिथे अजय भेटला. त्याने प्रपोज केल्यावर बाबांनी तुला पास केले तरच पुढच्या गोष्टी. असेही तिने अजयला सांगितले. अजय चांगला होतकरु होता. लग्न झालेही. आईला वाईट वाटले की विनयाने आपल्याला आधी काही सांगीतले नाही म्हणुन ती दुखावली गेली. तेवढ्यात कामवाली बाईने दार ठोठावले आणि आठवणींचे तुकडे गोळा करत ती उठलीच. चिनुसाठी खायला ब्रेड पॅटीसची तयारी करून ठेवली. तोच विनयाचे लक्ष दाराच्या फटीतल्या पत्राकडे गेले. ते अजयच्या टेबलवर ठेवले. पण हे काय वर चिनुचे नाव आहे. चिनुला कोण पाठवणार पत्र? तिने ते तिच्या अभ्यासाच्या टेबलवर ठेवले. आली की बघेल आणि सांगेल. चिनु आली. खाऊन खोलीत अभ्यासाला गेली. विनया बघत होती. चिनु बाहेर आली. आई बाबा कधी येणार आहे ग? तिने विचारले. येतील रात्री. का ग? मी विचारलेच. ती थोडी घुटमळली. पण परत आत गेली काहीच न सांगता.

विनयाने पण ठरवले आपणहुन काही विचारायचे नाही. दहा वाजले. अजय आला. जेवण आटोपले. बेडरूम मधे गेल्यावर तो पत्राचा विषय

बोलावा असे विनयाने ठरवले. तू हो पुढे मी येतेच आवरून. अजय चिनुच्या खोलीत डोकावला. झोपली वाटते. पण तेवढ्यात ती उठली. बाबा हे बघ. म्हणत तिने ते पत्र दाखवले. मला तरी ते कुणी पाठवले हे माहीत नाही असेही म्हणाली. विनया दाराआडून हे ऐकत होती. अजयला बघताक्षणीच हे जाणवले की हे कुणा टारगट पोराचे काम आहे. आईला सांगितलं का? त्याने विचारले.. नाही बाबा. ती चिडेल नाहीतर काळजी करत बसेल म्हणून नाही सांगीतले. चिनुचे उत्तर.

विनयाला मात्र झोप येईना. आणि तिच्या डोक्यात लख्ख उजाडले. तेव्हा आईने विचारलेले हजार प्रश्न आपल्याही डोक्यात आलेच की. फक्त तिने ते विचारल्याने आपण बिथरलो. आणि मनात दुरावा धरला. आईला समजून न घेण्याची चूक केली. खुप अपराधी वाटले. आपली आई चुकिची नव्हती. आपण तिला समजून घ्यायला कमी पडलो.

तो म्हणाला ठीक आहे बघतो मी काय करायचे. वेडाबाई घाबरायचे काय त्यात. अशी माणसे पावलोपावली भेटत असतातच. झोप आता. काळजी करु नको.

तो गुड नाईट करुन बाहेर आला. दाराजवळ विनयाला बघुन काही बोलणार तो तिने गप्प राहण्याची खुण केली. विनयाने सगळे ऐकले होतेच. इतिहासाची पुनरावृत्ती झाली होती. आत येऊन झोप आता तू उगाच काळजी करू नको. म्हणून अजय झोपी गेलाही.

विनयाला मात्र झोप येईना. आणि तिच्या डोक्यात लख्ख उजाडले. तेव्हा आईने विचारलेले हजार प्रश्न आपल्याही डोक्यात आलेच की. फक्त तिने ते विचारल्याने आपण बिथरलो. आणि मनात दुरावा धरला. आईला समजून न घेण्याची चूक केली. खुप अपराधी वाटले. आपली आई चुकिची नव्हती. आपण तिला समजून घ्यायला कमी पडलो. चिनुने आपल्याला न सांगता बाबांना सांगीतले. कदाचित बाहेरच्या जगातले प्रश्न बाबाच सोडवू शकतील असेही तिला वाटले असेल. आपण मुलीला समजुन घेतोय पण आईला मात्र उगाच दुखावत राहिलो. आता पुन्हा एकदा तिचे भावविश्व कोलमडून पडले. धावत जाऊन आईच्या कुशीत शिरुन खुप रडावे. तिची माफी मागावी आणि आई तू मला खुप आवडतेस असे सांगून लहानपणी सारखा तिच्या गालावर गाल घासावा असे वाटले. चार दिवस निवांत रहायलाच जावे असे ठरवल्यानंतर तिला झोप लागली.

सकाळी जाग आली ती फोनच्या आवाजाने. प्रभाकरचा फोन होता. आईला अचानक चक्कर आली. तिला दवाखान्यात दाखल केले आहे. तू ताबडतोब निघ. तिने अजयला उठवले. चिनुही उठलीच. त्याला सगळे सांगितले. तो म्हणाला ड्रायव्हरला सांगतो तो तुला घेऊन जाईल. तयारी कर. चिनुची काळजी करु नको. चिनुही म्हणाली तू आजीला भेटून ये. रस्ताभर मग ती देवाला विनवणी करत होती. देवा माझी नी तिची भेट होऊ दे. मला तिची माफी मागायची आहे. आणि मला ती खूप आवडते हे सांगायचे आहे. गाडी थेट दवाखान्यातच नेली.



दादा समोरच उभा होता. तिला बघताच तो पुढे आला. आणि आपली आई कोमात गेली ग विनु म्हणुन चक्क लहान मुलासारखा रडू लागला. शुद्धीत असेपर्यंत तुझी आठवण काढत होती ग. असे म्हणाला. आता विनयाच्या मनाचा आकांत सुरू झाला. आता ती मनातले आईला कसे सांगणार. आई ते सगळे ऐकण्याच्या पलीकडे गेली होती. बेडवर आई निपचित पडली होती. तिने आईचा हात हातात घेतला. अन लहानपणी सारखा गालावर गाल घासला. आईच्या चेहर्या वर क्षणभर हसू उमटले की तिला भास झाला हे कळले नाही. आता तिचा बांध फुटला. आपले बदललेले भावविश्व आईजवळ आता कधीच उलगडता येणार नाही या विचाराने डोळ्यातुन धारा वाहू लागल्या.

सौ सुनेत्रा विजय जोशी ©
रत्नागिरी. मोबाईल
९८६००४९८२६.


पूर्णिमा नार्वेकर

पूर्णिमा नार्वेकर
निहार ग्राफिक्स - या नावाने गेली २१ वर्ष डीटीपी आणि डिझाईनिंग चा व्यायसाय.
पुढचं पाऊल दिवाळी अंकांची सह संपादिका
मानभावन - स्वरचित कवितांचा कार्यक्रम
मराठी वृत्तपत्र व दिवाळी अंकांमधून लेख व कविता प्रसिद्ध

# आईचे बोल आता आठवले



ग्रॅज्युएशन झाले, एम बी ए ही झाले
इंटरव्ह्यु चे सोहळे पार पडले

मोठ्या पोस्ट वर रुजू झाले
कामात पुरती बुडून गेले

आज मीटिंग , उद्या ट्रेनिंग
ऑफिस चे रुटीन सुरु झाले

पाच दिवस कामाचे
शनिवार रविवार आरामाचे
शॉपिंग किंवा पिकनिक चे
नाहीतर लेट नाईट पार्टीचे

अशावेळी ...
अचानक लग्न ठरले
मुलगा चांगला, कुटुंब चांगले
घरच्यांनी ही लगेच उरकून टाकले

सासू सासऱ्यांनी गोड कौतुक केले
नव्या नवलाईचे दिवस सरले
स्वतंत्र संसाराचे स्वप्न साकार झाले

काही दिवस मजेत गेले
नंतर ...
घराचे आवरणे, ऑफिसला जाणे
रोजचे काम कठीण झाले
हॉटेलचे खाणे आता नकोसे झाले

कांदा चिरता डोळे पाणावले
स्वयंपाक शिकायचे राहूनच गेले
आईचे बोल आता आठवले
सासरी गेलीस कि समजेल सारे
नको हट्ट स्वतंत्रपणाचे
फायदे असती एकत्र कुटुंबाचे
सुख दुखात सोबती सारे

# शिबीर



गाव तसं लहानसं आडवळणाचं होतं,
शाळेतल्या आवारात शिबीर भरलं होतं,

डॉक्टरीण बाईंची लगबग सुरु होती
स्वयंसेवक, गावचे पुढारी सर्व जमली होती

बाया, बापे, मुलं  दुरून सार बघत होती
पुढं जायाच कस? भिती मनात होती

हळुहळु एक एकजण येऊ लागला
इकड तिकड बघत दुसर्याला बोलवु लागला

मनातली भीती सरुन औषध घेऊ लागला
बिस्कीटच पुडक अन् धान्याच पाकीट  बघुन खुश झाला

शिबीराचा कार्यक्रम आता संपत आला
बाया-बापडे, पोरांचा घोळका समोर जमला

प्रत्येकाच्या डोळयात भुकेला भाव होता
आता शिबीर पुना कवा ?  हा प्रश्न होता...



पूर्णिमा नार्वेकर
२०३, पुष्पक अपार्टमेंट,
भिकाजी लाड मार्ग ,
दहिसर (प) , मुंबई - ६८
मो. ९८२०००३८३४



स्मिता पाटील

स्मिता पाटील

# हेमंताचं प्रवेशद्वार - मार्गशीर्ष

कार्तिकी पौर्णिमेला देवळात दिवे लागले. तुळशीचे लग्नही धुमधडाक्यात पार पडले. पंधरा वीस दिवसात माणसांचीही दिवाळी सरली. बघता बघता मार्गशीर्ष अवतीर्ण झाला. मार्गशीर्ष म्हणजे हेमंताचं प्रवेशद्वार. शितलतेचे दुसरे नाव म्हणजे हेमंत. पावसाळ्याने काढता पाय घेतला आणि हिवाळ्याने चंचूप्रवेश केला. मार्गशीर्षात हेमंताला गुलाबी स्वप्ने पडायला सुरवात होते. आपल्या प्रिय सखीच्या सहवासासाठी त्याचे मन उतावीळ होते. हेमंताच्या उतावीळ लगबगीमुळे दिवसही घाबरून आपले अंग आखडून घेतो. आता सूर्यही एखाद्या झोपाळू पोरासारखा आळसलेल्या अंगाने प्राचीवर येतो. या रामप्रहरीचं वातावरणही काहीसं जडावलेलं असतं. नजरेसमोरचं धुकं सुंदर स्वप्नील दृश्य निर्माण करतं. हवेतला थंडावा आणि पसरलेलं धुकं आभासी जगाचा अनुभव देतं. दूरवरून खरंच बैलांच्या गळ्यातल्या घंटांची किणकिण अस्पष्टशी ऐकू येवू लागते. वाटतं आता नदीवर पाणी आणायला जाणाऱ्या तरुणींची रांगही दिसू लागेल. तेवढ्यात सूर्याची उन्हं त्या आभासी जगातून वास्तवात आणून सोडतात. अर्थात तोवर उशिराच झालेला असतो. दिवसभराची कामं आठवताच धडपडीला सुरवात होते. कामांचा उरक होतो न होतो तोच वातावरणात काळोखी पसरायला सुरवात होते. आपलाच नंबर पहिला हवा अशा हटवादीपणाने एखादी द्वाड पोरगी सर्वांना मागे ढकलत स्वतःला पुढे करते तशीच मार्गशीर्षातली संध्याकाळ दुपारला मागे ढकलत अवेळीच हजर होते. दिवसभराची कितीतरी कामे अजून मार्गी लागलेली नसतात. तेवढ्यातच ही बया अवतीर्ण झालेली असते. अजून किती कामं करायची राहिलेली आहेत. बरंच काही करायचं बाकी राहिलेलं असतानाच दिवस संपल्याची जाणीव मनाला पोखरू लागते. एक प्रकारची हुरहूर मनाला घेरू लागते. उगीचंच धडधडल्यासारखं होवू लागतं. मळभ आल्यासारखं वातावरण कुंद होवून जातं. कातरवेळ कशाला म्हणतात याचा अस्सल अनुभव ही मार्गशीर्षातली संध्याकाळ देत जाते.



या भावनेवर मात करायला माणूस शिकतोच. माणूस मुळातच उत्सवी प्राणी आहे. सणांची रेलचेल असलेला चातुर्मास कार्तिकापाठोपाठ सरलेला असतो. आता मार्गशीर्षात सांगण्यासारखा सण नाहीच. मार्गशीर्षात सांगण्यासारखा धार्मिक उत्सव नसेना का... आम्ही लग्न समारंभाची धामधुमी निर्माण करतो. आणि लक्षात येतं, मार्गशीर्षातल्या लग्नात जी रंगत आहे ती इतर कोणत्याही मासापेक्षा नक्कीच वरचढ असते. आपल्याकडची लग्नं म्हणजे इष्टमित्रांचा गच्च गोतावळा हे आपले समीकरण. लग्नं म्हंटलं आणि गर्दी नाही असं कसं होईल? या गर्दीपोटीच उन्हाळ्यातली लग्नं नकोशी वाटतात. उन्हाळा म्हणजे उकाडा, शिवाय चिकचिक घामटपणाचा नकोसा दरवळ. विजूबाई प्रसन्न असली तर वाऱ्याचे सौख्य लाभणार. आणि एसी सर्वांना थोडाच परवडतो? त्यात कुठेकुठे पाण्याचा अभाव. त्यामुळे उन्हाळ्यातली लग्नं म्हणजे नात्यागोत्यात स्वतःला गोवून घेतल्याबद्दल आप्तेष्टांना दिलेली शिक्षाच असते. पाऊस पाण्यातील चिखलात लग्नांची हवी तेवढी फजिती अनुभवा, कपड्यांच्या नासाडीने करवादून पावसाला शिव्या घाला. पावसाळ्यातील भिजत घोंगड्यात लग्नातील हौसेमौजेचे तीनतेराच वाजलेले असतात. या पार्श्वभूमीवर मार्गशीर्षातील लग्नं पहा. कितीही गर्दी असेना का, गर्दीची उब हवीहवीशी वाटावी अशी मस्त थंडी. लग्नाचा आनंद खऱ्या अर्थाने उपभोगावा तो या थंडीतच. लग्नासाठी जमलेला हौशीजनांचा मेळा आणि विजेच्या रोषणाईने खुललेला मंडप. एरव्ही कधी कुठे नाचणार नाही पण इथे लग्नघरी डीजेवरच्या गाण्यांवर केलेला सैराट भांगडा. वाह रे व्वा.. मार्गशीर्ष म्हणजे आम्हा बायकांना नटण्या मुरडण्याची भरपूर मुभा. दमट घामटपणा नसल्यामुळे मेकअप खराब होण्याचं भय नाही. गर्भरेशमी पोताची, वीतभर रुंदीची जरीबॉर्डर असलेली ठेवणीतली खास साडी. मुद्दाम थंडीतच नेसावी अशी. उन्हाळ्यात दागिने चढवले की, कधी एकदा उतरवतोय असं होवून जातं. थंडी मात्र दागिने सहन करायला भरपूर बळ देते. या काळातल्या भाज्यानाही मस्त चव असते. उंदियो, वालाचे दाणे घातलेली वांग्याशेवग्याची भाजी. अहाहा!!! भाज्यांच्या नुसत्या नावानेच रसवंतीला पाझर फुटू लागतात. एकूण मार्गशीर्षातली लग्नं म्हणजे चंगळ आणि मंगलच मंगल असते. श्रीकृष्णाने स्वतःला ‘ मासानां मार्गशिर्षोहम...!’ असं म्हटलंय ते उगीच नव्हे.



हेमंताची सखी, ही थंडी बाळाच्या कोवळ्या गालावर उतरते, तेव्हा तिला गुलाबी हे विशेषण कां लागतं याचं कोडं उलगडतं. थंडीची हुडहुडी लोकरींच्या कपड्यांची आठवण करून देते. घरात स्वेटर, मफलर, गरम शालींचे राज्य अवतरते. गरम शालीत स्वतःला गुरफटून घेताना मोठ्या झालेल्या रात्रीही अजून मोठ्या व्हाव्यात असे वाटू लागते. अशा वेळी बिछान्यात गुडूप झोपायचे सौख्य काय वर्णावे? शब्दच अपुरे पडतील इथे. पण त्याहीपेक्षा बिछान्यात संसर्ग टाळून जर शेकोटीचा प्रपंच केला असेल तर ती मजा काही औरच..! काळोख्या रात्रीवर उजेडाची लवलव कोरणारी शेकोटी आणि तिच्या सोबतीने आळवलेल्या चित्तरकथा. शेकोटीच्या उजेडाचा चतकोर चेहऱ्यावर पडत असतांना अधिकच गूढ वाटणारा, असा कुणी एखादा भुताच्या, हडळीच्या नाहीतर ब्राह्मराक्षसाच्या गोष्टी सांगणार..! मग ऐकणाऱ्याच्या जीवाचा थरकाप उडेल नाहीतर काय? रात्रीच्या थंडीलाही फिकी पाडील अशी भीतीची हुडहुडी..! पण त्यातही एक गंमत असते. त्या थंड रात्रींना या गोष्टी एक वेगळाच जिवंतपणा बहाल करतात. ऋतुराज वसंतातल्या रात्री नाचगाण्यांनी साजिवंत होत असतील, नव्हे होतातच, तरी गप्पांचा फड रंगवणाऱ्या हेमंतातल्या रात्रींची सर त्यांना नाही.

हेमंताची सखी, ही थंडी बाळाच्या कोवळ्या गालावर उतरते, तेव्हा तिला गुलाबी हे विशेषण कां लागतं याचं कोडं उलगडतं. थंडीची हुडहुडी लोकरींच्या कपड्यांची आठवण करून देते. घरात स्वेटर, मफलर, गरम शालींचे राज्य अवतरते. गरम शालीत स्वतःला गुरफटून घेताना मोठ्या झालेल्या रात्रीही अजून मोठ्या व्हाव्यात असे वाटू लागते. अशा वेळी बिछान्यात गुडूप झोपायचे सौख्य काय वर्णावे? शब्दच अपुरे पडतील इथे.

हेमंताच्या रात्री केवळ माणसांनाच नव्हे प्राण्यानाही जवळ आणतात. आवडत्या मांजरीला मांडीवर घेत, तिच्या उबेत घेतलेला थंडीचा अनुभव काही वेगळाच. शेकोटीचा उबारा कुत्र्यालाही हवा वाटतो. खरं तर थंडीत झोपही छान लागते. दयाळाची सुरेल दाद पहाटेची ललकारी देते. अंगावरचं पांघरूण दूर सारून पूर्वेकडे नजर लावावी तर समोरच्या धुकाळ भवतालातून सूर्याची सोनेरी किरणं झाडांच्या पानांच्या कडांमधून तेजाळ आभा फेकीत आपल्यापाशी पोहचत असतात, आपल्यासाठीच.

प्रा. स्मिता पाटील
सुस्मित शितलादेवी मंदिर मार्ग
केळवे पालघर. ४०१
८००७८४८३८४



सौ. मानसी बोरकर

सौ. मानसी बोरकर,

बँकेत कार्यरत आहे. पुणे, आकाशवाणीवर, युवावाणी व कामगार विश्वे मधून नाटके (एकांकीका) व कथा प्रसारीत. दिवाळी अंकांतून कथा प्रसिद्ध. नाटकांमधून अनेक बक्षिसे मिळाली.

# धार्जिणे



जयूने कूस बदलली. अन कूस बदलतांना तिच्या हाताला लागले ते केसांचे मोठाले चाप. लीनाने, तिच्या नातीने लावलेले. सारखी तिच्या मागे मागे फिरत तिला नटवायची. तिच्या आईचे लिपस्टिक लावायची. माय बेबी, माय बेबी म्हणत सारखे तिच्या जवळ जवळ रहायची. जयू लहान असतांना तिच्या बाय आजीला पण असेच करायचे म्हणे. म्हणजे तसे बाय आजीनेच तिला सांगितले होते. बाय आजी म्हंटल्यावर तिचे मन तिच्या लहानपणीच्या काळात जावून बसले. बाय आजी म्हणजे तिच्या वडिलांची आई. तिची सर्वात आवडती व्यक्ती आणि बायआजीची सुध्दा ती सर्वात लाडकी नात. त्या काळातही बाय आजीने जयूवर कोकणीतून कविता केली होती. ‘ आज्जे तुका नटी करता, बांदता तुका रीबिना, म्हजा नातीची रोज आयंकुक येता क्वना, म्हणून जगात म्हाका रावण दिसता, वचन म्हाका दिसता..

बाय आजी अतिशय सळस, सुंदर स्त्री. दोन्ही खांद्यावर पदर आणि नऊवारी साडी. ती स्वतः कोकणीतून गोष्टी, कविता करायची. पण त्या साहित्याला तिने ट्रंकेतून कधी बाहेर काढलेच नाही. त्याकाळी पोर्तुगीजांचे राज्य होते आणि तिचे आजोबा स्वातंत्र्य सैनिक होते. त्यामुळे ते सारखे एकतर तुरुंगात नाहीतर भूमिगत असायचे. त्या काळात आजीने म्हापशाला एक साधेच घर बांधले. ती तरी किती दिवस भावांकडे जावून राहणार? खूप भाटं, कुळागारं होती तरी आजोबांनी गोवा मुक्तिसंग्रामाच्या लढ्यात पैशापायी फुंकून टाकली. ही बाय आजी असेल तशी शांतपणे नवऱ्याचे वागणे सहन करत राहिली. पण जयू सारखी नात झाल्यावर मात्र ती वर्षातले दहा महिने तरी तिच्या बरोबर मुंबईला राहू लागली. दिसामाशी ती तिची मैत्रीण बनत होती. फक्त कधी कधी ती एकच वाक्य म्हणाची, ‘म्हाका घोवाचं धर्जिलं ना गो जयू..’ त्याचा अर्थ जयूला आत्ता कळत होता. राजनशी लग्न झाल्यावर ती मुंबईहून गोव्याला आली. अतिशय श्रीमंत घर होते राजनचे – पण त्याच्या व्यवसायात प्रचंड तोटा आल्याने मोठ्ठा बंगला, भाट, शेती सर्व विकावं लागलं. तोपर्यंत तिच्या पदरात दोन मुलं आली होती. परिस्थितीमुळे तिलाही नोकरी धरावी लागली. राजननेही दुबईची

नोकरी धरली. जयूच्या नशिबात बाय आजी सारखेच नवऱ्यापासून लांब रहाणे आले. तारुण्याची वर्षे लांब राहून काढली. मुलं मोठी झाली. त्यांनी उच्चशिक्षित होऊन मोठ्या अवीने अमेरीकेत तर धाकट्या रझीने मुंबईत नोकरी धरली. दोघांनीही जयूला त्यांच्या समवेत रहाण्याचा आग्रह केला. पण गोव्यातल्या मातीची सवय, तेथील शांतपणा तिच्या शरीरात इतका भिनला होता की ती आपल्या घरातच खूष असायची.

बाय आजीच्या घराची पडती झाली पण दोन्ही मुलांनी मदत करुन जयूने परत एकदा ते घर जोमाने उभे केले. प्रत्येक मुलासाठी वेगळी खोली, पाहुण्यासाठी वेगळी खोली अन् स्वतःसाठी राजन समवेतची एक खोली तिने प्रकर्षाने बांधून घेतली. शेजारीच राहणाऱ्या शालीबा, तिचा नवरा दामू अन् मुलगी पमाची साथ तिला सुरेख मिळाली होती.

शेजारी झोपलेल्या लीनात ती स्वतःचं लहानपण अनुभवत होती, परत एकदा – लीनाच्या पलिकडे झोपलेल्या राजनला पाहून ती थरारली. फक्त चार दिवसांसाठी इथे अमेरीकेत आलाय. दुबईत राहून तो खूप बदलला. पूर्वीचा तासनतास गप्पा मारणारा, तिची चेष्टा-मस्करी करणारा, तिच्याशी मनापासून प्रेमचेष्टा करणारा तिचा राजन आज तिला परकं समजत होता.

पण आत्ता तर ती अमेरीकत अवीकडे तिच्या सुनेचं दुसरं बाळंतपण करायला आली होती. तिची कर्तव्य ती चोख पार पाडत होती.

शेजारी झोपलेल्या लीनात ती स्वतःचं लहानपण अनुभवत होती, परत एकदा – लीनाच्या पलिकडे झोपलेल्या राजनला पाहून ती थरारली. फक्त चार दिवसांसाठी इथे अमेरीकेत आलाय. दुबईत राहून तो खूप बदलला. पूर्वीचा तासनतास गप्पा मारणारा, तिची चेष्टा-मस्करी करणारा, तिच्याशी मनापासून प्रेमचेष्टा करणारा तिचा राजन आज तिला परकं समजत होता. कमी बोलणं, अंतर ठेवणं तिला खूप डाचत होतं. खरंच, बाय आजी सारखं नवऱ्याच धार्जिणंच नाही मला - म'नात एकद' चर्र झालं.

'जयू जागी आहेस का गं ?' जवळ येत राजन म्हणाला. "मला माहिती आहे की तू खूप उदास आहेस. दोन दिवसांनी मला परत कामावर रुजू व्हायचे आहे. पण माझे मन तुझजवळ रेंगाळते गं... मी फक्त तुला पैसे पाठवित राहिलो. तू माझ्या दोन्ही मुलांना उच्चशिक्षित केलंस, चांगले संस्कार दिलेस. Hats of to you जयू.... आता फक्त २/३ वर्षंच बघ - मग मी इथेच येणार तुझ्या कुशीत - गोव्यात.' जयूच्या डोळयातून पाण्याच्या धारा वहात होत. 'ह्या वयात जास्त गरज असते रे सोबतीची – कुठच्या क्षणी काय होईल सांगता येतं का?' 'जयू, गप्प बस. मी तुझ्यात गुंतत गेलो तर परत जाऊच शकणार नाही. सर्व Retirement benefit घेऊन सोडायची ना नोकरी - खरंतर ४ दिवस म्हणून तुला सांगितले पण माझे तिकीट उद्याचेच आहे. प्लीज, मला सहकार्य कर - परत एकदा जयूला आठवले बाय आजीचे शब्द, 'घोवाचे धार्जिलेच ना..'

अमेरीकेतील तीन महिन्यांच्या वास्तव्यानंतर ती भारतात येण्यास निघाली तेव्हां लीना फुरंगटून बसली होती. तिची चप्पल मस्त लपवून ठेवली होती, अगदी बाय आजी जेव्हा जयू लहान असताना त्यांच्याकडे मुंबईला यायची अन् गोव्याला जाण्यास निघायची ना तेव्हा जयूपण असंच कराची. जयूचे मन अन् पाय येताना खूप जड झाले होते. येताना अवी म्हणत होता की मी परत गोव्याला स्थायिक व्हायचं ट्राय करतो वगैरे.

गोव्यात येऊन २/३ महिने झाले होते. परत ती एकटीच आपला संसार चालवत होती. पण आता शेजारच्या शीलाबाय बरोबर तिचे जुळून आले होते. दोघी रोज डोंगरावरील म्हाळशेच्या मंदिरात जाऊन यायच्या. तेवढेच खूप बरे वाटायचे. रात्री मात्र खूप एकटं वाटायचं. डोक्याखालची ऊशी आसवांनी भरुन जायची. माझ्याच नशिबात हे भोग का असेही वाटायचे. अन् असे मनात येत असतानाच त्या दिवशी जोरात फोन खण..खणला. जोराची लांब बेल म्हणजे अवीचाच असणार. तिने पटकन फोन घेतला. आज अगदी सकाळीच फोन केला. अवी बोलत होता. जयू ऐकत होती. तिच्या चेहऱ्यावरचे भाव क्षणाक्षणाला बदलत होते. फोन संपला तसा रिसिव्हर ठेवला अन् ती चक्क खालीच बसली फतकल मारुन.

तिने कपाळावरील घाम पदराने हळूच टिपून घेतला. चेहऱ्यावर सुंदर स्मितहास् पसरले. ती ताड्कन उठली. धावतच शीलाबायकडे गेली. 'शीलाबाय शीलाबाय आहेस का ग घरी ?' 'अगं तुझ्याकडे येणाऱ्या कामवाल्यांना सांग आजच माझ्याकडे येऊन सर्व बंगला नीट साफ करायला. माझ्याही कामवाल्यांना मी सांगणारच आहे. अगं, अवीला गोव्यात चांगली नोकरीची ऑफर मिळाली आहे. लीनाला येथील कॉन्वेंट स्कूल मध्ये प्रवेश पण मिळाला. चार दिवसांतच ते येणार आहेत. चला कामाला लागूया.' 'देव पावलो गे बाये शीलाबाय म्हणाली. जयू धावतच घरी आली. तिच्या बाय आजीची तिला प्रकर्षाने आठवण आली. तिला नातीचे धार्जिणे होते ते तरी मला मिळाले – भले नवऱ्याचे नसेना का - लांबून येणारा म्हाळशेच्या देवळातील घंटानाद मनात ऊमेद भरत होता. अन् मन गुंतत जात होतं ते नातीच्या धार्जिण्यावर...

■

मानसी बोरकर
बी ४, मधुराज नगर, कृष्णा हॉस्पिटल जवळ, पौड रस्ता पुणे - ३८
९३७००९५३१७



संगीता फुके

संगीता फुके.

डिप्लोमा इन जर्नालिझम, मास कम्युनिकेशन, सीईआरटी कोर्स रशियन भाषा. फ्री लान्सर, लेखिका, सामाजिक कार्यकर्ती. नारी पत्रकार भूषण पुरस्कार, नाशिक आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सव सन्मानीत, जी. डी. आंबेकर श्रम गौरव साहित्य पुरस्कार.

# गोलू



गोलू, नावाप्रमाणेच गोल गुटगुटीत बाळ, गोऱ्या गोबऱ्या गालाचे. नकटे नाक, गालावर छोटी खळी, हलके तपकीरी डोळे, हलक्या भुरक्या रंगाचे केस. कपाळावर थोडे पुढे येवून भुरभुर उडणारे. नाजूक जीवनी, हसरा बोलका चेहरा. पाहताक्षणीच मन मोहवून टाकणारे बाळ. चार सहा महिन्यांचा असताना मी त्याला सर्वप्रथम पाहिले, वाटायचं की हा एखाद्या राजघराण्यात जन्माला यायला हवा होता. राजबिंडा राजपुत्र शोभून दिसला असता. पण त्याच्या नशिबात तर सर्वसाधारण माणसाचे आयुष्य देखील सुखासुखी लाभणार नाही याची पुसटशी कल्पना सुद्धा त्याला बघीतले तेव्हा मनाला शिवली नव्हती.

छोट्याशा गावातले दोन खोल्यांचे त्याचे छोटेसे घर, घरात आई नेहा, वडील अनिल. आजी आजोबा आणि सर्वांचा लाडका गोलू, त्याची आई

नेहा त्याच्या जन्मासाठी माहेरी आली मुळात तेच फार मोठ्या संकटातून वाचल्यासारखी. नाकी डोळी नीटस असणारी ती दुरच्या खेड्यात लग्न करून गेली आणि शहरातल्या राहणीमानाला सोडून तिला खेड्यातल्या प्रथेप्रमाणे साडी, डोक्यावर पदर अशा वेशभूषेत यावे लागले. तशी ती बारावी शिकलेली पण माहेरी कुटुंब मोठे पर्यायी वडिलांवर जबाबदारी जास्त. तीन बहिणी व दोन भाऊ यांचे लग्न करून दिल्यानंतर आपल्या स्वत:च्या पाच मुली आणि एक मुलगा एवढ्या जबाबदाऱ्या त्यांच्यावर होत्या. पाच मुलीतली नेहा चवथ्या नंबरची. लहानपणापासून एका खोलीच्या संसारात आई वडील चार बहिणी व एक भाऊ एवढ्या मोठ्या कुटुंबात दिवस काढलेले. कळायला लागल्यापासूनच आईला घरकामात आणि स्वयंपाकात मदत करता करता शिक्षण घेणे सुरू होते.

अवघी बारावीची परीक्षा दिली की घरात लग्नाचा विषय सुरू झाला. बऱ्यापैकी स्थळ बघून लग्न होऊन ती सासरी गेली. अनिल मेकॅनिक.. सकाळी गेला की रात्रीच येणार. दिवसभर हिला दमवल्यानंतर सुद्धा सासुची हिच्यावर करडी नजर की हिने नवऱ्याला काही सांगू नये. नवरा दिवसभरानंतर भेटल्याच्या आनंदात ती सगळया तक्रारी विसरून जात असे पण सासुच्या तक्रारी संपत नसत. हिला दिवस गेले आणि सारख्या सारख्या तक्रारी, कटकटींना कंटाळून अनिलने गॅरेजवरच मुक्कामाला सुरुवात केली. ओघाने दारु पिणे आलेच. कधीतरी घरी आल्यावर आईचा तक्रारींचा पाढा वाचून झाल्यावर मग याची तिला मारहाण, मग भांडणं. पोटातले बाळ अशाच वातावरणात मोठे होत होते. एकदाचे मोठे भांडण करून सासुने नेहाला घराबाहेर काढले. गरोदर असूनही पोटात अन्न नाही. शेवटी आई वडील माहेरी घेवून आले, मग जरा बरे दिवस आले. पोटभर जेवण, मनासारखा आराम आणि प्रेमाचे चार शब्द कानावर पडू लागले ..सुख अजून काय असते?आणि मग एके दिवशी ह्या बाळाचा जन्म झाला. मुलगा झाला आता तरी सासरच्या मंडळींच्या वागण्यात काही फरक पडेल असे वाटत होते पण नाही, परत.. ये रे माझ्या मागल्या..सासरी परतल्यानंतर तिची ससेहोलपट सुरू झाली. घरचे करु की बाळाला बघू..सासुच्या तक्रारींना तर काही अंत नव्हता. प्रेमाने गोलू नाव ठेवलेले ते बाळ बाळसं पकडायचे सोडून सुकून गेले. अनिल मुलाच्या ओढीने आणि बायकोच्या बराच काळच्या दुराव्याने पुन्हा घरी येवू लागला होता एवढीच जमेची बाजू. जरा कुठे आनंदाने जगायला सुरुवात झाली तर सासुच्या कटकटी सुरू झाल्या, त्यात गोलू ची फरफट..बिचारं गोंडस बाळ रडून हैराण होत असे. त्याचे आजोबा, अण्णाबाबा मग त्याला उचलून बाहेर घेऊन जात. हळूहळू नवऱ्याचे पिण्याचे प्रमाण वाढले, बाहेर मुक्काम वाढले.

नेहा मुलाकडे बघत दिवस काढू लागली. गोंडस बाळ अण्णाबाबा सोबत बाहेर भटकून वेळ घालवू लागले. बाबा फिरवून आणायचे, खाऊ घेऊन द्यायचे. गोलूला त्यातच आनंद वाटायचा. पण त्याच्या आनंदाने घरच्या वातावरणात काही फरक पडला नव्हता. कटकटी, धुसफूस याला अंत नव्हता... अशातच नेहा दुसऱ्यांदा गरोदर राहिली. आता तर तिची जास्तच आबाळ होवू लागली. एकतर शरीर आधीच तोळामासा, त्यात गर्भारपण, कामं चुकत नव्हती आणि नेहाची कोणतीच गोष्ट सासुला बरोबर वाटत नव्हती. आयुष्याचा जोडीदार वाट चुकला होता आणि त्या चिंतेत ही हरवून जात होती. अधूनमधून कोणी माहेरचे आले की तेवढाच दिलासा. जवळच सासर असणारी मोठी बहिण अक्का किंवा आत्या कोणीतरी चक्कर टाकून जात. तिच्या ह्या दुरावस्थेच्या बातम्या माहेरी पोहोचल्या की सर्वांची विशेषत: आईच्या जीवाची घालमेल होत असे.

अशातच एक दिवस सासूने, बाळंतपणाचा खर्च नको म्हणून काहीतरी कुरापत काढली आणि मग परत एकदा नेहाची रवानगी माहेरी झाली. खप्पड झालेले गाल, पांढरी फिक्कट पडलेली नेहा माहेरी आली तरी मनाने व काळजीने अनिल जवळ व आपल्या संसारातच अडकलेली होती. अनिल मात्र सर्वार्थाने कटकटीतून सुटला होता. आईची बडबड नाही की बायको पोराची जबाबदारी नाही. त्याला आता काम संपले की एकमेव काम उरले होते, पिणे...

मामाच्या गावाला आल्यानंतर गोलूचे मात्र लाड व्हायला लागले. मामा, दोन मावशी, आजी, बाबा.. मागितले ते मिळायला लागले. नेहाची पण तब्येत जरा बरी झाली. आई वडिलांना आपले ओझे नको म्हणून तशा अवस्थेतही ती स्वत:साठी काम शोधू लागली. एवढ्या वाईट परिस्थितीत नवरा सुद्धा साथ देत नाही म्हणून तिने निश्चय केला की दुसरे बाळ झाल्यावर आई वडिलांच्या आसपास राहून दोन्ही मुलांना एकटीनेच वाढवायचे, सासरी अपमान सहन करायला परत जायचे नाही. नाही म्हणता आता अनिलने तिला फोन करणे सुद्धा बंद केले होते आणि तो पूर्णपणे दारुच्या आहारी गेला होता. त्याची प्रकृती खालावत गेली आणि एक दिवस निरोप आला की तो सिरीयस आहे. त्याला तिच्या माहेरच्या हॉस्पिटलमध्ये दाखल करण्यात आले आहे. शेवटी बायकोच ती, सर्वकाही विसरून एक लेकरु हाताला, एक पोटात घेवून नवऱ्याची सेवा करु लागली. गोलू लहान असल्यामुळे त्याला सुद्धा ते काही दिवस दवाखान्यात काढावे लागले. तो आईला सोडून रहायला तयार नव्हता. अशा रीतीने त्या लहानग्या जीवाची आईबरोबर धावपळ होत होती.

एके दिवशी तिच्या सासरच्या मंडळींनी तिला सांगितले की त्याला आता ठिक वाटतंय, घरी घेवून जायला सांगितले आहे, आम्ही सर्व गावी जातो तू आता माहेरी जा, हॉस्पिटलचे बील भरण्यासाठी तिच्या आई वडिलांकडून काही पैसे घेतले आणि ते सर्वजण त्याला

घेवून गेले. तिच्या वडिलांना दुसऱ्या दिवशी निरोप मिळाला की अनिल गेला, तिच्यावर आभाळ कोसळले. साडेतीन-चार वर्षांचा मुलगा सोबत आणि सातव्या महिन्याची गरोदर. तशीच सासरी गेली, तिला तिथे पाहुण्यासारखे वागवण्यात आले, जसे काही तिच्या नवऱ्याच्या मृत्यूला ती कारणीभूत होती. लहानग्या गोलूला काही कळेना काय सुरू आहे, अण्णा बाबा फिरायला नेत नाहीत की कोणी त्याच्याकडे लक्ष देत नाही. तो एका कोपऱ्यात शांतपणे बसून होता. तिसऱ्या दिवसाच्या विधिंनंतर तिला तिच्या नातेवाईकांसोबत एक बाळ पोटात, एक बोटाशी अशा अवस्थेत घराबाहेर हाकलण्यात आले. नवरा खाल्लास, आता तुझे इथे काही नाही. परत तुझे तोंड आम्हाला दाखवू नकोस.

दु:खी व अपमानित ती माहेरी परतली, नेहमीसाठी. गोलूला फार रडायला यायचे. माझ्या मम्मीला त्या लोकांनी घराबाहेर काढले. ते सर्वजण फार वाईट आहेत, तिच्या सोबत भांडले. असे सगळ्यांना सांगायचा. म्हणतात ना, खरेच आहे ते. लहान मुले ओल्या मातीसारखी असतात, जशी घडवली तशी घडतात. हळूहळू सर्वांच्या सानिध्यात त्याला या घटनांचा, त्याच्या गावाचा, तिथल्या बोलीभाषेचा विसर पडू लागला. दोन महिन्यांनंतर नेहाला मुलगी झाली. गोलू सारखीच गोड. तो आपल्या बहिणीचे कोडकौतुक बघण्यात रमू लागला.तिच्या सासरचे मात्र कोणीही फिरकले नाही. गोलूच्या मनात घरात चालणाऱ्या चर्चांवरुन एक गोष्ट घट्ट रुतून बसली की त्याचे गावाकडचे आजी आजोबा फार वाईट आहेत, त्याच्या बहिणीला बघायला सुद्धा आले नाहीत.

कालांतराने नेहाने घरकाम करुन आई वडील व तिच्या पेक्षा मोठी बहिण (जी तिचा पहिला नवरा वारल्यामुळे व पुन्हा दुसरे लग्न केल्यावर तोही दारुडा निघाल्यामुळे त्याला ही सोडून आई वडिलांचा आधार होवून रहात होती) सोनाली यांना हातभार लावायला सुरुवात केली. या कालावधीत नेहाच्या सासरच्या मंडळींनी एखाद दोन वेळा गोलू सोबत बोलण्यासाठी फोन केला पण नेहाने त्यांना रागाने गोलू सोबत बोलू दिले नाही. समजा एखाद्या वेळेस मामाने गोलूला त्यांचा फोन दिला तरी तो आजोबांना "तुम्ही फार वाईट आहात" एवढे बोलून फोन बंद करत असे. अशा रीतीने नेहाची मुलगी परी दहा महिन्याची झाली व पुन्हा एकदा नेहाच्या आयुष्याला पर्यायाने गोलू व परीच्या आयुष्याला कलाटणी मिळाली.

नेहाच्या आत्याने नेहा साठी तिच्या गावातले एक स्थळ सुचवले. मुलाचे लग्न कुठल्याशा छोट्या कारणाने जमत नव्हते म्हणून ते या दोन मुलांच्या आईसोबत त्याचे लग्न करायला तयार झाले. परीला नवीन

दु:खी व अपमानित ती माहेरी परतली, नेहमीसाठी. गोलूला फार रडायला यायचे. माझ्या मम्मीला त्या लोकांनी घराबाहेर काढले. ते सर्वजण फार वाईट आहेत, तिच्या सोबत भांडले. असे सगळ्यांना सांगायचा. म्हणतात ना, खरेच आहे ते. लहान मुले ओल्या मातीसारखी असतात, जशी घडवली तशी घडतात. हळूहळू सर्वांच्या सानिध्यात त्याला या घटनांचा, त्याच्या गावाचा, तिथल्या बोलीभाषेचा विसर पडू लागला.

घर स्विकारणार होते पण गोलूला मात्र आईपासून दुर रहावे लागणार होते. तो मामाच्या गावाला राहणार होता. तो ही तयार होता, सगळे माहेरचे ही तयार होते फक्त नेहाला मान्य नव्हते की तिला तिच्या मुलापासून दुर रहावे लागेल. तिची समजूत काढण्यात आली की तुला हवे तेव्हा त्याला भेटता येईल. तो शहरात राहिला तर त्याचे शिक्षण चांगले होईल.

एकदाची ती तयार झाली पण या गोष्टीची भनक तिच्या आधीच्या सासरच्या मंडळींना कुठून तरी मिळाली आणि एक वर्षभर तिची काहीच खबरबात न घेणाऱ्या मंडळींचे फोनवर फोन सुरू झाले. आम्हाला गोलूला भेटायला यायचे आहे. एक दिवस सर्वजण येवून धडकले. गोलूला खाऊ आणला, त्याला बोलले की तुला अण्णाबाबा फिरायला घेवून जातील, मोबाईल खेळायला देतील. तू आपल्या घरी चल..तुझी मम्मी वाईट आहे, दुसऱ्या माणसा सोबत लग्न करते आहे. गोलूच्या मनात आईविषयी बंडाचे बीज पेरूनच ते परत गेले. अवघ्या पाच वर्षाच्या मुलाच्या मनाची किती द्विधा मन:स्थिती झाली असेल. केवढी घालमेल होत असेल. अखेर त्याने तडजोडीचा मार्ग स्विकारला, जो समोर असेल तो आपला, जो लाड करेल तो आपला.

अनिलच्या वर्ष श्राद्धाच्या निमित्ताने गोलूला गांवी घेवून येण्याचा निरोप मिळाला तसे नेहाचे आई वडिल, नेहा, गोलू सर्वजण गेले. कार्यक्रम संपल्यावर नेहा सोबत सर्वजण भांडले व तू आता लग्न करणार आहेस तर तुला आता आमचा मुलगा मिळणार नाही म्हणून गोलूचा ताबा घेतला व तिला नेहेमीप्रमाणे हाकलून दिले.

नेहाचे लग्न झाले, चार दिवसांत परत पाठविण्याच्या अटीवर नेहाचा नवीन दीर गोलूला घेवून आला होता. पण गोलू एकदम परक्यासारखा वागत होता.. माझ्या आईने पळून जाऊन दुसऱ्या माणसा सोबत लग्न केले आहे आणि आता ती माझी आई नाही. मला माझ्या अण्णा बाबाकडे जायचे आहे, असे परत जाताना म्हणून गेला.

परवा गोलूच्या वाढदिवसाच्या शुभेच्छा देण्यासाठी मावशीने फोन केला तर गोलूनेच फोन घेतला आणि "मी दुसला मुलगा बोलतो आहे, गोलू बाहेल गेला आहे" म्हणून गोलूने फोन बंद केला.

■

संगीता गिरीश फुके
नाशिक
९४२०३६२१९५



डॉ. विनिता आपटे

डॉ.विनिता आपटे

एक यशस्वी सूत्रसंचालक, मुलाखतकार, छोट्या पडद्यावर सी.आय.डी सारख्या मालिकांमधून चमकलेली अभिनेत्री, लेखिका, पॅरीसमध्ये संयुक्त राष्ट्रसंघाच्या पर्यावरण विभागात (UNEP ) जनसंपर्क सल्लागार, आता तेर पॉलिसी सेंटर या आंतरराष्ट्रीय पातळीवर पर्यावरण विषयक काम करणाऱ्या संस्थेची संस्थापक आणि अध्यक्ष.

# संस्काराचे विद्यापीठ - माझी आजी

एक दगड कष्टाचा

एक दगड काळाचा

एक दगड त्यागाचा

वात्सल्याचा थर घाटासाठी वापरायचा

अशी सुरेख चूल घरोघरी असलेली

घर सांभाळणारी ....घर जोपासणारी

तिचेच नाव गृह स्वामिनी ,गृहलक्ष्मी ,

घरधनीन ,

अशी गृहघराने वेढलेली ,घरभर घुमणारी भोवऱ्या सारखी

दंग आणि अतृप्त

कुठे कुठे किंवा बहुतेक घरातून शिजणाऱ्या पदार्थांच्या खमंग वाफा बाहेर

दरवळतात आणि दूर दूर पसरतात आणि कुणी त्या चविष्ट वाफांची वाक्ये घडवतात

मथळे पाडतात

आधुनिक स्वतंत्र स्त्री ,स्त्रीचा विकास स्त्रीची प्रगती पथावरील वाटचाल इत्यादी इत्यादी

कानामनाला वाक्ये गोड लागणारी

आकडेवारीची प्रगती तर सूर्यापर्यंत पोचणारी,

संध्याकाळी कातरवेळी दमून भागून उजव्या डाव्या हातातील

पर्स, पुडकी नि पिशवी सांभाळीत घरी परतणारी ती गार्गी मध्यमवर्गी ती त्या मथळ्यांची मालकीण

पर्सच्या हुद्याबरोबरच सांभाळून आणलेल्या त्या वाक्यांची लाकडे चुलीला लावते

अधिक लवकर चहा व्हावा म्हणून

चहाच्या तरतरीतच पंख आवरून घ्यायला हवेत

आणि मग कुकर, मग पोळ्या, मग फोडण्या, थोरापोरांच्या मनधरण्या नोकरांच्या, काचण्या

कितीतरी धागे, घट्ट जखडून ठेवणारे

सगळाच शिणावता, शिजणारी तीच

आणि शिजवणारी तीच

कवियत्री इंदिरा संतांची ही कविता म्हणजे जवळपास चाकरमान्या स्त्रियांचं प्रातिनिधिक स्वरूप. मध्यमवर्गात जगणारी स्त्री यशस्वी होते तेव्हा ती याच मार्गावरून गेलेली असते असा मला वाटतं. एखाद्या निवांत संध्याकाळी स्वतःच्याच विचारात मी दंग रहाते तेव्हा मला अशा कितीतरी स्त्रिया अदृश्यपणे माझ्या बरोबर वावरताना दिसतात. त्या पाउल वाटेवर मला सर्वप्रथम दिसते ती माझी आजी. विलक्षण सुंदर , गोरीपान, घारे डोळे, उंच शेलाटा बांधा व सतत कार्यमग्न असलेली माझी आजी म्हणजे कवितेची नायिका असं मी तिला म्हणायची. सुख फारसं कधी तिच्या वाट्याला आलं नाही पण दुःखाचा कधीच तिने बाऊ केला नाही. वयाच्या १२ व्यावर्षी लग्न बंधनात अडकली तेव्हा तिचा नवरा म्हणजेच माझे आजोबा ४३ वर्षांचे होते व तो त्यांचा तिसरा विवाह होता. लग्नाच्या पहिल्या रात्री अंगापेक्षा बोंगा असलेल्या त्या नऊवारी साडीचे ओचे पदर सावरत घरात जमलेल्या ५० माणसांचा स्वयंपाक करण्याचं काम तिच्यावर सोपवलं व ते तिच्याच गळयात पडलं. नंतर निसर्गाच्या चक्रात अडकलेली ती नवऱ्याचा जुगारीपणा त्यामुळे आलेल्या जप्त्या, मुलांची दुखणी खुपणी काढत संसार रेटत राहिली. तिची काही सावत्र मुलं तिच्यापेक्षा वयानी मोठी होती. या रहाटगाडग्यात आणखी एक घाला दैवाने घातला व ती विधवा झाली. वय तेहतीस, पोटी एक मुलगी, शिक्षण जेमतेम नवऱ्याने कर्जाशिवाय काहीही मागे ठेवलं नाही बिचारीला अश्रू पुसायलासुद्धा वेळ नव्हता. पण या दुःखाची पुसटशी जाणीव सुद्धा तिने कधीही कोणाला करून दिली नाही. अगोदर दाईचा व नंतर नर्सचा पेशा स्वीकारला व तळेगाव जनरल हॉस्पिटल मध्ये ती रुजू झाली .

अखंड कष्ट करणारी तिची मूर्ती माझ्या आजही डोळ्यासमोर आहे. तिच्या दुर्दैवाशी लढताना तिने कधीही हार मानली नाही उलट ती इतकी उत्साही होती की कामातला बदल हीच तिची विश्रांती असायची. स्वच्छता, टापटीप ,नेटकेपणा हा तिचा स्थायीभाव. स्वतःची दुःख बाजूला सारून दुसऱ्याला मदत करायला सतत तयार. किती कष्ट करायची ती पण दुःखात सुख शोधण्याकडे तिचा कल असायचा. हॉस्पिटलची इतकी कष्टदायक नोकरी पण त्यानंतर ती उत्साहाने नाटकात कामं करायची, खूप ट्रिपा काढायची, तळेगावात तर ती अगदी प्रसिद्ध. सगळ्या गावाला लोणची, मुरंबे, पापड कुरड्या करून द्यायची. कोणाला काही कमी पडत असेल तर हात पुढे मदतीसाठी. मला आजही तिचा विचार मनात आला की वाटतं की सकारात्मक विचारांचा प्रभाव असेल तर प्रतिकूल परिस्थितून मार्ग काढता तर येतोच पण स्वत:बरोबर दुसऱ्यांना सुधा आनंद देता येतो.

तीस वर्ष तळेगावात नोकरी करून निवृत्त झाल्यावर ती पंढरपूरला काही वर्ष आणि नंतर उर्वरित आयुष्य आळंदीला राहिली. स्वतःची छोटी घेतलेली खोली, आयुष्यभर साठवलेल्या पै पैशातून नातवंडांना, जावयांना काहीतरी देत राहण्याचा तिचा उत्साह कधीही कमी झाला नाही. हॉस्पिटल मध्ये एकदा संध्याकाळच्या वेळी ती राऊंड घेत होती एका वॉर्ड मध्ये नाक डोळे लाल करून मुसमुसणारी तरुणी बघून ती थांबली. एकदा वाटलं तिला की असेल काहीतरी किरकोळ पण बराच आरडाओरडा चालू होता व ती मुसमुसणारी तरुणी तोपर्यंत जवळजवळ वेदनेने कळवळायला लागलेली होती. आजीनी एका नजरेतच तिची अवस्था ओळखली व तिला लेबररूम मध्ये तातडीने नेलं. हॉस्पिटल मधली सगळी माणसं तिला काहीतरी सांगायचा प्रयत्न करत होती पण आजी फक्त त्या तरुणीची सुटका करण्याच्या प्रयत्नात होती. त्या तरुणीने मुलाला जन्म दिला. शिरस्त्या प्रमाणे तिचा फॉर्म कुठे आहे याची चौकशी केल्यावर तिच्या लक्षात सगळा प्रकार आला. मुलगी अनाथ होती त्यातच दिवस गेल्यावर काही कारणांनी तिला नवऱ्यानं पण नांदवायला नकार दिला होता आणि त्याचमुळे ती वेणा येऊन विव्हळत होती तरी तिला हॉस्पिटल मध्ये भरती करून घ्यायला कोणी तयार नव्हतं. आता खरी परीक्षा होती, हॉस्पिटलला तिच्या नातेवाईकांची नावं, पत्ता सगळं पाहिजेच होतं नाहीतर कायदेशीर अडथळे आले असते. आजीने कुठल्याही प्रकारचा विचार न करता शांतपणे त्या मुलीची पालक म्हणून स्वत:चं नाव लावलं गंगुताई ओक. इतकच करून ती थांबली नाही तिचं संपूर्ण बाळंतपण तिने स्वतःच्या घरी केलं. पुढे तिलाही नर्सिंगचा कोर्स करायला लावला व स्वतःच्या पायावर उभी केली. त्या दिवसानंतर ज्या पेशंटचं कोणी नसेल त्यांचं पालकत्व स्विकारायची जबाबदारी आपोआपच आजीवर आली व तिनेही ती न कुरकुरता निभावली.

रोजचा दिवस उत्सवासारखा साजरा करणाऱ्या माझ्या आजीचा दिवाळीतला उत्साह तर आगळा वेगळा असायचा. घरदार चकचकीत करून पायली पायली फराळाचं करून सगळ्या आजूबाजूच्या लोकांना वाटायचं . पहाटे ४ वाजल्यापासून घंघाळभर पाणी उकळून पाटावर बसून सगळ्यांना औक्षण करून अक्षरश: अंघोळीला ढकलायचं. घरातला कोपरा आणि कोपरा तिच्या उत्साहाच्या आवेगाने उजळलेला असायचा. आजी जाऊन ३८ वर्ष झाली पण प्रत्येक दीवाळी मध्ये ती सूक्ष्मरुपाने माझ्या अवतीभवती वावरत असते . माझ्याकडून दीवाळीच्या स्वागताची सगळी व्यवस्था तीच तर करून घेते व वर्षभराची ऊर्जा मला देऊन जाते .

डॉ . विनिता आपटे
७, हेमदत्त, मृत्युन्जय कॉलनी,
कोथरूड, पुणे ४११०३८
९८२२०९१५३७



मेधा माधव तेलंग

मेधा माधव तेलंग

विविध मासिकांमधून ,दिवाळी अंकातून कथा, कविता आणि लेख प्रसिद्ध. नाटक,एकांकिका, नाट्येछटा,प्रवास वर्णन, कवितेचं पुस्तक,प्रश्न, उत्तराच्या माध्यमातून तयार झालेले "रंग उमलत्या मनाचे"हे पुस्तक. सात पुस्तकांचे लेखन..एका एकांकिकेचे सादरीकरण..

# त्याचं अस्तित्व...



प्रसन्न पहाट होती, छानसा वारा सुटला होता..

प्रवासाचा आनंद वाटत होता कारण हिरवागार निसर्ग साथीला होता.

कधी रिमझीम तर कधी धुंवाधार पडणा-या पावसाचा मनमुराद आस्वाद मी घेत होते..

चिंब भिजलेली सृष्टी पाहून वाटत होतं..

जणू परमेश्वर आनंदाची उधळण करीत आहे...

हिरवा शालू नेसलेली धरणी माता, त्यात डोंगरातल्या दिसणा-या काळया कातळाचा रंग खूप सुखावत होता..

दूरवरुन वाहणारा निवांत धबधबा..

तर कुठे निसर्गाने आकारलेलं छानसी तळी,

या सुंदर रुपाकडे पाहून मन खूप प्रसन्न झालं होतं.

कुठे झुळझुळ वहाणारी नदी तर कुठे वाट काढत आलेलं हळुवार वहाणारं पाणी..

हिरवंगार नाजूक गवताचं पठार. त्या गवताच्या पात्यावर असणारे पावसाचे, गवताच्या पात्याला पेलवतील असे गोंडस थेंब...

आता मात्र पाऊस थोड्या वेळ, विश्रांतीसाठी गेला होता...

सर्वत्र लख्ख उजाडलं होतं.. हिरवा रंग वेगळंच सौंदर्य लेवून सुरेख दिसत होता..

हिरव्या रंगातल्या छटा मनाला मोहवत होत्या...

खरंच ,मन प्रसन्न असलं की सगळं कसं छान वाटतं...

काल पर्यंत मनात साठलेलं मळभ दूर होतं होतं...

मळभ फारचं अस्वस्थ करणार होतं. काळजाला कुठे तरी दुखावणारं.

घडलं असं होतं...माझ्या जावयाचा अपघात झाला होता..

फोन वाजला. कोण बोलतयं? अहो मोठ्यांनी बोला, नीट ऐकायला येत नाही. आपण कोण बोलताय? मी मिसेस देशपांडे बोलतीये..आपण कोण?... रमेश देशपांडे, हो ते माझे मिस्टर..रमेशचा अपघात झाला आहे. आम्ही त्यांना आता कल्याणच्या संजीवन हॉस्पिटलमधे एडमिट केलंय... अपघात झाला..फोन त्याची बायको...

रेवानीच उचलला होता काय ?केव्हा ?कुठे ?कसा ?नेहमी सहज येणारे भावनेने थबथबलेले शब्द..

काय झालं रेवा? अगं,रडते का? कुणाचा फोन होता? सासूबाई कडेवर एक वर्षाच्या अवंतीला घेऊन विचारत होत्या. मागून अमेय आला तीन वेळा चालता चालता लुडकत येत होता. आताच बाबा,बाबा म्हणू लागले होते दोघं, दोघं जुळी गोंडस बाळं..

आई सतत विचारत होत्या अगं, काय झालं? सांगतेस का? जीव जाईल माझा. काही क्षणात रेवा शुद्धीवर आली म्हणाली, "आई, आई, रमेशचा अपघात झाला. "काय ? घाबरुन त्यांनी अवंतीला खाली ठेवलं आणि डोक्याला हात लावून रडू लागल्या. फोन कुणी केला होता ..रत्यावरच्या कुणीतरी.. काय? आता तो कुठे आहे?.. तो कल्याणच्या संजीवन हॉस्पिटलमधे आहे.

बापरे, आता काय करायचं? थांबा घाबरु नका..तो माणूस म्हणत होता की ते रमेश माझ्याशी बोलत होते. त्यांनीच आपला फोन नंबर दिला. परमेश्वरा साभाळ रे माझ्या बाळाला..

अपघात फारच भयानक झाला होता. जोरजोरात कोसळणा-या पावसाने हवा धूसर होती. वायपरने काच पुसत पुसत रमेश रस्ता शांतपणे मागे टाकत होता. पण समोरचा मोठा खड्डा जो पाण्याने भरलेला होता त्यात गाडीचं पुढचं चाक इतकं जोरात जाऊन उंच उडलं. त्या जोरामुळे गाडी दोन वेळा उलटी, पालटी होऊन समोरुन येणा-या ट्रक वर जाऊन आदळली. गाडी सगळया बाजूने वेडीवाकडी चेपली गेली. रमेश खूपच घाबरला पण अशावेळी मन स्थिर ठेवणे गरजेचे असते आणि त्या भयानक संकटातून मार्ग काढायचा कसा हे तो जाणून होता.. त्याच्या डोक्याला मात्र दुखापत झाली नव्हती. नशीबच होते. बाकी शरीराचा एकही भाग असा नव्हता की कुठे जखम नाही. गाडीतून बाहेर पडायचे कसे? भरपूर बघे,कोणी मदत करणारे प्रयत्न करत होते पण कोणतेच दार उघडणं शक्य नव्हतं अखेर रमेशने शक्य तेवढा जोर लावून पायानी गाडीची समोरची काच फोडली आणि बाहेर पडला पण त्यामुळे डोक्यात, डोळयात, हातात, पायात सगळीकडे काचा घुसल्या रक्तबंबाळ रमेशला रस्यावरच्या लोकांनी हॉस्पिटलमधे नेले अखेर उपचार सुरु झाले..

रमेशनी घरच्या सगळयांना फोन केले. घरुन बरेच जण कल्याणला निघाले. सगळीकडे बँन्डेज बांधलेला रमेश भयानक दिसत होता पण त्याचा आत्मविश्वास, मनाचा संयम यामुळे तो तरला होता. ट्रेकर असल्यामुळे संकटातून मार्ग काढताना काय, काय करायचं हे त्याला माहित होतं. त्याचा त्यांनी पुरेपूर वापर केला पण हे का शक्य झालं कारण एवढ्या मोठ्या अपघातात त्याच्या डोक्याला मार बसला नव्हता.उपचार सुरु झाले हात, पायाला ब-याच ठिकाणी टाके पडले होते तीन बरगड्यांना खूपच दुखापत झाली होती पण डॉक्टरांच्यामते शरीराची कुठे मोठी मोडतोड झाली नाही. एक महिन्याच्या विश्रांती नंतर बरं वाटेल. इथे जाणवतो तो परमेश्वर..

परमेश्वराचं अस्तित्व प्रत्यक्षात अनुभवलं...

परमेश्वर असतो आणि तो आपल्या सारख्या साध्या,सरळ भक्तांच्या

पाठीशी नक्की असतो. असा,परमेश्वर ,ती शक्ती ,आपल्या पाठीशी आहे असा अनुभव खूप वेळा येतो पण आज जे जाणवलं ते शब्दांपलिकडचं होतं. दूरवरुन धुक्याच्या ढगावर आरुढ होऊन आला होता बाप्पा ...छोटी गोंडस बाळं,त्यांची आई,आणि छानसा बाबा सगळयांना घेऊन आला आणि हसत,हसत.. अलगद त्यांच्या राज्यात सोडून गेला. प्रत्येकाच्या डोक्यावर आशीर्वादाचा हात ठेऊन सुखी रहा म्हणून परत त्या पांढ-या शुभ्र ढगात निघून गेला..

बाप्पा तू खरचं आहेस..किती भाग्यवान आम्ही.. तू आम्हाला दिसलास..

काहीतरी नक्कीच आम्ही पुण्य केलं असणार..

चिमुकला चिवचिवणारा संसार मोहरला. फक्त तुझ्या असण्यानी आणि आमच्या मनातल्या जमेल तशी पण मनापासून केलेल्या भक्तीनी तो संसार परत फुलला..

अशीच कृपा असू दे ..तुझ्या या साध्या, भोळ्या भक्तांवर ठेवशील. नक्की.. खात्री आहे. कुणाच्या रुपात येशील खरंच सांगता येत नाही..काल तर तू लाल गाडीच्या रुपात आलास. दूर वर तुला पाहीलं तर तुझं किती गोंडस रुप होतं पण कधी बदललं तुझं रुप? असं म्हणण्याचं कारणचं रमेश, त्याच्या लाल गाडीत होता आणि रमेशला वाचवण्यासाठी गाडीनी स्वतः तो भयंकर अपघात सहन केला होता, तिच्या लाडक्या रमेशला वाचवलं होतं. जणू गाडीच्या रुपात परमेश्वर त्याच्या जवळच होता.. म्हणूच वाटलं की बाबा, तू कधी रुप बदलून आलास? परमेश्वरा..खरंच धन्य आहेस.. तू ढगात उंच,उंच कुठेतरी असतोस वरुन तुला सारं दिसावं म्हणून ना? तू दूर असतोस पण मनात आतल्या मनाला आम्हाला तू कुठे तरी जाणवतोस. किती छान जाणवतोस.. असंच असू दे रे तुझं छानसं अस्तित्व! तुझं अस्तित्व सगळयांच्या मनात असू दे आणि तू गरज असणा-यांसाठी धावून ये ..हे मी सांगणारी कोण?पण माणूस जेव्हा असा भावूक होतो ना तेव्हा असा प्रसंग कोणावरही येऊ देऊ नये असचं म्हणतो ना...आताच्या या प्रसंगावरुन खरंच आम्ही शिकलो की तुझ्या अस्तित्वाची मनातून आतल्या मानात किती गरज असते.

सौ.मेधा माधव तेलंग
४७८ /अ शनिवार पेठ.
ओम अपार्टमेंट.. पुणे..३०
मोबा. ९६७३७६४२९९






सौ. सीमा गांधी

सौ.सीमा शिरीष गांधी

अनेक वर्षांपासून काव्यलेखन, ललित लेखन, मनाचे सोहळे काव्य संग्रह प्रकाशनाधिन ,नवा गंध नावाचा यूट्यूब चँनेल व मराठी कवितांचा ब्लॉग. अने दिवाळी अंकातून कविता व लेख सातत्याने प्रसिद्ध.

# प्रिय पावसा...



खरतरं बोलायचे असते खूप काही...
पण शब्दच सुचतं नाहीत...
तू येतोस तेव्हा सारे शब्द... सारे अर्थ...
तुला बिलगतात ...
तू मात्र हसतोस ...
माझी तुला व्यक्त करण्याची धडपड पाहतोस...
तरीही हसतोस ...
मनमुराद बरसतोस माझ्या शब्दांचे लाड करतोस...
कधी शब्दांचे हात धरून प्राजक्ता सोबत गंधगिरकी घेतोस... गुलाबाचा काटेरी श्वास अलगद सोडवतोस... बकुळ फुलांचे उमलते मोती अलवार उधळतोस...कधी मृगजळासारखा इंद्रधनुशी वेध घेतोस वेड्या मनाचा...
किती लुभावतोस ...
शब्दांना स्वतः भोवती गिरक्या मारायला लावतोस... ढगांचे, धुक्यांचे संदर्भ बदलत राहतोस सतत...
आषाढातली एखादी सांज उगाच हळवी करतोस...
पक्षांच्या पंखांवरची हुरहुरती थरथर ...
अन् पानापानातून ओघळणारा,

हिरवाईचे रंग रानोमाळ उधळणारा...

रानभरी पाचूने अवघे रानोमाळ मंतरणारा ...

आनंद लहरी...

सरींवर सरी...

मन झपुर्झा होते...

"तुम आ गये हो...नूर आ गया , नही तो चिरागोंसे लौ जा रही थी... जीनेकी तुमसे वजह मिल गयी है...बडी बेवजह जिंदगी जा रही थी..."

खरचं रे

ह्या शब्दांनी असचं तुला बिलगलेलं असावं ...

शब्दांचं चांदणं फक्त तुझ्यावर उधळावं...

तुझ्या या रंग गंध आशयाची भूल मनावर भुरळ घालते ,तुला तुझ्या सरींच्या फटकारांचे भान तरी उरते का रे...तूही वेडाच होतोस... कधीतरी व्यक्त करना माझ्या शब्दांवर तुही माया करतोस... सावळाच तू ...शब्द ही सावळे...ओल्या सरींची शब्द रेखाटणारी ही बोटेही सावळी...

वयाबरोबर वाढतेय लज्जत तुझ्या मेघमल्हारात चिंब होण्याची...

दिवस तुझे माझे...भुलून भिजण्याचे...

तुझे अमूर्त ...लाघवी रुप कधी वळणदार... कधी आर्ततेचे आरव... अगाध तुझी महिमा...तुझ्यासारख्या तूच...तुझ्या सारखा फक्त तूच...

तोच पाऊस...

तेच कोसळणं...

वेड्या मना भुलवतं तेच असणं...

साऱ्या थेंबागणिक न्याहाळत असते, तुझ्या मनाचा कानाकोपरा...

कधी लागतो थांग...

कधी नसतो किनारा...

किती भुलवतोस वेड्या मना...

फक्त मनभर उरावे तुझ्या थेंबाचे शहारे...

सावळे तुझे रुपडे मनभर रेंगाळत असते...

स्पर्शात तुझ्या थेंबाचं मृगजळ उरते...

अन् चातकासारखी मी तुझ्या वाटेवर नजर लावून बसते...

प्रिय पावसा...

जा नाही बोलायचं मला तुझ्याशी,

किती रे वाट पहायला लावतोस, किती ठरवलं होतं बोलणारचं नव्हते तुझ्याशी, पण तू असा आहे स ना ... कितीही ठरवले तरी मन मात्र मानत नाही, अन् परत तुझ्या आठवणी ताज्या होतात, हे असेच चालू असते,तू येईपर्यंत.

खरं सांगू पावसा , कळायला लागल्यापासून तू माझा जीवलग झाला आहेस,कितीदा भिजले आजारी पडले तरीही तुला भेटण्याची, भिजण्याची ओढ आजही तीळमात्र कमी झालेली



नाही, तुला भेटायला येताना आजही तोच वेडेपणा, अल्लडपणा पांघरलेली मी चंचला होते, आणि तुझ्या माझ्या भेटिच्या आभाळाच्या हातात हात घालून फिरते.

पावसा...

मी खरतरं तुझी क्लास टिचर असायला हवी...

चांगल्या उठाबशा काढायला लावल्या असत्या...

आता कारण विचारशील... हो... माहिती आहे मला तुझा आगाऊपणा...

आता एक कारण असतं ना तर सार माफ केल असतं...येतोस उशीराने...

कधी कधी तर दांडी च...

जेवढ्या स असावं ना पण नाही... ती दामिनी तिला ही घेऊन उंडारतोस कधी कधी...

अरे ते बिचार कधीतरी येणार इंद्रधनुष्य घाबरत तुला... तु आपला सतत दादागिरी करत असतोस...

किती खोड्या करतोस, अगदी जीव मेटाकुटीला आणतोस...

तो सोसाट्याचा वारा कशाला रे हवी त्याची संगत...

पण जाऊदे तू आलास ना चांगलीच शिक्षा देईन तुला

कधी कधी वाटतं मी तुझी आजी असायला हवी ,

उपदेशाचे चार डोस पाजले असते... आजीबाई च्या बटव्यातून ...

मग आला असता बरोबर सगळी सोंग ढोंग विसरुन... पण जाऊदे मेलं म्हातारूया माणसाच कोण ऐकतं,बसशील कोपरूयात सारी मंडळी गोळा करून खि खि करत...

आईचं तर ऐकशील ना रे...जाऊदे देवकी यशोदेची माया लावीन रे माझ्या सोन्या...पण कधीतरी तरी ऐक ना आईचा मायेचा हात फिरुदे डोक्यावरून... खुप जीव लावतात रे सगळी तुला, सारी तुझ्या वाटेवर डोळे लावून बसतात, अन् नाही आलास की हिरमुसली होतात, बघ या वेळी धपाटा ही नाही देणार...पण सतावू नको रे सारखं...

बर ते सगळं राहू दे...

मित्र होशील का माझा... कृष्ण सखा...

तुझ्या सरींच्या बासरीचे स्वर असेही मोहून टाकतात सारूयांना ...

तू पशुपक्षी, डोंगर दरूया, नदी, कडे कपारी ,लता, तरुवेली सारूयांचा तू सखा आहेस...

हे बघ सावळया कान्हा मी आपली तुझी वेडी राधाच बरी ...मैत्री च्या नात्यात सुखदुःख वाटून घ्यायला काहीच वाटत नाही, सगळे तराजू सारखेच असतात... एकमेकांच्या उणीवा लपवण्याची किमया लिलया या नात्याला साधली आहे...

मैत्री च्या या नात्याला तु चांगलाच निभावशील,ठाऊक आहे मला, तुझ्या हातात हात घालून मस्त रानोमाळ भटकता येईल मला ही...पाखरांशी गुजगोष्टी करत...

कधी कधी वाटतं या सारूया नात्यांत तू का गुंतावंस...


तू आपला असाच उनाड बरा... अवखळ बरा...

तरीही पावसा तुझ्या वरची माया मात्र अशीच राहील, तू कोणत्याही नात्यात असलास तरी...

फक्त येत रहा रे वेळेवर... बळीराजा च्या डोळयात हिरवं स्वप्न फुलले की बरसत रहा, मनमुराद...

तुझीच सखी
सीमा गांधी

सौ.सीमा शिरीष गांधी
रोहाऊस नंबर 2,सुखवाणी क्लासिक,
मोरवाडी, पिंपरी, पुणे411018
मोबाईल नंबरः 9922957512





नंदिनी देशमुख

नंदिनी देशमुख.

भारत संचार निगम लिमिटेड मधून निवृत्त लेखा अधिकारी. एक कादंबरी, एक कथासंग्रह आणि एक अनुवादित पुस्तक प्रसिद्ध. दोन नाटके आणि चार एकांकिका प्रतिलिपी आणि इ-साहित्य वर प्रकाशित. आकाशवाणीवर कार्यक्रम प्रसिद्ध. वर्तमान पत्रे, मासिके आणि दिवाळी अंकांमधून लेखन प्रसिद्ध. अनेक पुरस्कार प्राप्त.

# लाल लुगडेवाली आज्जी



आमची चिनू, माझी पणती, फार गोड पोरगी .. एकदा अशीच धावत पळत आली आणि म्हणाली ..' पणजी आज्जी, पणजी आज्जी, तुझा बर्थ डे कधी आहे ग..? '

'म्हणजे काय?' .. मी विचारले, तर हसते कशी लब्बाड खुदुखुदू ..

म्हणाली, 'म्हणजे ? तुला माहित नाही? अगं, ते नाही का आपण केक कापतो ते. बर्थ डे गं..! बर..थ...डे ए ए...' पुन्हा हातानी वर केक की काय ते कापल्यासारखे पण करून दाखवले .

'हं ..हं.. म्हणजे ते .. होय? वाढदिवस ..?' मी विचारले ..

'हं... हं.. तेच.. कधी आहे सांग नं ग पणजी आज्जी..'

'मला माहित नाही .'

'माहित नाही ..? कसं ग पणजी आज्जी .. तुझ्या मम्मी पप्पांनी तुला सांगितलेलं नाही का? नाहीतर आपण असे करू या का ? आता आठ तारखेला ना मम्मीच्या मंडळात काही तरी आहे म्हणे, ते गं, महिला दिन का काहीतरी. आपण त्याच दिवशी तुझा बर्थडे करू, चालेल ?'

तिच्या बोलण्याचं, हातवारे करण्याचं अन डोळ्यात लुकलुकणा-या तिच्या आनंदाचं मला मोठं हसू येत होतं ..

'मी सांगते मम्मी पप्पाला अन लहान्या आज्जीला पण सांगते हं...' तिची चिव चिव चालूच होती.

'माझा मेलीचा कसला ग वाढदिवस अन फिडदिवस ..' मी पुटपुटले. पण कार्टी म्हणते कशी,

'अशी तोंडाला पदर लाउन काय हसतेस गं .. आज्जी ..'

न पळाली सुध्दा .

तेवढयात कुंदा वाहिनी आलीच. मला बाई धसकन केलं एकदम. वाटलं ही म्हणेल, 'असे काय बसलात साळू वन्स.. आज आपल्याकडे पाहुणे यायचेत जेवायला माहित आहे नं..?' पण कशाला तिला काही बोलू द्या. आपण आपलं उठावं पटकन.

उठलेच कशी, अन लागले कामाला..

खरं तर कुंदावाहिनी अन मी तशा बरोबरीच्याच. एखाद्या वर्षाने मी मोठी असेल फार झाले तर. पण बाइसाहेबाना आपलं शरीर काही उचलत नाही.. अन मी म्हणे बारा वर्षाच्या पोरीसारखं अजूनही काम करावं. वर पुन्हा तोरा तरी किती! हाताच्या बोटावर नाचवते सगळयांना.

मनात असे काही बाही विचार येत होते. एकीकडे हात काम करत होते. सैपाकाची तयारी चालू होती.. हातांना ती सवयच लागली होती. जन्मभर सोवळं -ओवळं, कुलाचार-देवधर्म, सणवार-पै पाहुणा सगळे कसे व्यवस्थित पार पडत होते. कष्ट करण्यातच सगळे आयुष्य गेले. आपण म्हणावं, चला ..तेवढेच पुण्य आपल्या पदरात. आपल्या कष्टाने तरी का होईना लोकांच्या तोंडात दोन घास जातात नं, चार लोकांनी बोटं चाटून ढेकर दिली की झाले आपल्या मनाचे समाधान .

हे विचार तर चालूच होते..पण चिनू काय म्हणाली ते पण मनातून जाईना. खरेच आपण केव्हा जन्मलो, कुठे जन्मलो, आपले नाव काय.. कुणीतरी आपल्याला दूध पाजवले असेल, तेल लावून न्हाऊ माखू घातले असेल, काही काही माहित नाही.. सगळे साळू साळू म्हणायचे, झाले तेच नाव पडले. साळूची मग साळूआत्या झाले, साळू-मावशी, साळूकाकू, साळूआज्जी झाले.. पणजी आज्जी सुध्दा झाले. पण हे असे काही होणे म्हणजे याला काही अर्थ आहे का ? सगळी आपली दिखावू नाती.. रक्ताचे आहे का कुणी..? भावांचे संसार चालवण्यात अन कष्ट करण्यातच सगळा जन्म गेला मेला.

माझं सगळं जीवनच इपरीत. मी जन्मले कीच माय देवाघरी गेली म्हणे.. सहा वर्षाची असतानाच बापानं लगीन करून दिलंन. खायला नव्हत नं तिथं बापाच्या घरी.... माझ्यासाठी, दिली ढकलून या पंडितांच्या घरात. मी सहा वर्षाची अन नवरा बावीस वर्षाचा. आता तर मला त्याचा चेहरा पण आठवत नाही..

माझी आजेसासू फार चांगली होती. म्हणाली पोरीला आई नाही काही नाही, राहू दे इथेच सासरी. लगीन जरी लहानपणी झाले तरी 'मोठं' झाल्याशिवाय काही सासरी पाठवत नव्हते. पण इथे माहेरी तर सगळा आनंदच होता. मला तर काहीच कळत नव्हते. दिले मला सासरी पाठवून. मी आपली त्या पंडितांच्या वाड्यात हरखूनच गेले. सगळा चिल्लर पोरांचा गोतावळा. जावा, नणंदा अन सासवा तर इतक्या की कोणाशी काय नाते आहे तेच कळत नव्हते. भूक लागली की आजेसासूला खायला मागायचं अन पोरांबरोबर खेळायचं एवढच माहित .

एकदा तर गंमतच झाली.. आम्ही सगळे लपाछपी खेळू लागलो अन मी गेले की लपायला माझ्या नवऱ्याच्याच खोलीत. त्यांनी हसून पाहिले अन धरला की माझा हात. मला आपले वाटत राहिले की खेळातले कुणीतरी पाहिल अन डाव येईल आपल्यावर. काही म्हणता काही कळत नव्हते. नाहीतर आजकालची पोरं, त्यावेळी काय झाले समजलेच नाही. मी आपली खोलीतून बाहेर आले तर सगळ्या बायका नुसत्या खुदुखुदू हसत होत्या तोंडाला पदर लावून. अन खेळातली पोरं लागली की चिडवायला 'ह्ये ... ह्ये.. नवरदेवाच्याच खोलीत लपली.. त्यो तुझा नवरा आहे.. माहित आहे का..' मग मी आपली रडत रडतच आजेसासूकडे गेले. तर झालं .. ती पण हसत होती तोंडाला पदर लावून.

त्यावेळी काय झाले समजलेच नाही. मी आपली खोलीतून बाहेर आले तर सगळ्या बायका नुसत्या खुदुखुदू हसत होत्या तोंडाला पदर लावून. अन खेळातली पोरं लागली की चिडवायला 'ह्ये ... ह्ये.. नवरदेवाच्याच खोलीत लपली.. त्यो तुझा नवरा आहे.. माहित आहे का..' मग मी आपली रडत रडतच आजेसासूकडे गेले. तर झालं .. ती पण हसत होती तोंडाला पदर लावून.

असे सगळे चालू होते. अन मग एक दिवस आक्रीतच झालं. काय झालं, काय नाही काही कळलंच नाही. अन माझ्या नवऱ्याचं मढंच आलं एकदम अंगणात. मला तर रडायचंही कळत नव्हतं. सगळ्या पोरासोरांबरोबर मलाही पाठवून दिलं शेजारच्या घरी. तिथंच जेवायला पण दिलं .

दुसरे दिवशी सकाळी मी गाढ झोपेतच होते तर कुणीतरी खसकन माझे बकोट धरून उठवले अन बसवले हजामाच्या समोर डोके भादरायला. मी आपली चीर... चीर रडत होते, ओरडत होते पण कोणी..कोणी ऐकत नव्हतं. तेव्हापासून हे भादरलेले बोडकं, हे पांढरं कपाळ, भुंडे हात अन हे लाल अलवण आलं नशिबाला.. ते आता जन्माचेच झालं. देवानेच आपली टाळू बडवली आता कोणाला काही बोलून काय उपयोग....

मालक गेले अन चारच महिन्यात मला न्हाण आलं. एका खोलीत कोंडून ठेवलं होतं. फक्त आजेसासू जवळ येवून बसायची अन समजावून सांगायची काय ते. हळू हळू माझं बाहेर पडणं, मुलांमधे खेळणं बंद झालं अन घरात कामाच्या रगाड्याला जुंपली गेले.

पुढे लवकरच आजेसासू गेली. अन ह्या घरात मी पोरकी झाले. सासू सावत्र होती. ती कशाला मला जवळ करील ? तिने तर नुसता छळवाद मांडला होता. रात्रंदिवस नुसते काम.. काम.. अन कामच.. कंबरडे मोडून जायचे अगदी. नंबर एकची भांडकुदळ होती माझी सासू. आजेसासू होती तोपर्यंत तिचे तोंड बंद होते, पण आजेसासू गेली आणि हिच्या तोंडाचा पट्टा सकाळपासूनच सुरु व्हायचा. सकाळी चारला उठून अंगण सडा, केरवारे, विहिरीचे पाणी भरणे, घर सारवणे, सैपाक पाणी असं रहाटगाडगं सुरु होतं. घर सारवायला लागले की दहांदा उठवायची. तस्से शेणाचे हात धुवून सांगितलेले काम

करावे लागे, मग पुन्हा सारवायला घ्यायचे. वर आपणच म्हणायची, 'हिचा अंगतकुळीचा हातच उचलत नाही कामाला...' धपाधपा मारायची.. हिच्या अशा करवादन्यानेच माझा सासरा घर सोडून गेला तो गेलाच. आलाच नाही वापस. कुठे गेला अन काय नाही, पत्ताच लागला नाही.

हे तर जावूच द्या. दुसरा तापही काही कमी नव्हता डोक्याला. तो हज्जाम मेला, डोके भादरायला यायचा अन नको तिथे हात लावायचा मेला. या अख्ख्या आयुष्यात पुरुषाचा हात अंगाला लागला असेल तर तो दोनच माणसांचा. तो म्हणजे माझ्या नवऱ्याचा, एकदाच फक्त लपाछपी खेळताना. तेव्हा मी त्यांच्या खोलीतच लपायला गेले होते तेव्हा. अन ह्या हज्जामाचा, मेल्याचा, पंचवीस वेळा. मढं बसलं मेल्याचं. पुन्हा वर मलाच डोळे वटारून बोलायचा .. 'कुठं काही बोललीस तर याद राख . दाखवतो तुला चांगलीच ..'

वाटायचं, देवा, कुठं फेडतील रे ही सगळी पापं. पण देवाला बिच्या-याला माझी दया आली. असाच एक चुलत भाऊ होता दूरचा, त्याने एकदा माहेरी आणले बायकोच्या बाळंतपणाला, ते पुन्हा पाठवलेच नाही. इथे माहेरी तरी काय. सगळा राडाच कामाचा. दिवसभर मरमर केली तर तुकडा मिळायचा पोटाला खायला. पंचवीस माणसांचे खटले. त्या चुलखंडातच तरफडत राहायचे. दिवसभर जेवणे न खाणे. सगळे झाल्यावर चार वाजता कुठे तुकडा पडायचा पोटात..

एवढे सगळे करत होते पण कांद्या लसणाची चव काही माहित नाही या जिभेला. जे काय करायचे ते सगळे दुस-यासाठीच.

कुणी बाळंतीण असली की मग तर झालेच. दुपारच्या जेवणालाच दिवेलागण व्हायची. अन सारखी कुणी ना कुणी तरी बाळंतीण असायचीच.

मी तर म्हणते.. आत्तापर्यंत पन्नास- साठ तरी बाळंतपणे झाली असतील या हाताने. बाळंतीण बाईचे सगळे काही निगुतीने करायला फार आवडायचं मला. ते इवलेसे बाळ न बाळंतीण बघून मन कसं भरून जायचं. त्या बाईने बाळाला अंगावर प्यायला घेतले आणि त्याचा पिण्याचा चुरुचुरु आवाज ऐकला की छातीतून अशी कळ यायची की बस्स... उठावच वाटायचं नाही तिथून. कसा वेळ जात होता कोण जाणे. भावांच्या बायका-सुनाच काय पण नातसुनांची पण बाळंतपणं केली. आता तेवढे एक मात्र बरे हो, एक नाहीतर दोनपेक्षा जास्त होवू न देण्याच निघालंय ते.

> बाळंतीण बाईचे सगळे काही निगुतीने करायला फार आवडायचं मला. ते इवलेसे बाळ न बाळंतीण बघून मन कसं भरून जायचं. त्या बाईने बाळाला अंगावर प्यायला घेतले आणि त्याचा पिण्याचा चुरुचुरु आवाज ऐकला की छातीतून अशी कळ यायची की बस्स... उठावच वाटायचं नाही तिथून. कसा वेळ जात होता कोण जाणे.

असंच गेलं सगळं आयुष्य. कसं गेलं ते पण कळलं नाही. मधून मधून देवळात कीर्तनाला जायला मिळायचं, बस.. तेवढाच एक विरंगुळा. ते कीर्तनकारही अशा गमती जमती करायचे की बस. हसून हसून पुरेवाट व्हायची अगदी .

परवा तर गंमतच झाली एक. दुस-या एका नातसूनेच्या मुलाचे बारसे होते. चिनू आली अशीच पळत पळत.. आणि आईच्या कानात काहीतरी कुजबुजली. तिची आई पण हसू लागली. मला कुठे राहवतंय, मी विचारलेच,

'काय झालं गं ..?' तर म्हणाली.. 'साळूआत्या, चिन्मयी म्हणतेय या पांढ-या शुभ्र पातळात पणजीआज्जी कित्ती छान दिसते..'

'अगं सटवे ..' मी हात उगारला तशी जवळ येवून, लाडीगोडी लावून म्हणाली, 'पणजी आज्जी. तू ते लाल लुगडेच का नेसतेस गं रोज रोज. सगळे तुला 'लाल लुगडेवाली आज्जी' म्हणतात. तू दुसरे पातळ का नाही नेसत? मी पप्पांना सांगू का तुझ्यासाठी छान छान पातळ आणायला..'

आता मी तिला काय बोलू कप्पाळ! मनातून तिचे बोलणे कितीही आवडले, कितीही बरे वाटले तरी तसे दाखवता येत होते थोडेच ? मी आपली नेहमीसारखी बोलून गेले, 'मला ग मेलीला कुठ जायचं मिरवायला..'

त्या दिवशी तसे म्हणाली अन आज म्हणाली .. तुझा वाढदिवस करू म्हणून.. मग मी चिनूच्या आईला विचारले ... 'काय ग ..काय आहे तुमच्या मंडळात .. चिनू काही तरी म्हणू लागली ...'

'हं ... हं.. ते होय? अहो महिला दिनाचे कार्यक्रम आहेत साळूआत्या. दर वर्षी किनई साळूआत्या, आठ मार्चला महिला दिन साजरा करतात. त्याचे कार्यक्रम करतो आम्ही.'

ती अजून काही बाही, काय, काय सांगत होती. मला काहीच कळत नव्हते. पण आता ती एवढे सांगत होती तर काही कळत नाही असे तरी कसे दाखवायचे ?

मग मी म्हणाले, 'समजलं, बरं समजलं, दरवर्षी आपण सगळे सण साजरे करतो तसाच हा पण बायकांचा सण. हो नं ? पोळ्याला सुध्दा आपण बैलाना सजवतोच की .'

चिनूची आई डोळे विस्फारून माझ्याकडे बघत होती. मग माझे मलाच हसू आले. चिनू म्हणते तशी, तोंडाला पदर लावून हसायची आपली सवय काही जात नाही बाई....

नंदिनी देशमुख
भूमी फ्लोरा १८०६ रहेजा इस्टेट
कुलूपवाडी बोरीवली (पूर्व)
मुंबई -६६
९००४०९४६१७

